# संगीत सती पिंगला

अंक १ ते ५.

लेखक:

हरि नारायण आपटे.

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं

छापून प्रसिद्ध केलें.

सन १९२१.

किंमत एक रुपया.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कै० हरि नारायण आपटे यांनीं **सती पिंगला** हें नाटक तयार केलें व त्याचे प्रयोग ‘ नाट्यकलाप्रवर्तक नाटक मंडळी ’ करीत आहे व त्यांस लोकाश्रयही चांगला मिळतो असा अनुभव आहे. तेव्हां असें नाटक पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणें अवश्य होतें, परंतु अनेक कारणांमुळें सदर पुस्तक आजवर छापून झालें नव्हतें तें आज आह्मीं प्रसिद्ध करीत आहों. कै. हरिभाऊंच्या इतर पुस्तकांप्रमाणें हें पुस्तकही लोकादरास पात्र होईल यांत शंका नाहीं. या पुस्तकांतील फोटो ‘ नाट्यकलाप्रवर्तक मंडळी ’ नें दिले याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

पुणें, ता. २१ एप्रिल १९२१. प्रकाशक.

# पात्रें.

## पुरुषपात्रें.

| | |
|---|---|
| रत्नपाल | नायक |
| हरपाल | मथुरेंतील सावकार व रत्नपालाचे वडील |
| अवधूतगुरु | महात्मा व कुलगुरु |
| कौटिल्य | रत्नपालाचा स्नेही |
| मधुकर | ,, |
| धर्मदास | म्हातारा नोकर |

## स्त्रीपात्रें.

| | |
|---|---|
| पिंगला | वेश्या-( उज्जनी येथील ) |
| कुसुममाला | रत्नपालाची बायको |
| कृतकृत्या | पिंगलेची मावशी |
| यशोदा | रत्नपालाची आई |
| कोकिला | कुसुममालेची दासी |
| वल्लरी, इंदिरा | कुसुममालेच्या मैत्रिणी |

मुरलीधरदास, कृष्णदास, पिंडारक, काकरव, विदूषक, चेट, नट, वीट, देवदत्त व इतर अवधूतांचे शिष्य, पिंगलेच्या दासी, राक्षस, पिंगलेचे नोकर, वगैरे वगैरे.

संगीत

# सती पिंगला नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

नान्दी ईशस्तवन.

पद [ चाल-एक तो कथा. ]

करुं वंदना भावें । प्रभुराया । सदा ब्रह्ममया ।
मनीं स्मरुं करुं ध्याना ॥ ध्रु० ॥
स्थिरचर निर्मुनी त्यांत योजी ।
अशिव शिवा समरीं सदसतां ॥ १ ॥
प्रथम असदशिव विजय दावी ।
परि अंतीं शिव-सज्जय जनां ॥ २ ॥

पद. [ चाल-दिर दिर न ना ना ना ना दीम. ]

संज्ञान तुलनेविना होई पूर्ण न जना, आणुनि मना ।
निर्मी प्रभु भुवना द्वंद्वततियुता ॥ ध्रु० ॥
नित मधुपरिचित रसना ज्यांचि, त्यांना कटुरस-
कल्पना न मधुमूल्यहि ना । कळेना ऊष्मा शीत-
स्थलगता ॥ १ ॥

जणुं म्हणुनि कुपथिं त्यजुनी। दुःख ध्यानीं आणवुनि
अनुशयांतीं स्थिर करिं सुपथीं। तुम्हां तो देवो
सौख्य विभु सदा ॥ ध्रु० ॥ २ ॥

**हरपालः**— गुरुमहाराज, आपल्या येण्यानं आणि राहण्यानं हें माझं घर आज धन्य झालं. माझी फार इच्छा कीं आपण पढविलेल्या या शिष्याला ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमांत घालविण्याचं श्रेय आपण घ्यावं आणि हें मंगल कौतुक पाहून या दोघां वधूवरांवर आपल्या हातून अक्षता पडाव्यात. आपल्या हातून अक्षता पडल्यावर हा वधूवरसंयोग अक्षत होईल याबद्दल संशय कशाला? वत्सा रत्नपाला व वत्से कुसुममाले, यांना तुम्ही दोघंही एकदम नमस्कार करा, आणि चिरकाल सुख प्राप्त करून देणारा आशीर्वाद घ्या. ( उभयतां नमस्कार करतात. )

**अवधूतः**— वत्सांनो शतायुषी व्हा.

**हरपालः**— आपण आमचे कुलगुरु, तेव्हां या कुलाचा अभिमान आपल्याखेरीज कोणाला असणार? आपण जर याला उपदेश केला नसता तर हा पोरगा ब्रह्मचर्याश्रमांतच दिवस काढण्याचा हट्ट धरून बसता; परंतु आपल्या कृपेनं त्याचा तो हट्ट दूर होऊन आमच्या दोघांच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं ठीक झालं.

**अवधूतः**— हरपाला, आमची कृपा कसली घेऊन बसला आहेस? प्रारब्ध, संचित आणि क्रियमाण यांच्या भोंवऱ्यांतून बाहेर काढून कसोटीला लावून तावूनसुलाखून सोनेपणा आणणारा जो सच्चिदानंद परमात्मा त्याची कृपा म्हण. त्याच्याच कृपेनं सर्व गोष्टी घडतात. तेव्हां नित्य त्याचीच करुणा भाकली पाहिजे. आम्ही केवळ निमित्तमात्र.

**कृष्णदासः**— गुरुमहाराज, हा माझा मधुकर तर आपण आजन्म ब्रह्मचारी राहणार असा हट्ट धरून बसला आहे; तेव्हां त्यालाही चार उपदेशाच्या गोष्टी सांगाव्या.

**रत्नपालः**– खरोखर गुरुमहाराज, आपण तर मला गृहस्थाश्रमांत ढकलून दिलंच. नाहींतर माझ्या मनांतूनही आणखी कांहीं कालपर्यंत आपल्या चरणांपासून दूर व्हायचं नव्हतं.

**मधुकरः**– आणि इतकंच नव्हे तर आमच्या तिघांच्याही मनांतून आपण सांगितल्याप्रमाणें तीर्थयात्रा, प्रवास वगैरे करून नंतर मग घरीं परत यावं असं होतं.

**अव०ः**– वत्सांनो, आपल्या सर्व इच्छा आपआपल्या परीनं ठीकच असतात, पण कालाच्या गर्भांत काय भरलेलं आहे याचं ज्ञान कोणाला आहे ?

पद. [ चाल–आब रंग भोलिया. ]

**होय संग्राम भू ही ॥ संसृती साची ।**
**अन्योन्यरोधी । कामनायुगांची ॥ ध्रु० ॥**
**संसारिं वसुनी । सुवासनाजया झटावें ॥**
**या भवा तरावया, जरी नर वांछी ॥ १ ॥**

तुमच्यां इच्छेप्रमाणें मीं तुम्हांला आणखी कांहीं दिवस ठेवून घेतलं असतं, परंतु आम्हांलाही अद्याप पुष्कळ गुरूंपासून पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. तुमच्या कर्तव्याचं क्षेत्र निराळं नी आमचं निराळं. तुमच्या कर्तव्याच्या क्षेत्रांत जो संग्राम तुम्हांला करावा लागणार त्याला लागणारी सर्व सामुग्री मीं तुम्हांला सिद्ध करून दिली आहे. आतां या सामुग्रीच्या साह्यानं तुम्ही काय काय विजय मिळवितां हें पहायचं आहे. तेव्हां त्या क्षेत्रांतून पळून जाण्याची इच्छा करूं नका. त्या क्षेत्रांत राहून काय पराक्रम करायचे असतील ते करा. कृष्णदासजी, तुम्ही आपल्या मधुकराबद्दल मुळींसुद्धां चिंता करूं नका.

**मुरलीधरः**– आणि माझ्या कौटिल्याची काय वाट ?

**कौटिल्यः**– गुरुमहाराज, आपली निघण्याची सर्व तयारी झाली आहे. प्रातःकालची ही शांत आणि थंड वेळ निघून गेली म्हणजे आपल्याला मार्गावर फार श्रम होतील तेव्हां निघायचं असेल तर–

**मधुकर**:— तुझीरे कां त्यांच्याभोंवतीं एवढी गर्दी ?

**कौटि०**:— अरे त्यांना आतां इथें किती वेळ रखडवणार ? गुरुमहाराज, आपण आम्हांला सोडून जाणार हें मनांत येतांच अंतःकरण कसं भड-भडून येतं. आपली आमच्यावर केवढी कृपा ! आपण आम्हांला विद्या-विनयसंपन्न केलंत आणि या संसारसंग्रामांत लागणारी सर्व सामुग्री सिद्ध करून दिली आहे. त्या सामुग्रीच्या सामर्थ्यानं मोठमोठे विजय मिळवून आपली गुरुदक्षिणा आपल्या चरणापाशीं ठेवून आपल्याला साष्टांग प्रणि-पात करायला पुन्हां आपल्या आश्रमांत केव्हां येऊं असं झालं आहे. पण हा सुप्रसंग केव्हां तरी येईल काहो ?

**अव०**:— हो हो ! खचित येईल. तुम्ही सर्वजण आपापल्या कर्मा-प्रमाणें काय काय विजय मिळवायचे ते मिळवून पुन्हां खचित माझ्या आश्रमांत याल. हरपालजी येतों आम्ही आतां. आपण सगळ्यांनीं आमचा एवढा आदर करून आम्हांला पाचारण केलंत त्याप्रमाणें आम्हीं येऊन कार्य निर्विघ्नपणानं पार पडलं. यापुढें आमच्या साह्याची आप-ल्याला आवश्यकता वाटलीच तर माझ्या आश्रमांत मी आहेंच. इथून कांहीं कालपर्यंत तीर्थयात्रा व प्रवास करीत करीत चातुर्मास्याला आम्ही आपल्या आश्रमीं जाणार. आतां तुम्हांला सांगायचं एवढंच कीं, या सं-सारांत आहांत तोंपर्यंत सुखाचे व दुःखाचे प्रसंग अनेक येणार, तेव्हां सुखाच्या प्रसंगांनीं फुगून जाऊं नका व दुःखाच्या प्रसंगांनीं भंगून जाऊं नका. मनाची शांति कायम ठेवा. वत्सांनो, तुम्ही विद्या संपवून इकडे यायला निघालांत तेव्हां जो उपदेश करायचा तो केलाच आहे. तोच नीट लक्षांत ठेवा म्हणजे झालं. वत्से कुसुममाले, तूं मोठी धन्य आहेस. या संसारांत जरी धैर्य कसोटीला लावणारे कांहीं प्रसंग आले तरी तूं आपलं शील सोडूं नकोस. सती सावित्रीसारखी कीर्तिमती होशील. येतों आम्ही आतां. ( जातात. )

———



अवधूत गुरुः-- सती सावित्रीसारखी कीर्तिमती होशील.

( पान ४. )

## प्रवेश २ रा.

[ स्थळः– रस्ता– कौटिल्य, मधुकर व रत्नपाल. ]

**कौटिल्यः**– ( हंसून ) खूप आहेत बुवा गुरुजी ! मला वाटतं अशा माणसांना मोठेपणा दिला कीं त्यांना वाटतं आपण खरोखरच मोठे आहोंत. हरपालजीसारखीं भोळीं भाबडीं माणसं यांच्यासारख्यांच्या या मोठमोठ्या ब्रह्मज्ञानाच्या भाषणांना भुलून त्यांचा फार आदर करतात, तेव्हां त्यांना वाटतं आपण देवांचे गुरु बृहस्पतिच ! कां मधुकरा बोलत नाहींस तो ? तूं तर अगदीं असं तोंड केलं आहेस कीं जणूं काय गुरुवियोगामुळें सर्व जग तुला उदास झालं आहे. वा ! बतावणी फार तर उत्तम केलीस. पाहूं तुझं उत्तरीय अश्रुजलानं अगदीं भिजून चिंब झालं असेल अगदीं. त्याच्या पदराला थोडं तिखट लावून आणलं होतंस वाटतं कीं डोळ्यांजवळ नेलं कीं चटकन् पाणी निघावं. मला नाहीं गड्या ही युक्ति सुचली.

**रत्नपालः**– कौटिल्या हें काय हें ? अरे तूं इतका कसा बावचळलास ? तुला कोणाबद्दल आदर कसा तो वाटतच नाहीं कारे ?

**कौटि०ः**– आदर ? आदर कशाबद्दल वाटायचा बाबा ? त्यांनीं चार अक्षरं आम्हांला शिकवलीं म्हणून ? तूंच सांग बरं अशा प्रत्येक गुरु-बद्दल जर–

**मधुकरः**– कौटिल्या, अशी गुरूची निंदा करून तूं आपली जीभ आणि आमचे कान कां बरं विटाळतोस ? तुला ठाऊक नाहीं कीं जो महा-पुरुषाची निंदा करतो तोच केवळ नव्हे तर ती जो ऐकतो तोही त्या पापाचा वांटेकरी होतो.

**कौटि०ः**– महापुरुषाची निंदा करीत असेल त्याच्याबद्दल ना हें म्हणणं आहे ? पण हें या ठिकाणीं लागू करण्यापूर्वी आमचे गुरुमहाराज महापुरुष आहेत हें तर सिद्ध करशील ? शरीरावरून त्यांना महापुरुष समजत अस-

शील तर समज बापडा, मला तर कांहीं त्यांच्या ठिकाणीं महापुरुषाचं एकही लक्षण दिसून आलं नाहीं.

**मधु०**:–मग आजपर्यंत तूं त्यांच्या चरणांपाशीं राहून जो त्यांना मोठा आदर दाखविलास तो काय उगीच ?

**कौटि०**:–उगीच कसा ? तसा आदर दाखविणं मला जरूर होतं. बाबारे !

पद [ चाल–दृग न लागि ]

**पद न टाकी कोणी अनृताविणें कीं ।**
**अनृतमय सकल जग अवलोकीं ॥ ध्रु० ॥**
**कृतक रुदन हसन मान । ये दिसोनि सतत लोकीं ।**
**सौहृद नय धार्मिकपणकृतकचि जग निरत हें अलीकीं ॥ १ ॥**

आपण जें कांहीं करतों तें काय सर्व मनापासूनच करीत असतों कीं काय ?

**मधु०**:–काय हें काय बोलतोस ? कौटिल्या, तुझा स्वभाव इतका खोल असेल, तूं सोंगढोंग करण्यांत इतका पटाईत असशील ही आपल्याला कांहीं कल्पना नव्हती.

**कौटि०**:–त्यांत माझा काय दोष बाबा ? तूं एक बावळट, डोक्यावर जटांचा भारा आणि गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा दिसल्या कीं लोटांगणं घालीत सुटणारा तूं. त्या तुला वरच्या ढोंगधत्तुऱ्याखालीं काय आहे तें पाहण्याइतकी खोल दृष्टि असणार कुठली ? आपण इतकीं वर्षं गुरुजींच्या जवळ काढलीं पण त्यांच्या शिकवण्या शिकवण्यांत पंक्तिप्रपंच किती होता तो तुला कधीं दिसला ? बाबारे श्रीमंताच्या घरीं जशा निरनिराळ्या पंक्ति आणखी घीवरापासून तों शिळ्या भाकरीपर्यंत निरानिराळीं पकान्नं तसा प्रकार मी विद्यादानांत सुद्धां अहर्निश पहात होतों. तुम्हां दोघांना शिकवतांना जे तुकडे खालीं पडत तेवढे गोळा करून मीं आपल्या बुद्धि-सामर्थ्याच्या जोरावर काय विद्या केली ती केली. काय रत्नपाला, तूं

अगदीं बोलत नाहींस तो? कशाला बोलशील. पण माझं बोलणं तुला बरोबर पटेल इतका तूं खचित चाणाक्ष आहेस. या मधुकरासारखं वेंधळ्याचं सोंग तूं खात्रीनं आणणार नाहींस.

**रत्नपालः**–कौटिल्या, खरं म्हणशील तर मला तुझं बोलणं मुळींसुद्धां पसंत नाहीं. आणखी माझं तुला सांगणं इतकंच आहे कीं तूं आम्हां दोघांच्या देखत गुरुमहाराजांची निंदा बिलकूल करीत जाऊं नकोस.

पद. [चाल–गगरि मोरी भरनें न दे]

**न कधीं गुरुसि अवगणीं ॥**
**छात्र गुरु ऋणी ध्यानिं आणीं ॥ ध्रु० ॥**
**ज्ञानामृत रस अर्पुनि वाढवि ॥**
**बुद्धितरु गुरू करित सुधी ॥ १ ॥**
**मति विकसवुनि । भिन्न पशुहुनी ।**
**जो करि त्याचे पद वंदी ॥ २ ॥**

बाकी तूं बोलतोस हें मनापासून बोलत असशील हें मला संभवनीयसुद्धां वाटत नाहीं. कांहीं तरी विनोद करावा, आम्हांला कसा काय राग येतो हें पाहावें हाच तुझा हेतु आहे.

**मधु०**:–रत्नपाला, हा विनोद कसला आहे? हा याचा स्वभावच आहे. याचा आपला स्नेह यापुढें—

**कौटिल्यः**–हेंच! हेंच! तुला खरं न खोटं याची निवड करण्याची खोल दृष्टि परमेश्वरानं दिलीच नाहीं असं म्हणतों तें काय खोटं आहे? अरे गृहस्था, गुरुजींच्या वियोगानं खिन्न होऊन अगदीं बोलेनासा झाला होतास, तेव्हां एकदम तें सगळं बदलून टाकायला दुसरी कांहीं चांगलीशी युक्ति होती? मधुकरा, रत्नपालाच्या इतकंसुद्धां तुला तारतम्य नाहीं. त्यानं कसा माझ्या भाषणाचा झोक तेव्हांच ताडला. बाकी माझ्यासारख्या अकिंचन बापाच्या निर्बुद्ध मुलाला गुरुजींनीं जें विद्यादान

दिलं. याबद्दल मी किती ऋणी आहें याची कल्पना तुम्हांला काय येणार ? पण कायरे रत्नपाला, गुरुमहाराजांच्या आश्रमांत असतांना आपण प्रवासाला जाण्याच्या आणि उज्जयिनी, श्रावस्ती वगैरे नगरांतील विद्यापीठं पहाण्याला जाण्याच्या ज्या तूं गोष्टी सांगत असस त्या आतांशा अगदींच बोलेनासा झालास ? याचा अर्थ काय ? कुसुममालेचा पाश तुला इतक्यांत जवळून बांधून टाकण्याइतका घट्ट झाला कीं काय ? मधुकरा, तूंही आतांशा रत्नपालाला त्या बाबतींत कांहींच बोलेनासा झालास ? कृष्णदासजींच्या मनांतून तुलाही एकाद्या बकुलावलीनं बांधून टाकण्याचा विचार आहे ? तेव्हां राहत्यापैकीं मीच काय तो एक निरंकुश राहणार असं दिसतं आहे.

**रत्नपालः**—कौटिल्या, तो माझा विचार अगदींच माझ्या मनांतून गेला आहे असं समजूं नकोस. पण काय करूं ? बाबा अगदीं तें बोलणं बोलूं सुद्धां देत नाहींत. तुझा माझा बारा वर्षे वियोग झाला आहे तेव्हां एव्हांशीं कुठें जाण्याचं नांवसुद्धां काढूं नकोस. आणि आईच्याजवळ बोलणं काढलं कीं ती तर एकदम डोळ्यांतून अश्रू काढते. तेव्हां निदान आणखी चारसहा महिने तरी त्या गोष्टीचा उल्लेख करायचा नाहीं असा मीं विचार केला आहे.

**मधु०**:—रत्नपाला, हा जो तूं विचार केलास तोच ठीक आहे. आणखी तुम्ही दोघेही नसतांना परवां मी गुरुजींच्या जवळ ही गोष्ट काढून आमची इच्छा अशी अशी आहे असं सांगितलं, तेव्हां त्यांनींही मला असंच सांगितलं कीं, थोडं धीरानं घ्या म्हणजे तुमच्या इच्छा तृप्त होतील. धीर सोडून आपलाच आग्रह चालवून एकादी गोष्ट केलीत तर ती पश्चात्तापाला मात्र कारण होईल असंही ते म्हणाले. माझी आपली त्यांच्या ठिकाणीं पूर्ण श्रद्धा यामुळं मी कांहीं बोलत नाहीं. आणि खरं म्हणाल तर मला प्रवास वगैरे करण्याची इतकी उत्कंठा नाहीं. मला पुन्हां गुरुमहाराजांच्या चरणांपाशीं जाऊन राहायला सांपडावं अशी फार उत्कंठा आहे. मला योगविद्या संपादन करावी असं फार फार वाटतं.

**कौटिल्यः**—हें तुम्हां दोघांचं ठीक आहे रे बाबांनो, पण मी काय करूं? तुम्ही घरचे सुखी आहांत तेव्हां म्हणाल तेव्हां निघाल. पण माझ्या वडिलांनीं मला काय सांगितलं माहीत आहे? ते म्हणाले बाबारे, तूं आतां कुठें तरी चाकरी धरून घरचा संसार हांकायला लाग. गुरुगृहीं विद्या फुकट झाली पण इतक्या माणसांचं उदरपोषण कांहीं फुकट होणार नाहीं. तें तुला कुठें तरी काबाडकष्ट करून केलं पाहिजे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मीं जर आपल्याला गुंतवून घेतलं आणि त्यांनीं जर का मला तुझ्याप्रमाणेंच दोरखंडानं बांधून टाकलं तर त्यांतून मला कसं निसटतां येणार? आम्हांला कांहीं कुसुममाला मिळायची नाहीं. जाडाभरडा दोरखंड आमच्या गळ्यांत पडायचा. चार सहा महिन्यांनीं तरी तुम्ही खचित निघणार असाल तर मी हजारों युक्त्या करून आपल्या स्वतःला मोकळा ठेवीन. खरं म्हणाल तर तुमच्या दोघांपेक्षांही मला देशाटनाची उत्कट लालसा आहे. पण तितक्यांत वडिलांनीं एकादी घोरपड—नव्हे—श्यामसुंदरी मदालसा गळ्यांत बांधली नाहीं तरच तें चार सहा महिन्यांनीं तरी शक्य. रत्नपाला, तुझ्यावरच आमचं सगळ्यांचं अवलंबून आणि तूंच जर का एकाद्या भुंग्यासारखा कुसुममालेंत पाय अडकून पडलास तर...बाकी मला आतां दिसतो आहे तोच रंग.

**रत्न०**:—छे! छे! कौटिल्या, हें तूं मनांतसुद्धां आणूं नकोस. माझी देशाटनाची लालसा अणुमात्रसुद्धां कमी झालेली नाहीं. पण मधुकर म्हणतो तसाच मीं विचार केलेला आहे. वडिलांच्या मर्जीप्रमाणें चारसहा महिने काढून हळूच आपला हेका चालवूं. तोंपर्यंत तूं आपला... ...

**कौटिल्यः**—शेपटीनं झाडाला विळखा घालून या झाडावर जाऊं कीं त्या झाडावर जाऊं असा विचार करीत लोंबकळत राहणाऱ्या माकडासारखे झोके घेत राहूं होय? दरिद्री माणसाचं असंच असायचं बाबा.

**मधु०**:—मला वाटतं इतक्यांतच इतकी निराशा करून घेण्याचं कारण नाहीं. आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं होणार. बरं पण आतां इथें किती

वेळ बोलत राहणार ? दुसरी सारी मंडळी घरींसुद्धां जाऊन पोहोंचली असेल. चला. ( रत्नपाल व मधुकर जातात. )

**कौटि०**–हे लेकाचे पाय खोंचून इथेंच बसणार, पण आपण या रत्नपालाचा पिच्छा पुरविल्याशिवाय सोडूं नये. मधुकर नसतांना याला गांठून याच्या मनांत पुन्हां उभारणी केली पाहिजे. हा निघाला तरच आपली इच्छा तृप्त होणार. आणखी जर वळला तर हाच वळेल. मधुकराच्या नादीं लागून आपला जम कधींच बसायचा नाहीं. रत्नपालाला जसा वळवावा तसा तो वळेल. आणि त्यानंतर हट्ट धरला तर त्याचा बापही त्याच्या आड येणार नाहीं. तेव्हां आपला सगळा भडिमार चालवायचा तो त्याच्यावरच चालविला पाहिजे. ( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

[ कुसुममाला व कोकिला प्रवेश करितात. ]

**कुसुम०**:–हें वटसावित्रीचं, त्रिरात्रीचं कडक व्रत कशाला करायलां पाहिजे असं जीं तीं म्हणतात. तूंही म्हणतेस, पण माझा निश्चय ठरला आहे. माझ्या आईला हें व्रत होतं, आणखी सासूबाईनींही सांगितलं होतं, आतां कांहीं हरकत नाहीं.

पद. [ चाल–सुरज मुख ना जय्यो रे ]

**पुण्यफला या सुव्रता ।**
**आचरिं मी चिरसौभाग्या ॥ ध्रु० ॥**
**पतिव्रता या आचरुनीया ।**
**सावित्रीसम धन्या ॥ १ ॥**

आतां त्याच्या तयारीला आपण लागलंच पाहिजे. मामंजींनीं सांगितलं आहे, कीं आपल्या बागेंतल्या त्यों वटवृक्षावर जाऊन पूजा करा. काय मैत्रिणी बोलवायच्या असतील त्या इथेंच बोलवा. आतां आमंत्रणं केलींच पाहिजेत.

**कोकिला**:—बाईसाहेब, काल रात्रींपर्यंत मला वाटत होतं कीं आपण हें कडक व्रत करूं नये. आपलं साधं इतर बायका करतात तसं करावं. पण आतां असं वांटायला लागलं आहे, कीं आपण करतां आहां हेंच ठीक आहे.

**कुसुम०**:—कां बरं, आतांच कां इतक्यांत तुझं मन बदललं ?

**कोकिला**:—तें कारण कशाला पाहिजे आपल्याला ? इकडची गोष्ट तिकडे सांगण्याचं पाप करावं कुणीं ? आमच्यासारख्या नौकरांनीं ऐकलं तें ऐकलं नाहीं आणखी पाहिलं तें पाहिलं नाहीं असंच वागलं पाहिजे.

**कुसुम०**:—कोकिले, तूं अशी मुग्धांत कधीं बोलत जाऊं नकोस. काय कुठें ऐकलंस आणि काय बोलूं नये म्हणतेस ? माझ्या मनाला मेली हुरहुर लागते.

**कोकिला**:—हुरहुर काय लागायची त्यांत बाईसाहेब ! तिकडचं सहज बोलणं ऐकलं तें आपल्यां कानीं घालावं असं आलं, पण पुन्हा वाटलं, कीं असल्यीं लावालाव्यां करण्यांत काय अर्थ आहे ? आपल्या कानीं कांहीं तरी आलंच असेलनीं ? आपल्याला सांगितल्याखेरीज थोडंचं जाणं होणार आहे ?

**कुसुम०**:—असं काय सगळं तांत्रिक बोलतेस ग ? माझ्या कानीं काय यायचं आणि जाणं कुठें व्हायचं ? नीट स्पष्ट बोल.

**कोकिला**:—मीं हें आपल्याला सांगितलं असं जर बाहेर आलं तर मला पंचाईत व्हायची. बाकी मीं आपल्याला सांगितल्याखेरीज थोडीच राहणार होतें ?

**कुसुम०**:—सांग सांग काय तें. कोण कुठें जायचं आणखी काय तें ? तुला काकरवाकडून कांहीं तरी समजलं वाटतं ?

**कोकिला**:—हो बाईसाहेब, धाकट्या यजमानांचा प्रवासाला जाण्याचा बेत चालला आहे. बहुतेक ठरल्यासारखंच झालं आहे. वर्षदोन वर्षं हिंडायचा बेत दिसतो आहे.

**कुसुम**:—काय म्हणतेस ! दोन वर्षे प्रवासाला जाण्याचा बेत ! छे ! आजच मामंजी सासूबाईंना म्हणत होते कीं, आतांशा प्रवासाला जाण्याची गोष्ट निवेनाशी झाली आहे म्हणून.

**कोकिला**:—पहा बाई, कालच मधुकरराव आणि धाकटे यजमानांचीं बराच वेळ बोलणीं होऊन कौटिल्यरावांना बरोबर घेऊन तिघांनींही अगदीं तावडतोब निघायचं असं ठरलं आहे. बरोबर धर्मदास आणखी... ... अशा दोघांनाही घ्यायचं ठरलं आहे.

**कुसुम०**:—खरंच कोकिले, तूं हें मला काय सांगते आहेस ? लग्न होण्याच्या आधीं हा नाद फार होता. पण लग्न झाल्यापासून आज चारसहा महिने तो अगदीं सुटला असं मामंजी आतांच चार घटकांपूर्वीं कींग सासूबाईच्या जवळ म्हणाले. मला नाहीं वाटत आतां मला सोडून जाण्याचा बेत होईल असं.

**कोकिला**:—कां बरं ? कां नाहीं होणार ? अतांशा सगळेच तरुण मुलंग कुठें उज्जनीला, कुठें श्रावस्तीला प्रवासाला जातात.

**कुसुम०**:—तें सगळं खरं. पण त्यांना... ...

**कोकिला**:—कुसुममालांनीं आणि बकुलावलींनीं जखडलेलं. नसतं असंच ना तुमचं म्हणणं ? काय घेऊन बसलां आहांत बाईसाहेब ! कुसुम-माला आणि बकुलावली दूर फेंकून देऊन दुसऱ्याच कुसुममाला अडकवून घेऊन तिथेंच राहिलेल्या तरुणांचीं उदाहरणं काय थोडीं आहेत !

**कुसुम**:—कोकिले, तुझ्या बोलण्यानं माझ्या जिवाचा कसा थरकांप होतो. पण खरंच का तूं म्हणतेस असा बेत चालला आहे ?

**कोकिला**:—अगदीं खचित चालले आहेत. आणि त्यांतून आपल्याला खरं काढून घ्यायचं असेल तर हे पहा, धाकटे यजमान आपल्याला हुडकीत इकडेच येताहेत. प्रत्यक्षच विचारा. इकडे पहावं तर दिवस नाहीं रात्र नाहीं. आपल्या भोंवतीं भोंवतीं असतात. आणि तिकडे असे बेत चालले आहेत.

[ रत्नपाल प्रवेश करितो. ]

**रत्नपालः**—( स्वगत ) तो कौटिल्य म्हणाला तें पुष्कळ अंशांनीं खरं आहे. त्यांना जरी मी चलायचं असं म्हणतों आहें, तरी पण माझं मन द्विधा होऊन प्रवास वगैरे ठेवावा गुंडाळून असं वाटायला लागलं आहेः—

पद. [ चाल—पपी दादुरवा बुलाये. ]

**अली नलिनी पहातां तिजसिं लीन हो ।**
**मधुरसपाना त्यजुनि वनिं जाई**
**न कधिं कालीं ॥ ध्रु० ॥**
**पुण्यें स्वर्गीं प्रवेश होतां**
**अमृत—पूर्ण घट समीप येतां ।**
**जाइ कां कोणी फिरत**
**सुरवनिं कधि कालीं ॥ १ ॥**

**कुसुम०**:—कोकिले, तूं सांगितलेला कांहीं तरी प्रकार दिसतो खरा. नाहीं तर मी इतकी समोर उभी असून स्वारी आपल्याशींच विचार करीत इतकी दूर राहिली नसती. जगदंबे सावित्री, हें संकट टाळ बाई.

**रत्नपालः**—( स्वगत ) तें कांहीं नाहीं. त्या दोघांना होला हो करून टाळावं हेंच चांगलं. कौटिल्याला मदत करण्याचं वचन दिलं आहे तर कांहीं तरी द्रव्य त्याला देऊं. तो आणि मधुकर जाऊंच लागले तर वडिलांची अनुमति आपल्याला जायला मिळत नाहीं ही सबब आहेच. ( कुसुममालेजवळ जाऊन ) कां ? आज ही कसली सामग्री जमविण्याची गडबड चालविली आहे ? कांहीं उत्सव आहे वाटतं ? तुम्हां बायकांना उत्सवाखेरीज मला वाटतं चैनच पडत नाहीं.

**कुसुम०**:—उत्सव कसला आला आहे ! चार दिवसांनीं वटसावित्रीचं व्रत आलं आहे, तेव्हां त्याची तयारी चालली आहे. तेव्हां माझ्या मनांतून त्रिरात्रीचं व्रत करायचं आलं आहे. पण तें असो. आज चर्या जरा विचारांत गढून गेल्यासारखी कां दिसते आहे ?

**रत्नपाल:**—विचार ? ज्या दिवशीं आपलीन् आमची ब्रह्मगांठ बसली त्या दिवशीं सर्व विचारविचार पार दूर झाले. ज्याच्या मनांत कांहीं विचारविचार असतील त्यानं एक मोठा विचार आधीं पार बाजूला सारला पाहिजे. तो आम्हीं बाजूलां सारला नाहीं तर मग आमच्या बाकीच्या विचारांची किंमत काय ?

**कुसुम०:**—असा कोणता बाई तो मोठा विचार ?

**रत्नपाल:**—कोणचा म्हणजे ? नाजूक फुलाचं नांव घेऊन अवजड अशा शृंखलांत स्वतांला अडकवून घेण्याचा विचार !

**कुसुम०:**—म्हणजे काय ?

**रत्नपाल:**—म्हणजे काय असायचं आहे ? ही फुलासारखी नाजूक पण वज्रापेक्षांही कठीण अशी बिडी अडकवून घेण्याचा विचार कायम करून त्याप्रमाणें कृतिही केल्यावर आतां विचारांच्या भराऱ्या चालणार कुठपर्यंत ? प्रिये, तूंच पहा बरं हें खोटं कीं खरं तें ?

**कुसुम०:**—मला बाई, हीं बोलणीं कांहीं समजत नाहींत. ज्यांनीं एकदां पदरीं घेतलं त्यांना केव्हांही खिन्नवदन झालेलं पाहूं नये.

पद. [ चाल—पतिवच मम हृदय भेदी. ]

**प्रभुसमान पतिस मान । दिनरजनी सेवि त्यास ।**
**विमलशील मधुर वचन यांहि तया दे सुखास ॥ ध्रु० ॥**
**लव न दुखवि तद्धृदयां वन्द्य गणीं कांतवचन ।**
**सौख्य व्यसन तव न भिन्न त्याहुनि हें समज खास ॥ १ ॥**
**स्त्रीसि ध्येय न पतिविना गुरुवच हें मान्य मना ।**
**ज्ञान तपेंहि गुरुहि देव सकल तुम्ही मन्मनास ॥ २ ॥**

आणखी काय सांगूं ? आपली चर्या थोडीशी मघांपासून खिन्न आणि विचारमग्न दिसली म्हणून मीं आपलं सहज विचारलं.

**रत्नपाल:**—आपण सहज विचारलं म्हणून आम्हीं कांहीं तरी सहज

सांगितलं. चंद्रप्रभा दूर असली म्हणजे आकाशप्रांत अंधकारानं व्याप्त होतो पण तीच त्याच्यावर पडली कीं अंधकाराला वाव कुठला ? प्रिये, तुझ्यापासून दूर असलों म्हणजे कांहीं तरी विचार मनांत येतात, पण तुझ्या जवळ आलों म्हणजे त्यांची दाणादाण होऊन एकच विचार स्थिर होतो.

**कुसुम०**:–तो कोणता बरं विचार ?

**रत्नपाल**:–तुझ्या सान्निध्यसुखाच्या छायेंत सदोदित बसून राहण्याचा. माझी आतांशा कशी स्थिति झाली आहे म्हणून सांगूं ? चंद्रिकेमागें चकोर, स्वातिवृष्टीमागें चातक त्याप्रमाणें–

पद. [ चाल–परवारी नागर नंदा ]

**सहवासीं तव असावें । नित ॥ ध्रु० ॥**
**निःशंक मनें रुचिर तुझें हें । वदन पहात बसावें ॥ १ ॥**
**अधरसंपुटें उच्चरिसी त्या । मधुवचनां परिसावें ॥ २ ॥**
**ह्या मधुभाषी अधरपुटाचें । चुंबन घेत रहावें ॥ ३॥**

**कुसुम**:–ही माझी समजूत करण्याची कांहीं तरी युक्ति दिसते आहे. या आपल्या भाषणाचा आणि कोकिलेनं आतांच सांगितलेल्या बातमीचा कांहींच मेळ जमत नाहीं. तें ऐकल्यापासून माझ्या मनाला मेली उगीच हुरहुर लागली आहे.

**रत्नपाल**:–हुरहुर आणि ती काय म्हणून ? अशी तुझ्या मनाला हुरहुर लागणारी बातमी तरी तिनं काय सांगितली ! कुठें आहे ती मूर्ख ?

**कुसुम०**:- तिच्याकडे काय आहे बिचारीकडे ? तिनं जें ऐकिलं तें तिनं येऊन मला सांगितलं.

**रत्नपाल**:–पण तिनं असं काय सांगितलं तें तर मला सांगशील खरी ?

**कुसुम०**:–तिनं सांगितलं कीं आपण, मधुकरराव आणि कौटिल्यभावजी उज्जयिनी, श्रावस्ती वगैरे नगरांकडे प्रवास करायला जाणार.

**रत्नपाल**:– काय कोकिळेनं तुला असं सांगितलं ? अन् तिला कोणीं

हें सांगितलं ? वेडी कुठली ! तूं काय तिच्यावर भरंवसा ठेवतेस ? मी असा कधीं जाईन का ?

**कुसुम०:**— तें खरं पण त्या दोघां बालमित्रांनीं गळ घातली नी आपलं मन फिरलं तर—शिवाय लग्न होण्यापूर्वीं आपले प्रवासाचे विचार ठरले होते असंही मीं ऐकिलें.

**रत्नपालः**— असतील तेव्हां तसे विचार. पण पहिल्यानंच तुला सांगितलं ना कीं एका मोठ्या विचारानं आमच्या कृतींत रूपांतर करून घेण्याबरोबर सूर्यप्रकाशांत वितळून जाणाऱ्या ढगाप्रमाणें त्यांची स्थिति झाली म्हणून. आतां तें मी विसरूनच गेलों. उलट त्यांना आतां काय सबबी सांगून टाळावं याच विचारांत मी आहें.

**कुसुम०:**— खरं का हें पण ? कीं आपलं मला एक सांगायचं आणखी...

**रत्नपालः**— छे ! ते दोघे जातील आपले त्यांना जायचं असलं तर. त्यांना कांहीं माझ्यासारखें सुकुमार पाशांनीं जखडून टाकलं आहे थोडेच.

**कुसुम०:**— आमचे पाश कसले ? मानले तर पाश नाहीं तर...पण मला वचन द्यायचं कीं आतां कुठें जाणार नाहीं म्हणून ?

**रत्नपालः**— हो वचन द्यायचं पण तें हातांनीं हातावर नाहीं मिळायचं.

**कुसुम०:**— मग कसं मिळायचं ?

**रत्नपालः**— जे वचन देतात त्या या ओष्ठाची मुद्रा त्या वचनाच्यामागोमाग या अधरोष्ठावर—( चुंबनासाठीं तिचें मुख वर करणार इतक्यांत पडद्यांत कौटिल्यः— 'नकोरे चुवा मधुकरा, आपण उगीच रंगाचा बेरंग कशाला करावा !' असे कौटिल्याचे शब्द त्या दोघांच्या कानीं पडतात. मधुकर व कौटिल्य दिसनात. कुसुममाला ओशाळून जाते. रत्नपाल हताश असा उभा राहतो. )

**कौटिल्यः**— मधुकरा, मीं तुला म्हटलं नव्हतं कीं आपण आधीं याला निरोप पाठविल्याखेरीज पुढें जाऊं नये म्हणून. पण तूं ऐकलं नाहींस. पण कायरे रत्नपाला, अरे गड्या कांहीं कालाची स्थलाची मर्यादा ! आम्हांला आपलं

त्या काकरवानं सांगितलं कीं स्वारी इथल्या बागेंतल्या बंगल्यांत आहे. आपण एकटे नाहीं असं जर त्यानं सांगितलं असतं तर इकडे आम्ही आलोंच नसतों. अरे काय गृहस्था तूंच एक... कां मधुकरा, आतां वाटतं का हा आपल्याबरोबर येईल म्हणून? तीं गुरुगृहींचीं वचनं न् ते बेत विसरा आतां. आतां तूंही याचंच अनुकरण करून घे म्हणजे झालं. कसला प्रवास नी कसली उज्जनी!

**मधु०**:—रत्नपाला, आम्हीं तुला ऐन प्रसंगावर पकडून रंगाचा भंग केला नारे? बरं बाबा आम्हीच जाण्याची तयारी करतों, तूं येत नाहींस ना?

**कौटिल्यः**—मधुकरा, उगीच तीनतीनदां त्याला हें विचारून खिजवतोस कशाला? मी सांगतों तो येत नाहीं म्हणून. आतां तो वडिलांची सबब काढून इथेंच पाय खोंचणार, अडकले गुलामाचे पाय. आतां करतो काय? कायरे बुवा असंचना! तुझी चार महिन्यांची बोली होती त्याला सहा महिने झाले. पण तूं सध्यां बोलायच्या स्थितींत नाहींस तेव्हां जातों आम्ही.

**रत्नपालः**—बोलायच्या स्थितींत नसायला काय झालं रे? मी माझीं वचनं आणि बेत विसरलों होय? तर मग महाराज तीं मी मुळींच विसरलों नाहीं. तुमच्या पुढें मी दोन पावलं.

**कौटिल्यः**— आमच्या पुढें आणि कुसुममाला वहिनींच्या मागें. असंच कीं नाहीं? अरे बाबा तो पाश मोठा कठीण आहे.—

पद [ चाल—मम जिवाची प्रियकरणी. ]

**मन विमोही या प्रमदा ॥ ध्रु० ॥**
**घालिति निजभुजरूपां पाशां ।**
**दुष्कर भारी ते उच्छेदा ॥ १ ॥**
**पाश म्हणे परि यां स्वीकारी ।**
**मानव मानी यांही मोदा ॥ २ ॥**

**रत्नपालः**—नुसती चेष्टा करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. मी मागें घेतों कीं तुम्ही घेतां पाहूं या! मग कधीं निघायचं बोला.

**कौटिल्यः**— ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेला.

**रत्नपालः**— कबूल अगदीं कबूल. आतां मात्र कोणीं माग घेतां उपयोगीं नाहीं. मी आतां —वडिलांना माझा बेत सांगून—निघायच्याच तयारीला लागतों. असा स्त्रीच्य प्रेमपाशांत गुरफटून राहणारा हा इसम नव्हे समजलास ! ( जातो. )

**कौटिल्यः**— यानं आविर्भाव तर खूप आणला बुवा, पण हा आविर्भाव घरांत गेल्यावर कितपत टिकेल याची आपल्याला मोठी शंका आहे.

**मधु०**:— कौटिल्या, तूं तरी त्याला उगीच कां हिणवतोस ? त्याचंन् त्याच्या बायकोचं प्रेम आहे हें तुला पहावत नाहीं असं एकादे वेळेला याच्या मनांत यायचं अशा तुझ्या बोलण्यानं. तो आतां येतों म्हणून इतकं हडसून-खडसून म्हणतो आहे तर तो कांहीं आतां बदलायचा नाहीं. तो येणार. मला कांहीं त्याच्याबद्दल शंका नाहीं.

**कौ०**:— तुला नाहीं तर मलाही नाहीं. कोणीकडून गुरुजींच्या आश्रमांत असतांना आपण केलेले बेत कायम राहून त्याप्रमाणें झालं म्हणजे बरं. त्या प्रवासांत एखाद्या ठिकाणीं आपल्याला एकादी अजब विद्या प्राप्त झाली तर माझ्यासारख्याचं कल्याण होईल. चल तर.

**मधु०**:— चला. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

( **कुसुममाला** व तिच्या मैत्रिणी वडाला प्रदक्षिणा घालून झाल्यानंतर **कुसुममाला** एकटीच एका बाजूला बसते. **रत्नपाल** एका कुंजांत उभा आहे. )

**वल्लरीः**— कां कुसुममालाबाई, चांगली पूजाअर्चा झाली, आतां घरांत फराळाला चलायचं तें अशा खिन्न वदन करून कां बसलांत ?

**कुसुम०**:– कांहीं नाहीं. उगीच आपली सावित्रीची कथा आठवून तिच्यावर केवढा प्रसंग आला होता हें मनांत आलं.

**इंदिरा**:– तें कांहीं नाहीं, कुसुममाले, तूं कां खिन्न झाली आहेस तें मीं ओळखलं. रत्नपालराय आज उज्जनीला जाणार, आणखी वर्ष दोनवर्षं प्रवास करीत राहणार. त्यामुळें ही सगळी खिन्नता आहे.

**वल्लरी**:– आहाहा ! त्यांत एवढं वाईट वाटण्याजोगं काय आहे ? अशीं का माणसं कुठं गांवाला जात नाहींत कां वर्षवर्ष प्रवास करीत नाहींत? त्यांत एवढं वाईट वाटण्याजोगं काय आहे ?

**इंदिरा**:– वल्लरी, तुझ्यासारख्या मुसळदेवतेला त्यांत कांहीं नसेल पण ज्यांना लग्न झाल्या दिवसापासून इतके दिवसांत क्षणभरसुद्धां दूर व्हायचं ठाऊक नाहीं, त्यांना तें कठीण वाटायचंच.

**वल्लरी**:– तें कांहीं नाहीं. तिच्या मनाला दुसरंच भय वाटतं आहे.

**इंदिरा**:– तेंग काय ?

**वल्लरी**:– ऐक.

**पद** [ चाल—हो परम लाभ हा. ]

**त्या नगरवासिनी । चपलकामिनी ॥ ध्रु० ॥**
**नटविति देहा । घालिति मोहा ॥**
**मधुवचें चेष्टांनीं ॥ १ ॥**
**कितिक तयांच्या । भुलुनि विलासां ॥**
**जाती वेडावोनी ॥ २ ॥**

अग उज्जनीच्या बायका कायशा म्हणे मोठ्या कवटाळणी असतात, त्या अशा तरुण पुरुषांना आपल्या पाशांत.–

**कुसुम०**:– वल्लरी हें तूं काय बोलतेस हं ? असं कांहीं कधीं माझ्या मनांत आलं नाहीं. तिकडलें माझ्यावर इतकें दृढ प्रेम आहे कीं तें दुसऱ्या

कुणीकडे जाईल असं माझ्या स्वप्नांतसुद्धां कधीं वाटायचं नाहीं. तुझं आपलं कांहीं तरीच बोलणं असतं.

**रत्न०:**– ( स्वगत ) शाबास ! प्रिये शाबास, तुझ्या मनांत माझ्या प्रेमाबद्दल इतका दृढ विश्वास आहे हें पाहून मला किती संतोष झाला. माझं तुझ्यावरील प्रेम तसंच दृढ आहे.

**वल्लरी:**– कसलं दृढप्रेम नी कसलं काय ? हें उगीच आपलं म्हणणं आहे. असे तरुण मुलगे आजपर्यंत उज्जनीला जाऊन बिघडल्याचीं उदाहरणं आपण थोडीं का ऐकिलीं आहेत ? ( कोकिला धांवत प्रवेश करते. )

**कोकिला:**– चला चला बाईसाहेब फराळाचीं पानं मांडलीं आहेत. तेव्हां लवकर चला, थोरल्या बाईसाहेबांनीं सांगितलं आहे कीं आणखी घटकाभऱ्यानं धाकटे यजमान उज्जनीला जायला निघणार तेव्हां त्याच्या आंत फराळ झाले पाहिजेत. बाईसाहेब, आज आपण फार कोमेजून गेल्यासारख्या दिसतां आहांत. दोन दिवसांचा उपास, त्यांत हा असा वियोग होण्याचा प्रसंग.

**वल्लरी:**– उन्हाचा चटका बराच झाला आहे तर कुसुममाले, या कुंजांतून जाऊं ये म्हणजे तुला त्रास होणार नाहीं. ( कुंजाच्या तोंडाशीं जाते, चपापून मागें वळते व हळूच ) कुसुममाले, आंत कोण उभं आहे पाहिलंस का ? इंदिरे, कोकिळे चलाग बायांनो आपण जाऊं या. वडिलांच्या देखत बायकोचा निरोप घ्यायला यायचा नाहीं म्हणून रत्नपालराय कुंजांत हिची वाट पहात उभे आहेत. कांहीं संकेत ठरला होता वाटतं ? कुसुममाले, हें अगोदरच सांगतीस तर आम्ही केव्हांच निघून गेलों असतों. चलाग चला ही येईल मागाहून, भलत्याच वेळीं आपण कशाला इथें ?

( जातात. )

**रत्न०:**– प्रिये, मीं तुला माझे खरे बेत कळूं दिले नाहींत म्हणून फार राग आला असेल नाहीं ? पण मी तरी काय करूं ? मित्रांनीं आपलं गुरुगृहीं दिलेलं वचन पार पाडण्याबद्दल माझ्याकडून शपथच वाहून घेतली.

त्यांनीं उपरोधिक शब्दांनीं मला फार लाजवून सोडलं. तेव्हां मींही पण त्यांना वचन दिलं. जें माझं वचन तेंच तुझंही वचन. तेव्हां तें पार पाडण्याच्या आड तूं येणार नाहींस अशी माझी खात्री आहे. पण हें काय? अशा अश्रूंनीं तूं आतां माझा जाण्याचा निश्चय ढळवूं नकोस. मी त्यांच्याबरोबर उज्जनीपर्यंत जाईन आणखी कांहीं तरी सबब काढून लागलीच निघून परत येईन. ते जर उगीच प्रवास करूं लागले तर मी नाहीं भटकणार त्यांच्याबरोबर. बोलत नाहींस ती?

**कुसुम०:**– काय बोलूं? काय बोलायचं तें मला सुचतच नाहीं. आणि मी तरी कशाला बोलूं? आपला जर जाण्याचा निश्चयच झाला आहे तर! पण—

**रत्न०:**– पण काय?

**कुसुम०:**– कांहीं नाहीं.

**रत्न०:**– कांहीं नाहीं कसं? बोलायचं अगदीं ओंठावर आलेलं आतां मागं कां बरं ठेवतेस?

**कुसुम०:**– कांहीं नाहीं. प्रवासाच्या भरांत माझं विस्मरण होईल म्हणून मला भय वाटतं.

**रत्न०:**– तें तूं मनांतसुद्धां आणूं नकोस. अग मी जरी इथून गेलों तरी कुडीनं जाणार. माझं हृदय इथें तुझ्यापाशींच असणार. तुझं आणि त्या वल्लरीचं काय बोलणं झालं तें मीं ऐकलं. पण प्रिये, तूं तिला जें उत्तर दिलंस तेंच बरोबर आहे. माझं मन कांहीं असं चंचल नाहीं. मी तुला अगदीं निक्षून सांगतों—

पद [ चाल—तोरी सांवरी सुरतिया. ]

**तव ठायीं सदा मन रंगे। अनुरागें॥**
**भ्रमत महीवरी दूरी देह जरी गे॥ ध्रु०॥**
**गरुड उडतसे गगनिं सुवेगें।**
**अंतरिं चिंति परी प्रिया अनुरागें॥ १॥**

**कुसुममाला:—**


पद [ चाल—सखिरी इं तो. ]

**मूढही हृदयरमण अति अजाण आपुलि दासी ॥**
**विनति करि चरणिं, द्या गुणराशी ॥**
**अंतर नच इसि ॥ ध्रु० ॥**
**राहिल वदतां मन तुज जवळी ।**
**त्यजा न आम्हां परि चिरविरहीं ॥ १ ॥**

**रत्नपाल:**— नाहीं, मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. या वेळीं मी तुला जें हें आलिंगन देतों, त्या आलिंगनाबरोबर मी माझे पंचप्राण तुझ्या ठिकाणीं अर्पण करतों असंच समज. मी इथून कितीही दूर गेलों तरी तुझ्या आणि माझ्या प्रेमांत अंतर पडेल असं मुळींच मनांत आणूं नकोस. तुझ्या माझ्या प्रेमांत अंतर पाडायला कोण येतो आहे ?

**कौटिल्य:**— रत्नपाला, मी येतों आहेरे बाबा. एकटा नसलास तर सांग. ( बाहेर येऊन ) अरे बाबा. गाड्या तयार होऊन मंडळी तुझी वाट पहाता-हेत. कुसुममाला वहिनीही कुठें दिसेनात तेव्हां आपली स्वारी इकडे भेट घेण्याकरितां आली असेल म्हणून इकडे आलों. अरे जायचं मग कां ? चल ( जातात. )

**( अंक १ ला समाप्त. )**




**रत्नपाल**:--तुझ्या आणखी माझ्या प्रेमांत अंतर पडेल असं मुळींच मनांत आणू नकोस.

(पान २२)

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**— उज्जनींतील एक रस्ता.

[**पात्रें**—रत्नपाल, मधुकर, कौटिल्य, धर्मदास, काकरव व उज्जनींचे एक गृहस्थ.]

**रत्नपालः**—मधुकरा, आपल्याला मथुरानगरीचा केवढा अभिमान होता आणि हें पाहिलंस का—

**पद** [ चाल—खगवा चोले.]

**गगनोन्नत या मंदिरशिखरां ॥**
**पाहुनियां गमे निज करां ॥**
**पुरी उभारी सुरधनहारां ॥ ध्रु० ॥**
**लुटूनि अलका ही सुरलोका ॥**
**वस्तुसि आणी सुखद अनेका ॥**
**ये न अन्यथा श्रीहि अपारा ॥ १ ॥**

**कौटिल्यः**— आणि ही संपत्ति काय एकाच प्रकारची आहे ? परराज्य काबीज केलं कीं श्री आणि स्त्री यांचीही लूट होते.

**मधुकरः**— श्री आणि स्त्रीच काय म्हणतां ? स्वर्गांतून सरस्वतीलासुद्धां इथें ओढून आणलं आहे. अरे बाबा या नगरांत जितकी विद्वत्ता भरली आहे तितकी विद्वत्ता स्वर्गांत तरी असेल कीं नाहीं कोणाला ठाऊक. विक्रमादित्याच्या वेळीं जशीं नऊ रत्नं होतीं तशींच विद्वद्रत्नं अजूनही या राजसभेंत आहेत. किती पाठशाला आहेत किती—

**उज्जनीकरः**— कांहो आपण अगदीं पहिल्यानंच आलां वाटतं आमच्या या नगरांत; म्हणून आपले इतके डोळे दिपले. पण मी आपल्याला सांगतों कीं, हें आमचं नगर म्हणजे एक सगळ्या जगाची लहानशी नक्कलच आहे.

संपत्ति दिसली म्हणून तुम्ही इतके भुलून गेलां पण शोध करूं लागलांत तर अठरा विसवे दारिद्र्यही ओतप्रोत भरलेलं आहे असंहीं दिसेल. जसे हे मोठमोठे उंच सुशोभित केलेले वाडे तुम्हांला दिसत आहेत तशींच अतिशय भयंकर आणि गलिच्छ अशीं बिळंही पण तुम्हांला दिसतील. ज्या बिळांतून उंदीर सुद्धां राहणार नाहींत इतकीं तीं बिळं गलिच्छ पण त्या वीतभर जागेंत पांच पांच सहा सहा माणसं राहतात. जशा पाठशाळा दिसतात तशा दुर्व्यसनशाळाही असंख्य दिसतील.

**रत्नपालः**–काय म्हणतां या नगरांत दरिद्री लोक आहेत?

**उज्जनीकरः**–आहेत म्हणजे दरिद्री आणि दुर्व्यसनी लोक फार आहेत.

**मधु०ः**–असतील. असतील. आपल्याला वाईटाशीं काय करायचं आहे? चांगलं तेवढं पाहावं. चार दिवस राहून गंमत पाहून पुढें जायचं.

**कौटिल्यः**–पण कायहो उज्जनीकर, ही या नगरींतील गजबज नेहमींचीच असते कीं आज कांहीं विशेष आहे.

**उज्जनीकरः**–नेहमींच फार गजबज असते. परंतु आज थोडी विशेष आहे. विशेष असण्याचं कारण हल्लीं चार दिवस आमच्या या नगरांत मोठा उत्सव चालला आहे. वसंतऋतु लागतांच हा उत्सव सुरू होतो.

**कौटिल्यः**–वा! मग आम्ही अगदीं वेळेवरच आलों म्हणायचे! मी तुम्हांला मघांपासून विचारणार होतों कीं हे तरुण व या तरुणी इतक्या ऐटीनं कुठं चालल्या आहेत? जो तो आपल्या चेहऱ्याची, पोषाखाची वगैरे विशेष काळजी घेऊन चाललेला दिसतो. कोणीं मिशांचे विंचू केले आहेत, कोणी त्यांच्या लांब कातक्या बनविल्या आहेत आणि पोषाखांच्या भपक्याची तर रेलचेल झालेली आहे. चालण्याच्या ढबी तर असंख्य दिसत आहेत. आणि हा इतका खटाटोप करून जाणाऱ्या येणाऱ्या तरुणींवर त्याचा परिणाम कसा काय होतो हें पाहण्यासाठीं सर्वांचे डोळे त्यांच्याकडे गुंतलेले. बरं त्या तरुणींकडे पहावं तर–

**मधु०:**—कौटिल्या, पुरे कर बुवा तुझा हा विनोद. पण काय हो उज्जनीकर, इथें एक फार महान् योगी आले असून ते महांकालेश्वराच्या देवळांत उतरले आहेत असं ऐकतों तें खरं का ?

**उज्जनी०:**—हो आले आहेत खरे. आणखी त्यांच्या दर्शनासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात असतात. पण ते कोणाशीं बोलत नाहींत किंवा आपल्याजवळ कोणाला येऊं देत नाहींत. त्यांच्या योगसामर्थ्याबद्दल लोकांत लौकिक मात्र फार झाला आहे.

**मधु०:**—तर मग त्यांचं दर्शन घेतलंच पाहिजे. पण रत्नपाला, आतां आपण इथें रस्त्यांतच बोलत किती वेळ उभे राहणार ? तुझ्या वडिलांनीं तुला दिलेल्या पत्रांपैकीं एखाद्या सावकाराचा पत्ता यांना विचार म्हणजे आपण जाऊन बिऱ्हाडाची सोय करूं. धर्मशाळेंत आपले लोक वाट पाहून पाहून कंटाळून गेले असतील.

**कौटिल्य:**—छे ! छे ! रत्नपाला इथं आल्यासारखं आपल्याला सगळं कांहीं पाहून घ्यायचं असलं तर वडिलोंच्या ओळखीच्या सावकारांचीं घरं धुंडीत बसण्यांत अर्थ नाहीं. आजपर्यंत दहा पांच नगरं पाहिलीं तिथला अनुभव पुरे नाहीं का झाला ? आतां आपण या उज्जनीकरांच्या साहाय्यानं सुंदरसें घर बघून तिथें स्वतंत्र बिऱ्हाड करूं तें चांगलं. तुझ्या ओळखीच्या गृहस्थाकडे गेलों आणखी ते एखादे जर का वृद्धकपी असले तर आपल्या हिंडण्याफिरण्याला विनाकारण अडथळा यायचा. कायहो उज्जनीकर, आम्हांला तसं एकादं स्वतंत्र टूमदार घर पाहून द्याल कीं नाहीं ?

**उज्जनी०:**— अशा घरांना हो काय इथें तोटा ? आपल्यासारख्या परकी तरुण शौकीनांना वाटेल तितकीं घरं मिळतील. घरांत घरकरणी पाहिजे असल्यास त्याही मिळतील.

**कौ०:**— बस् ! तर मग तसं एखादं घर पाहूनद्या. तिथें सामान लावूं, कांहीं उपाहार करूं आणि उत्सव पहायाला जाऊं. उत्सवाचं मुख्य ठिकाण कोणतें ?

**उज्जनी०:**– उत्सवाचं मुख्य ठिकाण कामोद्यान आणखी आजचा उत्सवाचा मुख्य दिवस आहे.

**कौ०:**– फारच योग्य वेळीं आलों म्हणायचे आम्ही.

**मधु०:**– रत्नपाला, स्वतंत्र घर करून राहाण्याची ही कल्पना आपल्याला नाहीं बुवा पसंत. तुझ्या वडिलांनीं पत्रं दिलीं आहेत. माझ्या वडिलांनींही दिलीं आहेत. तेव्हां आपण एकाद्या ओळखीच्या ठिकाणीं उतरणं चांगलं.

**कौ०:**– एथपासूनच आपल्या मतभेदाला सुरवात झाली तर मग हें पुढं कसं निभावायचं? अरे बाबा, आपण कोणाच्या घरीं जाऊन उतरलों म्हणजे किती पराधीनपणा होतो याचा अनुभव पुरे नाहीं का झाला? मधुकरा, आजपर्यंत आम्हीं तुझं ऐकलं आतां तूं उज्जनीपुरतं आमचं ऐक. पत्रं दिलीं आहेत तितक्या ठिकाणीं एक दोनदां भेटायाला गेलं म्हणजे झालं.

**रत्न०:**– कौटिल्या, तूं म्हणतोस तेंच मला बरोबर दिसतं. स्वतां बिऱ्हाड करावं तेंच चांगलं. चला, उज्जनीकर आम्हांला तसं एखादं बिऱ्हाड द्या पाहून. घरमात्र अगदीं स्वतंत्र असावं हो. कोणाचा उपसर्ग बिलकूल उपयोगाचा नाहीं. आमचे नौकरही मोठे हुषार आहेत. सांभाळण्याची बिलकूल काळजी नको.

**कौटिल्यः**–घर पाहून द्या आणि आपल्याला सवड असली तर आपणही आमच्याबरोबर असा. आपले श्रम व्यर्थ जाणार नाहींत.

**उज्ज०:**–श्रम व्यर्थ जाण्याची गोष्ट असो, पण आपणां सर्वांची रंगेल वृत्ति पाहून आपल्या संगतींत मला राहावं असं वाटायला लागलं आहे.

**रत्न०:**–चला तर.

**कौटिल्यः**–मधुकरा, असं भित्र्या पोरासारखं करूं नको. प्रवासापासून होणारे फायदे खरोखर करून घ्यायचे असतील तर स्वतंत्रपणानंच राहिल्यानं होणार, चल. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**— कामोद्यानाजवळील रस्ता.

[ **पात्रें**— पिंगला, कृतकृत्या, वीट, चेट, नट, नर्तक, विदूषक वगैरे. ]

**कृतकृत्या**:– अग पण पिंगले, असं करून कसं चालेल? तुला ज्या इतक्या कला इतक्या विद्या शिकविल्या त्याचं चीज होण्याचे दिवस आले आणि तूं आपली ज्या त्या गोष्टीचा नकार आरंभला आहेस याला काय म्हणावं? आज तर तुझ्या सगळ्या......

**पिंगला**:–मावशी, पुन्हां पुन्हां तेंच बोलण्यांत काय तात्पर्य आहे? तुझ्या आग्रहाकरितां मी इथें आलें आतां, आणखी तुझं म्हणणं तरी काय आहे?

**विट**:–त्यांचं म्हणणं दुसरं काय असायचं आहे? आपल्या विद्येचं चीज करून आज सगळ्या उज्जनीला दाखवा.

**विदूषक**:–अन् चीज करून दाखवा म्हणण्याचाही अर्थ स्पष्ट करून सांगा म्हणत असलां कीं नाहीं तर मी सांगतों. आपल्याला अवगत असलेल्या सर्व विद्यांचे पाश एकत्र विणून त्यांत एक सुंदरसा मृग पकडा. कायरे चेटा असाच अर्थ कीं नाहीं?

**चेट**:–आणखी काय तर?

**नट**:–पिंगले, आज या कामोद्यानांत जी इतकी तरुण लोकांची गर्दी जमली आहे ती कां जमली आहे माहीत नाहीं वाटतं? आज आपण इथें येणार आणखी आपलं गायन नर्तन होणार असं ज्याच्या त्याच्या तोंडीं झालं आहे. मला वाटतं आज सगळं नगर इथें लोटल्यामुळं चोरांना कित्येक घरं सावकाशपणं लुटायला सांपडतील.

**विदू०**:–हो जशास तसं व्हायचंच तें. आपल्या गायनाचा बहार लोक लुटणार आपण त्यांचीं मनं लुटणार तेव्हां चोर त्यांचीं घरं लुटणार. एकूण सगळा चोरांचाच सुळसुळाट उडणार.

**पिंगला**:—मीं एकदां सांगितलं कीं मी तिथें गायचीही नाहीं आणि नृत्यही करायची नाहीं ह्मणून.

**वीट**:—असं कुठें झालं आहे ? इतक्या लोकांची निराशा करण्याइतकी निष्ठुरता धरून कसं चालेल ? आणखी तुझ्यासारख्या रतीनं जर मदनापुढें आपलं गायन आणखी नृत्य करायचं नाहीं तर मदनानं तरी आपले विजय मिळवायचे कोणाच्या जिवावर ? पिंगले, तुझ्यासारखीला पुढें करून तरुण पुरुषांच्या सेनेवर आपल्या पुष्पबाणांची वृष्टि करण्यासाठीं तो पहा कसा वीरासन घालून बसला आहे ?

**विदू०**:—खरं खरं तें. आपल्या राजाच्या हातून हुकूम सुटतां केव्हां आणखी मी शस्त्रास्त्रांचा भडिमार करूं लागतों कधीं असं होऊन जसा एखादा सेनापति अगदीं शस्त्रं सज्ज करून बसतो तशीच त्या बिचाऱ्या मदनाची स्थिति झाली आहे.

**कृत०**:—अग पण आचरट पोरी. आज नाना देशांहून किती तरी शौकीन लोक तुझं गाणं ऐकायला सांपडेल म्हणून उज्जनीला आले आहेत. आणखी तूं हा असा चमत्कारिक हट्ट धरून बसली आहेस. याला म्हणावं तरी काय ? असं तुला करायचं असेल तर मग मी आपली चालती होतें काशीयात्रेला; तिथें जाऊन काशीविश्वेश्वराची पूजा तरी करीत राहीन.

**विदू०**:—वा ! कृत्यकृत्यामावशी, आपण अशा देवपूजेला लागलां म्हणजे लोकांतल्या एका म्हणीचा अर्थ स्पष्ट करून सांगायला दुसरें उदाहरण नको. कृतकृत्या शब्दाचा स्पष्ट अर्थ करावा आणखी पुढं देवपूजेला लागली असं म्हणावं म्हणजे झालं.

**वीट**:—पिंगले, असं वेड्यासारखं करूं नकोस. ज्या कुलांत जन्माला आली आहेस त्याचं नांव राख. तूं काय करावंस तें शास्त्रानंच सांगितलं आहे.

पद [ चाल--मानो मानो सैंया. ]

**मन न दे कुणा । तृण गणीं गुणां ॥ ध्रु० ॥**
**रूपा न शीला । न वया कुळाला ।**
**ठेविं धनावरि ध्याना ॥ १ ॥**



उज्जनीकरः---हीच ती पिंगला.

(पान २९.)

**करि देहभूषा । स्मित नर्मभाषा । लावि चटक धनिकांना ॥ २ ॥**
**द्यूतसुरेच्या लावुनि छंदा । कामवशा त्यजिं दीना ॥ ३ ॥**

तर असा वेडा विचार करूं नकोस. तूं आज आपल्या कौशल्याचा असा चमत्कार दाखीव कीं मदनानं रतीला सोडून तुझाच अंगिकार करावा.

**विदू०:**—होईल बुवा असं. हें पहा, हे किती तरी मदन ही येण्यापूर्वी सगळ्यां उद्यानभर पसरले होते. ते हळूहळू हिच्याभोंवतीं जमा होऊं लागले आहेत. हलवायाच्या जिलबीकडे माशासुद्धां इतक्या धांवून येत नसतील.

**कुत०:**—हं चल हो पुढें. रस्ता करारे तिला त्या पुष्पमंडपांत जायला.

**चेटः**—रस्ता करा कसा? या गर्दीतल्या प्रत्येक माणसाची नजर यांच्यावर आणि पाय तर जमिनीला चिकटल्यासारखे झाले आहेत. त्यांना हातांनीं बाजूला सारून रस्ता करावा तेव्हां खरं. अरे वाट तरी सोडा कीं नाहीं. ( सर्व मंडळी जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

( मंदिरांत मदनमूर्ति धनुष्य सज्ज केलेली आहे. पुढें गायन वगैरे चाललें आहे. एका बाजूनं रत्नपाल वगैरे मंडळी येतात. दुसऱ्या बाजूनं पिंगला वगैरे येतात व गायन नर्तन सुरू आहे असा पडदा उघडतो. )

**रत्नपालः**—काय ही कोणी मनुष्यच आहे? मला तर वाटतं ही प्रत्यक्ष उर्वशी अप्सराच असली पाहिजे. कायहो उज्जनीकर आपल्या रूपानं उर्वशीतिलोत्तमांनाही लाजिवणारी ही कोण?

**उज्जनीकरः**—हीच ती पिंगला! जिच्या गायनामृताचा आस्वाद मिळावा म्हणून आलेल्या लोकांनीं हें उद्यान कसं गजबजून सोडलं आहे.

**कौटिल्यः**—तिच्या मागं तिला अगदीं चिकटून उभी आहे ती तिची मावशी वाटतं? अशी एकादी कुतकुत्त्या असायचीच अशा तरुण वारांगनांच्या परिवारांत.

**उज्जनीकरः**— आपण या कामांतले मोठे मर्मज्ञ दिसतां. त्या बाईचं नांव खरोखरीच कृतकृत्या आहे.

( पिंगलेच्या गायनास सुरवात होते. )

**पिंगलाः**—

पद [ चाल-श्रीकृष्ण तो परमात्मा. ]

**हे मन्मथा तव लीला । गहना गमे मनाला ।**
**विषमा जनांत कामा । निर्मीसि गाढ प्रेमा ॥ ध्रु० ॥**
**कामी न या स्थलकालां । धनबांधवां कुलशीला ।**
**विसरे क्षणीं सकळांला ॥ १ ॥**
**अनुराग दृढ निर्मीसी । सर्वस्वत्याग करवीसी ॥**
**वदुं साधु कीं खळ तुजला ॥ २ ॥**

( गायन झाल्यानंतर पिंगला वगैरे सर्व मंडळी जातात. )

**रत्नपालः**— हिला पाहिल्यापासून मी अगदीं वेड्यासारखा झालों आहें. कौटिल्या, हिच्याशीं चार शब्द तरी बोलावे अशी मला इच्छा झाली आहे. ही कुठें राहते याची चौकशी तरी कर.

**मधु०ः**— रत्नपाला, तूं हें कौटिल्याला काय सांगतो आहेस? तुझ्या प्रवासाला येण्याचं पर्यवसान जर असंच होणार असेल तर आपण इथूनच परतूं कसे. मित्रा, तुझी स्थिति काय, तूं कोण आणि ती यःकश्चित् वेश्या तूं तिच्या घराची चौकशी करायला लागलास?

**रत्नपालः**— कौटिल्या, पहा पहा ती चालली. तिचा परिवारही चालला. तिच्या परिवारांतला जर मी असतों तर बरं झालं असतं. जा जा तिच्या मागोमाग, तिचं राहण्याचं ठिकाण तरी पाहून ये. तिच्या त्या अत्यंत दिव्य गायनाचा व रूपाचा नुसता चटका लागून राहिला आहे. मधुकरा, ही खरोखरीच कोणी मनुष्य नव्हे.

**कौटिल्यः**— ( आपल्याशीं ) वाहवा! ही स्वारी खचित बावचळल्या सारखी दिसते. मी सुद्धां थोडा वेडावलों म्हणा मग त्याच्यासारखा माणूस

बावचळेल यांत नवल काय? पाहूं तर खरं ही कुठें राहते ही. ( उज्जनीकरास ) चला हो, आपल्या साहाय्यावांचून कांहीं जमायचं नाहीं. ( कौटिल्य, उज्जनीकर व मधुकर जातात. )

**मधुकरः**– कौटिल्या, मागं फीर मागं फीर, चाललास कुठें.

**रत्नपालः**– ही तर प्रत्यक्ष रतिच असली पाहिजे–

पद.

**“ वस्तुजात विधि रम्य भुवनिंचें समवायें दावी ।**
**निर्मुनि इजसी” या परि ईचें वर्णन करिल कवी ॥ध्रु०॥**
**साच्च विष्णु विध्यनुकरणास्तव ही प्रतिमा बनवी ।**
**ये तया न यश परि आजवरी हें मनिं मी ठरवीं ॥ १ ॥**

---

## प्रवेश ४ था.

( **स्थळ**– पिंगलेचा वाडा. कृतकृत्या, वीट, विदूषक. )

**कृतकृत्याः**– अरे, पण हा गृहस्थ त्या रत्नपालाच्या श्रीमंतीबद्दल जें काय बोलतो त खरं कीं खोटं हें समजायला काय मार्ग आहे ?

**विदू०ः**– अळित्याच्या कापसांत अळिता आहे किंवा नाहीं हें समजायला जो मार्ग तोच मार्ग तो. कापूस पाण्यांत भिजवून पिळून पहावा आणि अळित्याचा रंगसुद्धां दिसेनासा झाला म्हणजे फेंकून द्यावा.

**कृत०ः**– गप बसरे, तुला वेळ अवेळ कांहींच समजत नाहीं.

**वीटः**– तो म्हणतो तें कांहीं खोटं नाही. रत्नपाल श्रीमंत आहे कीं नाहीं हें पहायला उपाय पैशाच्या मागण्यावर मागण्या करणं आणखी काय गंमत होते ती पहाणं.

**कृत०ः**– तें सगळं खरं, पण माझी पिंगला पडली अगदीं अल्लड. या सावकार पुत्राकडे तिच्या मनाचा ओढा दिसूं लागला आहे. आणि हा

ओढा. जर वाढत चालला आणि मग समजलं कीं त्याची श्रीमंती खोटी तर त्याला हाकून लावणं कठीण होईल. पोरीचा स्वभाव त्या महानंदा, वसंतसेना वगैरेंच्या तऱ्हेवर जाण्याचं भारी भय वाटतं आहे. राजपुत्र गंभीरसेनानं पन्नास माणसं पाठविलीं पण ही म्हणते तो मूर्ख आहे. मला त्याचं तोंडसुद्धां पहायचं नाहीं. आम्हीं वेश्यांनीं हा मूर्ख आहे, तो वेडा हें काय पहात बसायचं ?

**विदू०:**–तें तर जरूर पाहिलं पाहिजे. जो द्रव्यवान् चांगला ठणठणीत मूर्ख असेल त्याला जवळ करायचा, नसेल त्याला मूर्ख बनवून–

**कृत०:**–तुला केव्हां काय बोलायचं कांहीं समजत नाहीं कारे! याच्या बोलण्यांत कांहीं सुद्धां अर्थ नसतो.

**विदू०:**–ज्याच्या पिशवींत अर्थ नाहीं त्याच्या बोलण्यांत आपल्याला कुठून अर्थ दिसणार? पण हे आपले मदतगार आपल्या स्नेह्याच्या कल्याणासाठीं अहोरात्र झटणारे कौटिल्यराय आले. यांच्या बोलण्यांत तर रगड अर्थ मिळतो ?

**कौटिल्यः**–( येऊन ) काय ? अर्थ कसलानी काय कसलं ?

**कृत०:**–कांहीं नाहीं. राजपुत्र गंधर्वसेन पिंगलेसाठीं अगदीं विव्हळ झाला आहे परंतु माझी पोरगी म्हणजे ती त्याच्या वाऱ्याला सुद्धां उभी राहणार नाहीं. एकदां तो आला तर ही दाराला कडी लावून बसली. पण तुमच्या मित्राला पाहिल्यापासून तिचं मन थोडं. मीं असं आपल्याला सांगूं नये पण ......

**कौटि०:**–माझ्या मित्राचीसुद्धां स्थिति आपल्याच मुलीसारखी झाली आहे. माझा मित्र द्रव्यदृष्टीनं राजपुत्रापेक्षांही फार संपन्न आणि उदार आहे आणि राजपुत्रापेक्षां ......

**विदू०:**–फारच मूर्ख आहे असंच कीं नाहीं आपलं म्हणणं ?

**कृतकृत्याः**–गप्प बैसरे मूर्खा, नाहीं तर तुला आतां हांकून देईन.

विदू०–अहो बाई, हांकून दिल्याबरोबर जाणारे गृहस्थ आपल्या इथें येताहेत कशाला ? आपण हांकून देऊं लागलां म्हणजे ती एक प्रकारची मौजच आहे, तो एक सन्मानच आहे म्हणून पाय खोंचणारेच सारे.

**कृतकृत्या**:– आतां मात्र मी गय करायची नाहीं अं ! हें पहा, कौटिल्यराव, आपण या मूर्खाच्या बोलण्याकडे मुळीं लक्षच देऊं नका.

**विदूषकः**– अहो बाई, लक्षन् दशलक्ष द्यायला त्यांच्या स्वतांच्या जवळ आहेत का ? ते आपल्या श्रीमंत मित्राबद्दल तरफदारी करताहेत.

**कौटिल्यः**– बरोबर आहे यांचें म्हणणें. माझ्या मित्राची स्थिति फार वाईट झाली आहे. त्यानें आपल्या कन्येला तनमनधन अर्पण केल्याचा संकल्प केला आहे.

**विदूषकः**– धनं अर्पण केल्याचं सांगितलंत एवढं पुरे. तनमन त्यानं आपल्याजवळ ठेवायला आमची कांहीं हरकत नाहीं.

**कृतकृत्याः**– आतां याला इथून घालवून दिल्याखेरीज हा स्वस्थपणानं बोलूं द्यायचा नाहीं; तेव्हां याला कांहीं तरी निमित्त काढून घालवून दिला पाहिजे. पिंडरका, विटा, पिंगला काय करते आहे पाहून या बरं.

**विदूषकः**– पाहून या कां म्हणतां ? पाहायला जा कां नाहीं म्हणत ? पण बाई मी आपला जातोंच. अशा दुभत्या गाया गांठून जर आपण पिळल्या नाहींत तर आमच्यासारख्यांचं पोट आपण कसं चालवणार ? पण संभाळाहो, जें दूध काढाल त्यांतला अर्धा अधिक वांटा हे गृहस्थ आपल्याजवळ मागणारच. गाय जर त्यांनीं आपल्याला गांठून दिली आहे तर दुधाचा वांटा कां नाहीं मागणार ? हं होऊं द्या सवदा. (जातो.)

**कौटिल्यः**– हा आपला विदूषक म्हणजे शहाण्यावर ताण आहे.

**कृतकृत्याः**– कसला मेला चाहटळ ! वेळ अवेळ कांहीं विचार न करतां आपला बडबडत असतो. पण तें असो. आपलं काय म्हणणं आहे ?

**कौटिल्यः**— माझं म्हणणं काय, माझ्या मित्राचे प्राण वांचवा. तो अगदीं वेडा झाला आहे. आणखी मी तुम्हाला सांगतों कीं, असलं सावज कांहीं आपल्याला सहसा मिळायचं नाहीं.

**कृतकृत्याः**— एवढं मात्र बोलूं नका बरं का. आजामितीला किती राजे-रजवाडे आणि सावकार दूतावर दूत पाठविताहेत. किती एक तर स्वतां दहा वेळां येऊन गेले, पण ही पोरगी त्यांच्याकडे ढुंकून पाहीना कीं त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देईना.

**कौ०ः**— बरोबरच आहे,—

पद [ चाल—मंदिड यार हा. ]

**कधिं घडेल का । जाणुनी ।**
**आलिंगिल कोमलतनु । कमालिनी द्रुमा सकंटका ॥ ध्रु० ॥**
**ती परभृतिका । पुरुषरवा का ।**
**वांछिल काका । अनुपपन्न । कधिं घडेल० ॥ १ ॥**
**नलिनीकलिका बघुनि मृगांका । उमले मुदिता ।**
**पात्रप्रणयिनी ही बालिका ॥ २ ॥**

शिवाय तो कांहीं चारुदत्तासारखा दरिद्री नाहीं.

**विदू०ः**—( येऊन ) तो आज नाहीं आहे, पण लवकरच तसा होण्या-करतां येतो आहे. तेव्हां बाई अशा चांगल्या कामांत आपण विघ्न आणूं नका.

**कृतकृत्याः**— तूं आलास का इतक्यांत ? काय करते आहेरे पिंगला ?

**विदूषकः**—जें तिनं करावं कीं नाहीं याबद्दल आपण यांच्याशीं वाटाघाट करतां आहांत तेंच ती करण्याच्या विचारांत आहे.

**कृतकृत्याः**—म्हणजे ?

**विदूषकः**—म्हणजे काय ? यांचे मित्र आले आहेत.

**कौटिल्यः**–काय रत्नपाल परस्पर आला आहे ? मग माझी काय आतां जरूरी ? मला वाटलंच होतं कीं त्याला धीर निघायचा नाहीं म्हणून. कृतकृत्या बाई, आपण आतां ओढून धरूं नका. माझा मित्र कोट्याधीश आहे आणि फार सज्जनही आहे. शिवाय तरुण असून सुंदर ........

**विदूषकः**–कोट्याधीश आहे. एवढं सांगिलंत यांत सगळ्या गुणांचं सार आलं. बाकी गुणांची तंत्री वाचतां कशाला ?

**कृतकृत्याः**–पण परस्परांची गांठ झाली कशी ?

**विदूषकः**–रात्र मधें नसली म्हणजे चक्रवाकाची नी चक्रवाकीची गांठ व्हायला अडचण काय ?

**कृतकृत्याः**–असलं नाहीं मी चालूं द्यायाची. आतां मी जाऊन......... चलरे ती दोघं कुठें आहेत दाखीव.

**कौटिल्यः**– कृतकृत्या बाई, आणखी एक गोष्ट आपल्याला सांगायची. राहिली. सांगायची म्हणण्यापेक्षां दाखवायचीही म्हटलं तरी चालेल. ( हळूच कंकण काढून पुढें करतो ) अशी कंकणाची जोडी आपल्याला या उज्जनींत दुसरीकडे सांपडेल असं नाहीं मला वाटत. आपण फार चतुर आहांत तेव्हां किंमत तर करा पाहूं. ( विदूषकाकडे पाहून ) कांहो, आपणही पाहून तर अगदीं थक्कच झालांत ? काय म्हणणं आहे आपलं ?

**विदू०**:–असलं कंकण आपण यांना दाखवणं म्हणजे आपल्या मित्राला लवकरच धुळीला मिळवायचं कंकणच आपण बांधलं आहे आहे असं स्पष्ट म्हणणं होय.

**कृतकृत्याः**–आहे ठीक आहे, पण......पिंडरका आपल्या त्या.......

**विदू०**:–पेटींत नेऊन ठेऊं लागलींच म्हणतां होय ?

**कृतकृत्याः**–कांहीं तरी आपला बोलत असतो. अरे तीं...

**कौटिल्यः**–कृतकृत्याबाई, झालं तें फार उत्तम झालं. आतां आपण सांगितल्याप्रमाणें घडवून आणा म्हणजे झालं. तेवढं काम केलंत तर...

**कृतकृत्याः**–आधीं मला तिथें जाऊं द्या, नाहीं तर माझी पोरगी वेडीच आहे. त्याला पाशांत गुरफटून घेण्याच्या आधींच आपण गुरफटून जाईल–

**विदू०:**– बाई, ही कसली काळजी करतां आपण ? किती झालं तरी आपल्या शिकवणीचीच शिष्यीण ती. गवयाचं पोर रडलं तरी तें जसं सुरांत रडायचं तसं वेश्येची कन्या फसली तरी मोठ्या शिताफीनं फसायची ! ऐका तर खरीं आडून कशीं भाषणं चाललीं आहेत तीं.

**कृत०:**–चला हो–( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

[ धर्मदास प्रवेश करितो. ]

**धर्मदासः**–काय स्वभावाचा विचित्रपणा असतो पहा ! हे तिघे बालमित्र एका ठिकाणीं वाढले पण आतां पाहावं तों तिघांच्या तीन तऱ्हा. मी जुना नोकर म्हणून मला थोरल्या यजमानांनीं मुद्दाम रत्नपालरायांबरोबर दिलं पण मला म्हाताऱ्याला ते कधीं बाहेर चल असंसुद्धां म्हणत नाहींत. त्यांचा सगळा भर त्या आपल्या काकरवावर. आणि तो तर बेटा उड्याच मारीत असतो. मला इथें बिऱ्हाड संभाळायला ठेवतात. मधुकरराय साधुसंत गांठून योगाभ्यासाच्या मागं लागले आहेत आणखी हे आपले त्या काकरवाला बरोबर घेऊन ...

**काकरवः**–( येऊन ) कां वृद्धोपंत, कोणत्या विचारांत निमग्न आहांत ?

**धर्मदासः**–काकरवा, रत्नपालरायांची स्वारी कोणिकडे आहे ?

**काकरवः**–कां ? कोणिकडे कां असेना ? आपल्याला काय त्याची पंचाईत ?

**धर्मदासः**–इथून कधीं निघायचं याची कांहीं बोलवा ?

**काकरवः**–आतां इथून निघायच्या गोष्टी विसरा.

**धर्म०**:– विसरा म्हणजे ?

**काकरवः**– विसरा म्हणजे काय? विसरा या शब्दाचा अर्थ आतां खुलासेवार सांगायला पाहिजे का? अहो आतां इथून निघायचा विचार-सुद्धां मनांत आणूं नका. आतां आपण इथेंच केव्हां तरी राम म्हणणार असं धरून चला. महांकाळेश्वराच्या चरणाजवळ हाडं पडलीं तर त्यांत वावगं काय?

**धर्म०**:– काकरवा, अशी चेष्टा करूं नकोस माझी म्हाताऱ्याची. तूं काय बोलतो आहेस तें नीट उलगडून सांग.

**काकरवः**– मगरीच्या तोंडांत सांपडलेला बळी कधीं बाहेर निघाला आहे का?

**धर्म०**:– अरे म्हणतो आहेस तरी काय?

**काकरवः**– धर्मदासजी, तुम्ही डोळे असून पाहात नाहीं असा तुम्हांला दोष द्यावा तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण वृद्धापकाळामुळें तुम्हांला खरंच दिसत नाहीं. कान असून ऐकायला येत नाहीं आणि पाय असून चालतां येत नाहीं, हें सगळं ठीक आहे; पण बुद्धि असून समजत नाहीं अशी तुमची स्थिति झाली असेल ही कांहीं बुवा आपल्याला कल्पना नव्हती.

**धर्म०**:– तुम्ही मला इथें बिऱ्हाड संभाळायला ठेऊन सगळे जातां...

**काकरवः**– आतां चार दिवसांनीं तें बिऱ्हाडही संभाळायची कामगिरी आपणांपासून निघेल. बिऱ्हाडाला मालकीण झाली आहे. तिच्या ताब्यांत बिऱ्हाड गेलं म्हणजे तिच्या देवडीवर माशा मारीत बसण्याची पाळी.

**धर्म०**:– तिच्या देवडीवर ? तिच्या कोणाच्या–......

**काकरवः**– तिच्या म्हणजे...( मोठ्यानें हंसतो. पिंडरक प्रवेश करतो. )

**विदू०**:– काकरवा, तुला कौटिल्यरावांनीं ताबडतोब बोलाविलं आहे.

**धर्म०**:– ते कुठें आहेत?

**विदू०**:– मरीआईच्या देवळांत.

**धर्म०**:–अन् हे कशाला गेले आहेत तिथें ?

**विदू०**:–बळी द्यायलानी दुसरं कशाला जातात तिथें? तुम्ही इतके वृद्ध दिसतां आणि मरीआईच्या देवळांत लोक कां जातात हेंही माहीत नाहीं अजून. कांहीं जातात बळी देण्यासाठीं, तुमच्या कौटिल्यरायांसारखे. कांहीं जातात बळी पडण्यासाठीं, तुमच्या रत्नपालरायांसारखे. कांहीं जातात अशा बळींवर ताव मारण्यासाठीं तुमच्या काकरवाच्यासारखे नी आमच्यासारखे. अरे काकरवा, तुला काय कागद सांगितले आहेत ते घेऊन कौटिल्यरायांनीं लवकर बोलावलं आहे. ते सरांफींत जाण्यासाठीं खोळंबले आहेत.

**काकरवः**– धर्मदासजी, त्या पेटीच्या किल्ल्या द्या पाहूं. परवां आलेल्या चार हुंड्या काढा.

**धर्म०**:–अरे कालच दोन मोडून आणल्या आणखी आज पुन्हा.

**विदू०**:–हे वृद्ध आपले असेच दिसताहेत. यांना काल हुंड्या मोडल्या म्हणून आज दुसऱ्या मोडायला नेण्याचं आश्चर्य वाटतं आहे. अहो आजोबा, तुमच्या कालाच्या पाठीशीं आमची काली बसली आहे ती नांवाप्रमाणें कृतकृत्य होईपर्यंत अशा किती हुंड्या खाईल आणखी शेवटीं....

**धर्म०**:–आणखी शेवटीं काय हो ?

**विदू०**:–उंसाचा रस खाऊन चुइटी टाकतात तशी चुईटीसुद्धां टाकणार नाहीं. डाळिंबाचा रस खाऊन शेवटीं बियाही चाऊन खाणारीं माणसं असतात कीं नाहीं तशी आमची कृतकृत्या मावशी आहे. तेव्हां...

**काकरवः**– पिंडरका, तूं मला बोलवायला आलास कीं आपल्याच...

**विदू०**:–खरंच तें मी अगदीं विसरलों. बळी अगदीं तयार आहे. त्याची महादाक्षिणा कौटिल्यराय विसरले न्यायला. तेवढी घेऊन चल म्हणून निरोप सांगून तांतडीनं मी तुला बोलवायला आलों. आतां त्या

बळीचा काय थाट उडणार ! अमृताचाच चषक तो. या अमृतानं मनुष्य मरतो तर खास पण त्याला मेलों असं मुळींच वाटत नाहीं.

**काकरव:**–( आपल्याशीं ) या मूर्खाला जर आतां अधिक कांहीं बोलूं दिलं तर हा सगळं भांडवल फोडील. तेव्हां याला घेऊन इथून निघून जावं. ( धर्मदासाजवळ जाऊन ) हा एक आपला वेडापीर आहे. जें तोंडाला येईल तें बडबडत असतो. तुम्ही त्या किल्ल्या द्या इकडे. मला सांगितलेली कामगिरी करूं द्या. ( धर्मदासाच्या हातांतील किल्ल्या घेऊन आंत जाऊन पेटींतील कागद घेऊन येतो. ) ( विदूषकास ) अहो कालिदास चला.

**विदू०:**–हो मी कालिदास न् तुम्ही बलिदास. तुमचा बली आमच्या कालीनं घेतला कीं तुम्हीं आम्हीं दोघांनीं यथेच्छ झोडायचा आणखी कालिदास बनायचं. चला तर. ( दोघे जातात. )

**धर्म०:**–हा काय घोंटाळा आहे कांहीं समजत नाहीं. आपण आपलं त्या मधुकररायांना गांठून त्यांच्या कानावर या सगळ्या गोष्टी घालाव्या. त्यासारखा दुसरा उपाय नाहीं. ( जातो. )

---

## प्रवेश ६ वा.

[ **स्थळ**–गुहा–योगींद्र व त्यांचा शिष्य. ]

**योगींद्र:**–काय करावं ? हा मधुकर तर त्या आपल्या मित्राला सदुपदेश करून योग्य मार्गाला लावा असा आग्रह करतो आहे. आणि त्याच्या मित्राची स्थिति तर अद्याप तशा स्थितीला येऊन पोहोंचली नाहीं. तो तर त्याला घेऊन खचित येणार. पण खरं म्हटलं तर त्याच्या आमच्या भेटीचा सध्यां योगच नाहीं. हा मधुकर मात्र आमच्या या मार्गांत घालण्याजोगा शिष्य आहे खरा. आणखी तो लवकरच येणार. देवदत्ता, पहा बरं मधुकर आला कीं काय तें ?

**देवदत्त**:—मधुकर म्हणतांच मधुकर. अरे मधुकरा, तुला योगिराज बोलावताहेत.

**मधु०**:—योगिराज, मी आपल्यां मित्राला कसा तरी इकडे...

**योगींद्र**:—मधुकरा, तूं म्हणतोस ही गोष्ट खरी आहे. पण जितकं ज्याला सुख दुःख भोगायचं असेल तितकं त्यानं भोगल्याशिवाय त्याची सुटका व्हायची नाहीं. पुन्हां असली पाळी येऊं नये म्हणून या जन्मांत तरतूद करायची, पण जे भोग आपल्या कर्मामुळें भोगावे लागतात ते भोगूनच सरवले पाहिजेत.

**मधु०**:—योगिराज, आपण कांहींही म्हणा पण एवढी कृपा करा. माझा मित्र अगदीं आवरण्याच्या बाहेर गेला आहे अशी माझी समजूत नाहीं. तो एकवार आपल्या दर्शनाला येऊन आपल्या उपदेशाचे शब्द त्यानें ऐकिले कीं तो इथेंच आपल्या चरणांजवळ राहील.

**योगींद्र**:—पण तो इथें येईल तेव्हां ना? तुझ्या आग्रहाकरितां मी त्याला आपोआप कांहीं उपदेश होईल असें करतों; आणखी मग त्याच्या मनावर परिणाम झाला तर मला सांगायला ये. मग पाहूं त्यालां इकडे येण्याविषयीं सांगायचं कीं नाहीं तें.

**मधु०**:—मीं त्याला आपल्याबरोबर आणलं आहे. पण आपली परवांनगी घ्यावी आणखी मग पुढें आणावं म्हणून त्याला तिथें देवालयाजवळ बसवून आलों आहें. आपली आज्ञा असली तर घेऊन येतों.

**योगींद्र**:—पाहूं मग, सध्यां तर तूं जा. त्याच्या आमच्या भेटीचा योग असला तर होईल भेट. (मधुकर जातो.) त्याच्या दुर्दैवाचे फेरे संपण्यापूर्वी त्याला कांहीं तरी नवीन चमत्कृति दिसावी हें व या वेळीं योग्य आहे. (जातात.)

( मधुकर व रत्नपाल येतात. )

**मधु०**:—रत्नपाला, मी तुला वारंवार बोलतों याबद्दल क्षमा कर. पण तूंच विचार कर—आपण काय हेतूनं प्रवास करायला निघालों आणि काय हेतूनं......

**रत्नपाल**:– आतां अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. ज्या हेतूनं आपण निघालों त्या दृष्टीनं माझा तर हेतु पार पडला असं मला वाटतं. तूं आपला आग्रह सोडीनास म्हणून तुजबरोबर आलों. मित्रा, तुला तुझा इष्ट हेतु साध्य झाला. तुझ्या आनंदतीर्थासारखा योगिराज मिळाला, तसाच माझा हेतु मला...पण आपल्यासमोर एकाएकीं काय दिसूं लागलं हें? अहाहा! किती सुंदर हा प्रासाद!

**मधु०**:– अरे खरंच! माझ्या मित्राला उपदेश करा म्हणून म्हटलं त्याच्यावरून—हो तेंच दिसतं आहे. महापुरुषाचं असंच आहे. प्रसाद-चिन्हानि पुरःफलानि!

( एक देदीप्यमान प्रासाद एकाएकीं दृश्यमान् होतो. याला चार दरवाजे आहेत. एक तरुण सुंदर पुरुष पहिल्या दरवाज्याजवळ जातो. या दरवाज्याजवळ मांसाचे पदार्थ ठेवलेले आहेत. आणि वर खालीं लिहिलेलीं वाक्यें एक मनुष्य म्हणतो. )

**पहिल्या दरवाज्यावरील मनुष्य**:– हे पुरुषा, तूं या पदार्थांचं सेवन कर म्हणजे तुला योग्य तें प्राप्त होईल.

**महापुरुष**:– इथें अभक्ष्यभक्ष पदार्थ ठेवलेले आहेत यांचें सेवन मी करूं? छे! यांचं सेवन करणं महापातक होणार. हें पातक मीं कलं तर माझी योग्यता ती काय राहिली? छे! यांचं सेवन करणं नको आणि प्राप्त कसं होतं हें पहायालाही नको. ( दुसऱ्या दरवाज्याजवळ जातो. )

**दुसऱ्या दरवाज्यावरील मनुष्य**:– हे पुरुषा, हें तुझं नाहीं, परंतु तूं याचं ग्रहण केलंस म्हणजे तुला योग्य तेंच प्राप्त होईल.

**महापुरुष**:– काय हें माझं नाहीं? आणि मी याचं ग्रहण करूं? एकूण त्या दरवाज्याजवळ अभक्ष्यभक्षणाचं पातक करण्याविषयीं उपदेश केला तर इथें अग्राह्य ग्रहण किंवा चोरी करण्याबद्दल उपदेश केला म्हणतात! छे! तें ग्रहणही करायला नको आणि प्राप्त कसं होतं तें पहायलाही नको. ( पुढच्या दरवाज्याजवळ जातो. )

**तिसऱ्या दरवाज्यावरील स्त्री :**— हे पुरुषा, तूं माझा अंगिकार करून प्रेमालिंगन दे म्हणजे तुला योग्य तेंच प्राप्त होईल.

**महापुरुष :**— अहाहा ! किती सुंदर स्त्री आहेही. हिच्या स्वरूपांत एकसुद्धां व्यंग नाहीं. पण कां नाहीं ? ही परस्त्री हें काय थोडें व्यंग आहे ? छे ! परस्त्रीगमन हें सगळ्या महापातकांतलं महापातक. छे तें कधीं माझ्या स्वप्नांतसुद्धां होणार नाहीं. पुढें जावं हें बरं ! ( पुढच्या दरवाज्याजवळ जातो. )

**चवथ्या दरवाज्यावरील मनुष्य :**— हे पुरुषा, हें दुःखितांचं दुःख हरण करून त्यांना चिरकाल सुख प्राप्त करून देणारं आहे. याचं सेवन केल्यानं मनुष्य देहभान विसरून आनंदमग्न होतो आणि तसाच तो स्वानंदसाम्राज्यांत गर्क झाला असतां पुढें त्याला योग्य तेंच प्राप्त होतं.

**महापुरुष :**— वाहवा ! हें किती सुंदर पेय आहे ! याच्या रूपावरूनच खात्री होते कीं यानं केलेल्या वर्णनाप्रमाणें याच्यांत सामर्थ्य असलं पाहिजे. अरे ! ही सुरा तर नसेलना ? अं ! असली म्हणून काय झालं ? सुरांनीं जिचा आदर केला ती ही सुरा. तिचं सेवन करण्यांत कांहीं वावगें नाहीं. हिचं स्वरूप किती मोहक आहे ! वास तरी किती मधुर ! मला वाटतं हिचे नुसते दोन घुटके घेतल्यानं जर आपल्याला योग्य तें सार या मंदिरांत मिळणार आहे, तर विनाकारण संधि कां दवडावी ? ( घुटके घेतो ) सुंदर ! काय मजा आहे. सुरे, तुझ्या शत्रूंनीं खरोखर तुझी निंदा केली असली पाहिजे. खरोखर तूं स्वर्गदात्री आहेस. तुझं मीं सेवन केलं तेव्हां पुढें....पण छे, आपण स्वर्गांत जाणार तें एकट्यानींच काय म्हणून जावं ? मघाच्या त्या कामिनीला कां बरोबर घेऊन जाऊं नये ? ( असें म्हणत पहिल्या दरवाज्याजवळ जातो. ) अरे आपण चुकलों वाटतं ? त्या बाजूनं जायचं तें या बाजूनं आलों. कांहीं हरकत नाहीं. पान झाल्यावर कांहींतरी भक्षण पाहिजे. ठीक आहे. ( मांस खाऊन ) काय, या सुंदर पदार्थांचा मीं त्याग केला होता हो ! छे ! जीवो जीवस्य जीवनम् असं शास्त्रवचन असतांना आपण या पदार्थांचा कायं म्हणून त्याग करावा ?

(भक्षण करून दुसऱ्या दरवाज्याजवळ येतो.) मघाशीं मी काय पामर बनलों होतों हो! हें द्रव्य माझं नाहीं? पण दुसऱ्या कोणाचं असल्याबद्दल मालकी सांगण्याला जर इथें कोणी नाहीं तर तें माझ्याकरितांच ठेवलं नाहीं कशावरून? छे! श्रीची अवहेलना कोणीं केली आहे काय? (द्रव्य घेऊन तिसऱ्या दरवाज्याजवळ येतो.) हे सौंदर्यलतिके, क्षमा कर. तुझ्यासारखी सुंदर स्त्री मला आलिंगन द्या असं मागणं करीत असतां तुझा अव्हेर करून जाणं केवढा मूर्खपणा आहे! तूंच श्री, तूंच धी, तूंच रमा, तूंच उमा आणि तूंच माझी प्राणदेवता आहेस. तुला बरोबर घेईन तरच मी या मंदिरांत असणाऱ्या स्वर्गसुखाचा अनुभव घेईन. तुझ्याखेरीज सर्व त्रिभुवन तुच्छ आहे. (तिला आलिंगन द्यायला पुढें सरतो तों एकदम नरकपुरीचा देखावा दिसतो. रत्नपाल मधुकर पाहात असतां कौटिल्य येतो.)

**कौटिल्यः**– मला वाटलंच होतं कीं, मधुकर याला इथें गांठून आणणार. पण हे वेड्यासारखे वर आकाशाकडे आ वासून काय बरं पाहताहेत? यांच्या मागें उभं राहून बोलणं तर ऐकूं.

**मधुकरः**– रत्नपाला, पाहिलास हा चमत्कार! तूं अश्रद्धेनं माझ्याबरोबर आलास पण योगिराजांनीं तुला दर्शन देण्यापूर्वींच आपल्या सामर्थ्याचा प्रभाव तुला दाखविला. त्यांचं दर्शन झाल्यावर उपदेशाच्या गोष्टी तोंडानं सांगण्याचं कायम ठरविलं आहे. वा! (स्वगत) योगिराजांनीं याला गुंग करून सोडलंच. तेव्हां आपण याला क्षणभर असाच सोडून याला दर्शनाला घेऊन येण्याबद्दल योगिराजांची परवानगी घेऊन येऊं. (उघड) रत्नपाला, तूं दर्शनाला आल्याचं कळवून येतों. तूं जरा इथेंच उभा राहा (जातो.)

**कौटिल्यः**– स्वारी गेली हें फार बरं झालं. (रत्नपालास) तूं नादिष्टपणानं मधुकराबरोबर इकडे आलास पण तुला योगसिद्धि करून देणारी ती महायोगिनी तुझी वाट पाहाते आहेना?

**रत्न०:**– कोण कौटिल्या, तूं केव्हां आलास? आणि मधुकर कुठें आहे?

**कौ०**:– मधुकर कुठें गेला मला काय ठाऊक ? पण तुझ्याकारितां झुरत असलेली ती मधुकरी......

**रत्न०**:– कौटिल्या, इथें असलेल्या योगिराजांनीं आतां आम्हांला जो चमत्कार करून दाखविला तो काय सांगूं ?

**कौ०**:– सांग हवा असला तर माझ्याबरोबर वाटेनं जातां जातां. सांग चल.

**रत्न०**:– जातां जातां ? कुठें ? मधुकराबरोबर मी आलों. त्याच्याबरोबर मला जायचं आहे.

**कौटिल्य**:– ( स्वगत ) मधुकरानं खचित याला गुंग करून टाकला आहे. तेव्हां तो परत येण्याच्या आंत याला इथून काढला पाहिजे. थोडी लबाडी करावी लागली तरी हरकत नाहीं. ( उघड ) मधुकराच्या शोधाकरतांच चल म्हणतों आहें. तो असा ह्या बाजूनं गेलेला मीं पाहिला. मीं त्याला हाका मारल्या पण त्या त्यानं ऐकल्या नाहींत. तो असाच तुझ्यासारखा कांहीं नादांत दिसला. चल त्याला आपण पाहूं. तुम्हीं काय चमत्कार पाहिला तो सांगा. ( त्याला ओढून नेतो. )

---

## प्रवेश ७ वा.

[ **पिंगला एकटीच बसली आहे.** ]

**पिंगला**:– आज हा नानाप्रकारच्या आणा-शपथा वाहून माझं तुझ्यावर प्रेम जडलं आहे, मी या जन्मांत तुला अंतर देणार नाहीं, असं म्हणतो आहे. पण बोलून चालून मी वेश्या, तेव्हां मजजवळच्या त्याच्या आणा-शपथा कुठल्या टिकायला ! चार दिवस हा उज्जनींत मौज करायला आला आहे, तोंपर्यंत मला एकाद्या खेळण्याप्रमाणें वागवील. उद्यां त्याची जाण्याची वेळ आली म्हणजे......खरं आहे तें. आम्ही तरी काय करतों ?

**पद** [ चाल–प्रेम हो परि निजानुरागें. ]

**जांवरी मधु वसे गुलाबी । तवंतरंगीं शिरेल भृंगी ॥ ध्रु० ॥**

**नीरस होतां । सुकोनि जातां । क्षणहि न राही ।**
**तदीय संगीं ॥ १ ॥**

[ पद झाल्यावर दीर्घ सुस्कारा सोडून कोचावर बसते. ]

**रत्नपालः–** ( प्र० करून ) काय ? इतका दीर्घ सुस्कारा आणि तो काय म्हणून ?

**पिंगलाः–** अगबाई मी काय दचकलें ? केव्हां येऊन उभे राहिलां ?

**रत्नपालः–** आपल्या मनांतील विचार संपून दीर्घ सुस्कारा टाकून इथें बसलां तेव्हांच. एवढा काय विचार चालला होता ?

**पिंगलाः–** विचार कसला ? आपण केव्हां येतां त्याची वाट पाहात बसलें होतें.

**रत्नपालः–** मला जाऊन किती वेळ झाला अशी तुझी समजूत आहे ? दोन घटका कांहीं झाल्या नाहींत. पण प्रिये, ह्या दोन घटकासुद्धां मला युगाप्रमाणें गेल्या. तरी बरं, सामानसुमान नीटनेटकं बांधून इकडे आणण्याच्या कामांत मन गुंतलं होतं. कौटिल्य आणि मीं दोघांनीं गेल्यापासून दुसरं कांहीं केलं नाहीं. मधुकर मात्र भेटला नाहीं. तो योगिराजांच्या नादीं लागला आहे. वेडा कुठला ! तुझ्यासारखी एखादी महायोगिनी गांठून तिच्या नादीं लागायचं सोडून......पण तुझ्यासारखी योगिनी प्रसन्न होण्याइतकं प्रत्येकाचं कुठलं नशीब ! प्रिये, तूं योगिनी खरी. तूं आणि मी यांतला भेद आतां राहिला आहे कुठें ?

**पिंगलाः–** असं भलतंच काय बोलावं ? मग खरंच का आपण इथें राह्यला आलां ? आतां मुळींच जायचं नाहीं ?

**रत्नपालः–** अगदीं मुळीं सुद्धां जायचा नाहीं. सगळं सामानसुमान घेऊन आलों. कौटिल्य आणि मी दोघे गेल्यावर सामानाच्या बांधाबांधीला काय वेळ लागणार होता ? मी खरोखर सामानासाठीं मुळीं गेलोंच नाहीं. मी गेलों होतों त्या मधुकऱ्याला निक्षून सांगायला, पण तो मुळींच भेटला

नाहीं, पण तो मुळीं भेटलाच नाहीं. तेव्हां एक चिठी लिहून ठेवून आलों आहें. धर्मदासानें त्याला ती स्वतां द्यावी म्हणून त्याला बसवून आलों आहें. आतां तो किंवा कोणी इकडे येणार नाहीं. आतां तो किंवा कोणीही इकडे येणार नाहीं. प्रिये, आतां तर तुझी खात्री झालीना, मीं आपलं सर्वस्व तुला वाहिलं आहे म्हणून ? कां आतां काय विचार चालला आहे ?

**पिंगलाः**— आपण केला हा विचार कीं अविचार याचा विचार चालला आहे. आपण कुलीन पुरुष आहांत आणि मी बोलून चालून वेश्या—

**रत्नपालः**— छे ! आतां ते शब्द उच्चारूं सुद्धां नकोस. तूं तशी असतीस तर असे विचार तुझ्या मनांत येतेच ना. मी तर असं म्हणतों. तुझ माझा गांधर्व विधीनं विवाहच झाला. तूं जर वेश्या तर शकुंतला तरी काय होती ?

**पिंगलाः**— शकुंतलेची गोष्ट कशाला ?

**रत्नपालः**— खरोखरीच तिची गोष्ट नको, आणखी दुसरी कुणाचीही गोष्ट नको. आपण आपलीच गोष्ट अशी बनवूं या कीं कवि तिच्यावर नाटकं रचतील. मग तर झालं ? आतां सगळे विचार सोडून तूं एक सुंदर चीज म्हण. अशी चीज म्हण कीं मन उल्हसितच झालं पाहिजे.

**पिंगलाः**— ( गाते. )

पद [ चाल—तनय विनत सरसा. ]

**भोंवतिं फिरफिरुनी । भृंग भुलवितो**
**कमलिनिसी ॥ ध्रु० ॥**

**त्यावरि विश्वसुनी निशिं दलकरपाशीं**
**त्यासी ॥ कवळुनि प्रेमभरें धरि ती हृदयाशीं ।**
**बाहुपाश परि सोडवुनी तो जाय काय**
**निघुनी । रवि उगवतां । भीति तिच्या ही**
**वसत मनीं ॥ १ ॥**

**रत्नपालः**– तूं हें मला हिणवते आहेस, पण तूं चुकते आहेस. खरी गोष्ट निराळी आहे. मीही एक पद्य गाऊन ती तुला सांगतोंः–

पद [ चाल– या तव बघुनि मधुर. ]

**आर्जवमुदित जरि कमलिनी । भ्रमरा ।**
**स्वीकारी हृदिं होतां रजनी । दिवसभरी श्रमवोनी ॥ ध्रु० ॥**
**सूर्योदयिंही मज सोडुनि का ॥ निशासमयिं परभृंगा ।**
**आलिंगिल ही येउनि शंका । खेदचि तो मनिं मानी ॥१॥**

पण हे असले विचार आतां काय म्हणून ? तुझ्या माझ्या प्रेमाच्या आड येणारे सर्व अंतराय आपण दूर केले. कृतकृत्या मावशीसारख्यांनीं सुद्धां आपलं अनुमोदन दुसऱ्या अटीवर दिलं, ती अट कबूल करून इथें आलों. आतां हे विचार कशाला ? आतां आपण सदैव सुखाचा अनुभव–( तिला आलिंगन देण्याकरितां पुढें होतो तोंच बाहेर कौटिल्याचा आवाज ऐकूं येतो. )

**कौटिल्यः**–मी कांहीं बुवा तुला घेऊं देणार नाहीं. त्यानं जर नको म्हटलं आहे तर तुझा तरी इतका आग्रह कांरे ?

**मधु०ः**–मला तर त्याची एकदां गांठ घेतलीच पाहिजे. मध्यरात्र उलटली म्हणून काय झालं ?

**रत्नपालः**–प्रिये, खालीं दाराशीं मधुकर आला असून त्याची आणि कौटिल्याची बोलाचाली चाललेली दिसते. त्यांना एकदां वाटेला लावून येतों. मला वाटलंच होतं कीं, तो नुसत्या चिठ्ठीवर स्वस्थ बसणार नाहीं. इथें येईल. ( जातो.

## प्रवेश ८ वा.

[ कौटिल्य व मधुकर प्रवेश करतात. ]

**कौटिल्यः**– व्हायचं आहे काय तो भेटायचा नाहीं. त्याला वाटलंच होतं कीं आपली स्वारी इथं येईलं म्हणून. तुला काय कळवायचं तें त्यानं पत्रांत लिहून कळवलंच आहे.

**मधु०ः**– कौटिल्या, हें फार वाईटरे फार वाईट. तूं त्याला बिघडाविलास. अरे, त्याला इथें वेश्येच्या इथें राहण्याची सल्ला दिलीस.

**कौ०ः**– मधुकरा, तूं मला किती जरी उपरोधिक बोललास तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. अरे, माझ्या आणि तुझ्या सल्ल्याला तो विचारतो आहे कुठें ! त्याचा सल्लागार निराळाच आहे.

**मधु०ः**–तो कोण ?

**कौटिल्यः**– मदन.

**मधु०ः**– तुझ्याशीं बोलण्यात कांहीं अर्थ नाहीं. तूं त्याची नी माझी भेट करव.

**कौटिल्यः**– तो आतां ऐन रंगांत......

**रत्नपालः**–( येऊन ) माझी भेट पाहिजे ना ? घे भेट. तूं इथं येऊन कांहीं तमाशा होऊं नये म्हणून आधीं बिऱ्हाडीं आलों होतों पण तूं कुठें होतास ? बरं नाहीं तर नाहीं म्हणून तिथें घटकाभर बसून चांगलं सगळ्या मजकुराचं पत्र लिहून ठेवून आलों. मधुकरा, तूं मला आतांपर्यंत थोडा उपदेश केलास असं नाहीं. पण आतां उपदेश करण्याच्या मिषानं इथें येऊन मला त्रास द्यायचा विचार असेल तर तूं आपला जा. तुला पिंगलेची किंमत माहीत नाहींरे. तूं तिच्या बाह्य स्वरूपावरून तिची किंमत करतोस. तुझा तो योगिराज आम्हांला लुच्चा, गोंडबंगाली भामट्या जादुगार वाटतो, पण तुला तसा वाटतो का ?

**मधु०**:– अरेरे ! रत्नपाला, काय म्हणतोस हें ?

**रत्न०**:– असं बोललं म्हणजे तुला जसा राग येतो, वाईट वाटतं तसंच आमचं झालं आहे बुवा. पिंगला अत्यंत पवित्र, अत्यंत साध्वी– वेश्येच्या उदरीं जन्म हा केवळ तिला कलंक लागला आहे. माझी तर अशी समजूत आहे कीं, कोणी तरी ऋषिपत्नी कोण्या ऋषीच्या शापामुळं ती या कुळांत जन्माला आली आहे. तिचा उद्धार माझ्या हातून होणार आहे.

**मधु०**:– अरेरे रत्नपाला, इतका तूं अंध झालास ! तूं कोणाचा कोण, तुझी योग्यता काय ? तुझे गुरु कोण ? तूं इकडे आलास कशाला ? आणि येऊन पडला आहेस कुठें याचा विचार कर.

**कौटिल्यः**–वा ! छान चाललं आहे.

**रत्न०**:– मीं सगळा विचार केला आहे रे बुवा. आतां तूं आपला जा कसा–

( कृतकृत्या, वीट, चेट, विदूषक वगैरे येतात. )

**कृत०**:– काय आहे हो दंगा ? हें काय बाजारांतलं घर आहे का काय ? रात्रीच्या वेळीं हा दंगा ! काय आहे माझ्या घरांत ?

**कौटिल्यः**–तसा दंगा बिंगा कांहीं नाहीं हो ! हा आमचा मित्र मधुकर रत्नपालाला शहाणपणाच्या गोष्टी सांगायला आला आहे.

**कृत०**:– शहाणपणाच्या गोष्टी ! वा ! तर मी सगळ्यांत शहाणपणाची गोष्ट सांगतें त्यांना. हें पहा मधुकरराव, आतां आपण इथून मुकाट्यानं जावं हीच शहाणपणाची गोष्ट.

**विदू०**:– इकडे पहा मधुकरराव, ही कानांनीं ग्रहण करण्याची शहाणपणाची गोष्ट झाली ती तुम्हांला कृतकृत्या मावशींनीं दिली; ती जर तुम्हीं स्वीकारली नाहीं तर हे तिघे चौघे धटिंगण आहेत कीं नाहीं, हे तुह्मांला मानेवर शहाणपणाची गोष्ट सांगायला आले आहेत. आजपर्यंत त्यांनीं ती पुष्कळांना देतांना पाहिली आहे म्हणून तुम्हांला सांगतों. ते पहा कसे बाह्या सांवरताहेत.

**मधुकरः**–अरेरे रत्नपाला, इथपर्यंत तुझी स्थिति शेवटीं आलीना ?

**कौटिल्यः**–आली. मग पुढें काय म्हणतोस? तो याच्याही पलीकडे वाहूं नये असं तुला वाटत असलं तर तूं इथें येऊन राहा. मी पहा, मलाही तुझ्यासारखंच वाटलं कीं हा आपल्या आवांक्याच्या बाहेर जातो आहे तर मी नाहीं इथें येऊन राह्यलों? मित्र बुडूं लागला तर त्याला नुसता उपदेश करून सोडून द्यायचा कीं त्याचा हात धरून--

**मधु०ः**–पुरे ! पुरे !! कौटिल्या, हें सारं तुझं कौटिल्य आहे. तूं याला बिघडवितो आहेस.

**कौटिल्यः**–मी बिघडवीत होतों तर तूं सुधरायचं होतंस. उगीच ज्यास्त बोलण्यांत काय अर्थ आहे ? तुझ्या मनांतून याला इथून काढून लावून आपण घुसायचं आहे हें काय मला आणखी रत्नपालाला समजलं नाहीं ? पिंगलेचं मन तुला वश व्हावं म्हणून तूं गुरुमहाराजांकडे वशीकरणाचा मंत्र मागतो आहेस हें काय आमच्या कानीं आलं नाहीं असं समजतोस काय ?

**कृतकृत्याः**–काय ? माझ्या पोरीवर हा मंत्रातंत्राचा प्रयोग करणार आहे ? अगबाई ! मग याला क्षणभरसुद्धां उभं राहूं देतां उपयोगीं नाहीं. चलारे व्हा पुढें आणि द्या ह्याला घालवून आणि टाका दरवाजे लावून.

**मधु०ः**–अरेरे ! रत्नपाला, इतकी तुझ्या मनाची दुर्बल स्थिति झाली अं ! माझ्याबद्दलसुद्धां तुझ्या मनांत भलता संशय येऊं लागला. हा सारा कौटिल्याचा–पण त्याच्याकडे तरी काय बोल–तुझ्या नशिबाचे खेळ–तुझ्या घरीं तुझी अत्यंत पवित्र......

**कौटिल्यः**–जा आतां जास्त बोलण्यांत अर्थ नाहीं. तुझीं सगळीं कारस्थानं रत्नपालाच्या लक्षांत आलीं आहेत.

**वीट चेटः**–व्हा व्हा, बाहेर. नाहीं तर...... (जातात.)

[पडदा पडतो.

## ( अंक २ रा. समाप्त. )



क्रुतक्रुत्याः—काय ! माझ्या पोरीवर हा मंत्रातंत्राचा प्रयोग करणार आहे ? (पान ५०.)

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

[ पात्रें–धर्मदास व काकरव. ]

**काकरवः**– कां वृद्धोपंत, आतां बरी आहे कीं नाहीं आपल्याला नौकरी ? जे कोणी येतील जातील त्यांच्या जोड्यांच्या राशी संभाळीत देवडीवर बसावं. आणखी......

**धर्मदासः**– काकरवा, ज्या गोष्टीबद्दल आपण शोक करावा त्याबद्दल तूं आपला हंसतोस यालां काय म्हणावं ? यजमानांना आठ दिवसांत मुजरा करण्याचीसुद्धां संधि मिळेना याबद्दल मला अतिशय खेद होऊन असं मनांत येतं कीं एकदम इथून उठून जावं मथुरेला–पण......

**काकरवः**– पण काय ? आपण गेल्यावर या जोड्यांच्या राशी कोण संभाळील याची काळजी वाटते होय ? अहो वृद्धोपंत, ते तुमचे जुन्या स्वामिभक्तीचे दिवस गेले ! आतां तुम्ही इथून निघून मथुरेला गेलांत, नव्हे यमलोकाला जरी गेलांत तरी सुद्धां आपण कुठें आहां याची चौकशी करणार नाहीं. या दिवसांत स्वामीच्या तोंडापुरती स्वामिभक्ति आणि बाकी सगळी स्वोदरभक्ति लागते. धर्मदास आहे कीं मेला याची चौकशी तरी कधीं रत्नपालरायांनीं केली आहे का ?

**धर्मदासः**– खरं बुवा तूं म्हणतोस तें––

**काकरवः**– मग कां उगीच हाडं वाळवीत आहां ? जानात काशीयात्रेला निघून ! अगदीं जिवश्चकंठश्च मित्र मधुकरराव ते देखील जर आपल्या मित्राला सोडून गेले तर तुम्हांला काय इथें राहून करतां येणार आहे ?

**धर्मदासः**– काकरवा, तूं म्हणतोस तें का मला दिसत नाहीं ? पण थोरल्या शेटजींना इकडल्या हकीकतीचें सविस्तर पत्र लिहिलं आहे. त्याच

पत्रांची वाट पहातों आहें. आज दीड महिना झाला. आतां एक दोन दिवसांत त्यांचं उत्तर यावं...... ( एक दूत येतो. )

**दूतः**—कायहो पिंगला वेश्येचा वाडा हाच काय ?

**काकरवः**—अरे मूर्खा, पिंगलादेवीचा म्हण. नाहीं तर—

**दूतः**—काय देवीचा ?

**काकरवः**—होय. पिंगलादेवीचा प्रासाद हाच. तुझं काय काम आहे ?

**दूतः**—आमचे रत्नपालराय तिथें आहेत त्यांना आणि धर्मदासजींना हीं दोन पत्रं द्यायचीं आहेत.

**धर्मदासः**—काय तूं मथुरेहून आलास ? आण पाहूं तीं पत्रें. मी त्या पत्रांचीच वाट पहात होतों.

**काकरवः**— धर्मदासजी, मीही पण त्याच पत्राची वाट पाहात होतों. ( दूताकडून पत्रें घेतो. ) आणखी यापुढें या पत्राचा वाट काय होते तीही आपल्याला लवकरच समजेल. ( आपल्याशीं ) वा ! नशीब जोरावर असलं म्हणजे असं होतं. कौटिल्यरायांनीं सांगितल्याप्रमाणें हीं पत्रं तर हातीं आलींच. आतां तीं त्यांना देतांच बक्षिसी ठेवलेली. ( धर्मदासाकडे पाहून ) म्हातारडा लांब तोंड करून पहातो आहे पहा कसा ! (दूतास) अरे तूं आपला जामानिमा उतरून विश्रांति घे. हे तुझ्या जेवणाखाण्याची व्यवस्था लावून देतील. मी यजमानांना पत्रं देऊन कांहीं उत्तर असल्यास आणून देतों. धर्मदासजी, आपल्या पाहुण्याची व्यवस्था नीट ठेवा बरं का ! शिधासामग्री लागली तर मला सांगा. ( जातो. )

**दूतः**—धर्मदास तुम्ही का ? मला तर सांगितलं होतं कीं तीं पत्रं तुमच्याजवळ दे म्हणून, आणखी हे कोण ? जाऊं का यांच्या मागोमाग तीं पत्रं हिसकून आणायला ?

**धर्मदासः**—नको. बाबारे, त्याच्या मागोमाग जाण्याच्या भानगडींत पडूं नकोस. आधीं आतां तूं आंतल्या बाजूला पुष्करणीवर चल. मग सांगेन काय आहे तें. ( जातात. )

## प्रवेश २ रा.

( कौटिल्यापुढें दोन पत्रें पडलीं आहेत. काकरव उभा आहे. )

**कौटिल्यः**– वा ! काकरवा, तूं कामगिरी तर उत्तम बजावलीस. त्या दूताला इकडे बोलावून आण म्हणजे मी हें पत्र त्याला देतों आणखी तोंडीं काय सांगायचें तेंही सांगतों ( काकरव जातो. ) या अशा पत्रानं म्हातारा अतिशय कावेल यांत तर कांहीं शंका नाहीं. पण कावला म्हणजे आपण समजतों असाच परिणाम होईल कीं तिसराच परिणाम होईल ? तिसरा परिणाम काय होणार आहे ? आज नाहीं उद्यां त्याला आम्ही पत्रोपत्रीं ज्या थापा मारीत होतों त्या किती खोट्या हें कळणारच होतं. आणखी मग तरी आमची चैनबाजी बंद व्हायचीच होती. तेव्हां आपण केली ही युक्ति साधली तर आपल्याला पाहिजे तसं करायला येईल. न साधली तर इतकाच आपला लभ्यांश म्हणून स्वस्थ बसावं लागेल. एकाद्या आम्रवृक्षावरचं नेमकं अमकंच फळ मिळावं म्हणून केव्हां केव्हां साहस करून धोंडा फेंकावा लागतो. तो धोंडा बरोबर बसला तर फळ खालीं पडतं. केव्हां केव्हां तोच धोंडा आपल्या डोक्यांत बसतो. ( दूताला घेऊन काकरव येतो. ) अरे बाबा, रत्नपालरायांची आणि तुझी कांहीं भेट व्हायची नाहीं. त्यानीं हें पत्र मात्र तुला द्यायला दिलं आहे. हें तूं हरपालजींना दे, आणखी तोंडीं सांग कीं ते चार पांच दिवसांत इथून मथुरेला येण्यासाठीं निघणार आहेत. हें सांगायला विसरूं नकोस बरं का ? मुद्दाम तुला ताबडतोब पाठवतों आहें तो एवढ्याकरितांच. काकरवा, आतां मी सांगितल्याप्रमाणें याची रवानगी कर. धर्मदासाची आणि याची भेट होतां कामा नये.

**काकरवः**–ठीक आहे सरकार.( दूताला घेऊन जातो. )

**कौटिल्यः**–आतां आपण पुढील इमारत उभारायला सुरवात करावी. सुरवात ती काय करायची आहे ? पाया वगैरे तर चांगला भरला गेला आहे.

या गृहस्थानं आजपर्यंत थोडं थोडकं द्रव्य आणलं असं नाहीं. शिवाय इथें प्रारंभीं प्रारंभीं कांहीं थोड्या हुंड्या मोडल्या असंही नाहीं. त्याला तर पुरं वेड लागलं आहे. पण एक लचांड झालं आहे त्याला काय करावं? ही पिंगला वेश्येची कन्या असून पतिव्रतेच्याहीवर सोंग करूं लागली आहे. जसा रत्नपाल तिच्या पाशांत सांपडला आहे तशीच तीही त्याच्या पाशांत सांपडली आहे. तिनं आपल्या घरांतून वेश्येच्या घरांतले सगळे ढंग घालविण्याचा घाट घातला आहे. ती कोणाच्या नजरेला पडत नाहीं. माझं तर वारसुद्धां लागूं देत नाहीं. हें प्रकर्ण जर असंच वाढूं दिलं तर.........

**विदू०**:– (येऊन) कौटिल्यराय, आतां आपली या घरांत राहण्यांची सोय नाहींशी झाली बुवा! आतां आपला गाशा गुंडाळावा तेंच चांगलं.

**कौटिल्य**.– कोणी मीं?

**विदू०**:– तुम्हीं आम्हीं सगळ्यांनींच.

**कौटिल्य**:– तें हो कां?

**विदू०**:– अहो कां म्हणून काय विचारतां? इथली स्थिति काय तुम्हांला दिसत नाहीं? पण तुम्हीं आम्हीं तसे कसे जाऊं? गोचींड एकदां लागले कीं ते आपण होऊन गाईला कधीं सोडून गेले आहेत का? ते कोणी तरी तोडतोडून काढावे लागतात.

**कौटिल्य**:– तुमचे दृष्टांत तरी मोठे भयंकर असतात बुवा!

**विदू०**:– अहो प्राणांत होण्याची वेळ आली म्हणजे नुसते दृष्टांत सुचून उपयोग काय? (कृतकृत्या येते.) ह्या पहा महामायाबाई आल्या. यांची सुद्धां मति गुंग झाली आहे.

**कृत०**:– कौटिल्यराय, आपण करायला गेलों काय आणखी झालं काय?

**विदू०**:– आपली हत्तीण दाखवून चांगला धष्ट पुष्ट हत्ती जाळ्यांत पकडायला गेलों पण आपली हत्तीण मात्र हातची सुटली आणखी आपल्यावरच उलटून सोंडेचे तडाखे मारायला लागली एवढंच झालं नी दुसरं काय?

कृत०:– गप बसरे ! हें असंच चाललं तर आपल्याला चांगलाच विचार केला पाहिजे.

विदू०:– आतांपर्यंत कुठें आपण वाईट विचार केला होता ?

कौटिल्यः–कृतकृत्याबाई, आपण अशा हताश होऊं नका. आज तर मीं एक फारच नामी युक्ति केली आहे. ती युक्ति साधली तर मोठी बहार होणार आहे. पण ती काय, हें मी आपल्याला इथें सांगत नाहीं. एकीकडे सांगेन.

विदू०:–एकीकडे सांगा कीं दोहींकडे सांगा. आतां आपली पाटी आपल्या हाताला लागत नाहीं.

कृत०:– तूं इथून निघून जा कसा.

विदू०:– आतां आपण मलाच जा म्हणतां आहांत पण लवकरच जाऊं म्हणायला लागाल.

कृत०:– छे छे बाई ! ह्याच्यापुढें बोलण्याची सोय उरली नाहीं.

विदू०:–पुढें बोलायची सोय नाहीं तर मागं बोला. हा मी जातों ( जातो.

कृत०:–बरं झालं. गेली ब्याद. काय युक्ति केली आहे म्हणतां !

कौ०:–इथें नको चला सांगतों. तो कदाचित् आड उभा राहूनही ऐकायचा. कुठें तरी अगदीं एकांतांत जाऊं.

कृत०:–चला. ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

[ हरपाल पत्र वाचीत आहे. जवळ दूत उभा आहे. ]

हरपाल०:– माझा पोरगा एकदम इतका बावचळला ! त्या वेश्येला त्या वेश्येच्या कार्टीला धर्मपत्नीची उपमा देऊन तिला इकडे घेऊन यायला निघालों म्हणतो ? छे ! आतां आपण इथें राहण्याची सोयच उरली नाहीं.

देवा, मला कुठून बुद्धि दिलीस हीं या पोराला प्रवासाला जाऊं देण्याची ! चारसहा महिने हिंडून आला तर कांहींतरी ज्ञान मिळवून येऊन आपल्या व्यापारउदिमांत हुषार होईल या समजुतीनं मीं त्याला जाऊं दिलं आणि त्याचा हा परिणाम असा व्हावा अं! आपल्याला नव्यानूखऱ्या सुनेचं मुखावलोकन करण्याची इतकी लालसा झाली आहे तर मी तरी काय म्हणून संकोच करूं ? मी तिला घेऊन या दूताच्या पाठोपाठ निघतोंच. सुनेचे गुण पाहिल्याबरोबर आपल्याला तेव्हांच दिसून येईल कीं, ती जन्मानं कशीही असली तरी कर्मानं खरी खरी कुलीन आहे. जन्म हा दैवाधीन असतो परंतु योग्यता कर्माधीन असते. अरे कारट्या, हीं वाक्यं तूं लिहिलींस, त्याबरोबरच तुझे हात कां नाहीं गळून पडले ? आतां काय करावं ? हा बावचळलेला कारटा लिहिल्याप्रमाणें करायलाही चुकायचा नाहीं. कायरे त्यांनीं तुला तोंडीं काय सांगितलं, तुझ्या पाठोपाठ निघतों म्हणून ?

**दूतः**– होय सरकार.

**हरपालः**–करील. तो इतका बावचळलेला आहे तर तसंही करील. आतां आपण इथें राहून उपयोगी नाहीं. ज्या मथुरेंत इतक्या चांगल्या अब्रूनें दिवस काढले त्या मथुरेंत आपल्या देखत असलीं थेरं होऊं नयेत. तेव्हां आतां आपण निघून जावं दुसरं काय ? ( यशोदा येते. ) पण हिला यांतलं वारंसुद्धां लागूं देतां उपयोगाचं नाहीं. आपण जर अशा विचारांनीं वागलों नाहीं तर...

**यशोदाः**–पोराची कांहीं बातमी आली का ?

**हरपालः**– हो आली आहे. येईल आतां चार दिवसांनीं. पण त्याच्या आधीं आपणच तिकडे जाऊन त्याला घेऊन तीर्थयात्रा कराव्या असं माझ्या मनांत आलं आहे. मनांत आलं आहे, नव्हे निश्चय झाला आहे. सूनबाईला चारदिवस माहेरीं पोंचवून देऊं.

**यशोदाः**–म्हणजे ? हें काय आपल्या मनांत एकाएकीं आलं ? मला कांहीं समजत नाहीं.

**हर०:**—कां बरं? त्यांत समजायला काय कठीण आहे? काशीयात्रेला जाण्याचं मनांत आणलं त्यांत काय?

**यशोदा:**—पण इतक्या एकाएकीं?

**हरपाल:**—हें पहा, आधीं चांगले विचार मनांत क्वचित् येतात. त्यांत क्वचित् आले तर ते ताबडतोब अमलांत आणावे यांतच शहाणपण आहे. तूं आतां आपली आतां तयारीला लाग कशी.

**यशोदा:**—हें काय आपण म्हणतां आहां? मला कांहीं सगळं ठीक दिसत नाहीं. माझ्यापासून आपण कांहीं तरी चोरून ठेवताहांत.

**हरपाल:**—( एकीकडे ) आतां आपण हिच्याशीं जास्त बोलत राहिलों, तर हिला सगळं सांगावं लागेल. पण त्या सांगण्यापासून कांहींच फायदा नाहीं. ( उघड ) मी सांगतों त्याप्रमाणें तयारीला लाग जा. मीही पण कांहीं पैशाअडक्याच्या व्यवस्थेला लागतों. जारे मुनीमजींना सांग, कीं तुम्हांला ताबडतोब देवघरांत बोलावलं आहे म्हणून. ( दूत जातो. )

**यशोदा:**—देवा, हें काय हें?

**हरपाल:**—जें आहे तें आहे चल. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

[ पात्रें—कौटिल्य ]

**कौटिल्य:**—( स्वगत ) वा! दैव अनुकूल असलं म्हणजे सर्व कांहीं कसं उत्तम बस्तान बसतं! आपण अटकळ बांधल्याप्रमाणें साऱ्या गोष्टी घडून आल्या. त्या उल्लू रत्नपालानं ताबडतोब पत्र दिलं. बिचारा नुसता अंधळा झाला आहे. त्याला पिंगलेखेरीज कांहीं सुद्धां दिसत नाहीं. तिच्यापासून दोन घटका दूर केला कीं माशासारखा तळमळूं लागतो. आणखी मग काय वाटेल तें करायला सिद्ध होतो. दूताबरोबर पाठविलेल्या पत्रानं कार्य-

भाग केला तर आपण ताबडतोब आपलं कार्य साधण्यासाठीं इथें हजर असावं म्हणून आपण येऊन बसून त्या मुनीमजींशीं त्वयार्धं मयार्धं केलं, त्यामुळें सगळा ऐवज गुंडाळायाला सांपडला. आतां आपण मनांत आणलेला भारही कां भरूं नये? जातां जातां जमलं तर कांहीं वावगं नाहीं. काकरवाला पाठवून कुसुममालेला इकडे बोलाविली आहे. आली तर फारच बहार होईल. ती अल्लड पोरगी आहे. ही आलीच. वहिनी, आपण आलांत फार चांगलं झालं. माझा मित्र रत्नपाल अगदीं हातांतून सुटतो आहे. अशा वेळीं आपण जर चतुरपणा कराल तरच कांहीं होणार आहे. मधुकरानं आणि मीं त्याला ताळ्यावर आणण्याकरितां पुष्कळ श्रम केले. शेवटीं मधुकर त्रासून संतापून निघून गेला. माझीही तीच स्थिति व्हायची. पण मी कांहीं युक्ति करावी म्हणून आपल्याकडे आलों. आपल्यावर रत्नपालाचं अतोनात प्रेम तेव्हां आपण जर आतां उज्जनीला आलांत आणि आपली आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली तरच तो परत येण्याची कांहीं आशा, नाहीं पेक्षां......

**कुसुममाला:**—काय? आपण म्हणतां तरी काय भावजी?

**कौटिल्य:**—काय माझ्या नशिबीं आलं हें. पण आतां असं म्हणून कसं चालणार? वहिनी, रत्नपाल एका वेश्येच्या पाशांत सांपडून अगदीं मूर्ख बनला आहे. हरपालजींनीं त्याला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न करायचं सोडून त्यांनीं आपल्याला मुकाट्यानं माहेरीं पोहोंचवून काशीयात्रेला जाण्याचं काढलं. आतां आपण तरी माझ्या म्हणण्याप्रमाणें करा. आपली आणि त्याची दृष्टादृष्ट झाली कीं पुरे. तो ताळ्यावर येईल अशी माझी समजूत आहे. मात्र हें सगळं करायचं तें फार गुप्तपणानं, आणि मोठ्या चातुर्यानं केलं पाहिजे.

**कुसुम०:**—एकूण मीं आजपर्यंत बातम्या ऐकल्या त्या खऱ्या ठरल्या अं! त्या कोकिळेनं मला परवांपासून दोनदां सांगितलं, पण मला खरं वाटलं नाहीं.

पद [ चाल--कहिये जसोदासों. ]

जाति पती मज सोडुनी त्या समया ।
लागे चिंता जी हृदया ॥ ध्रु० ॥
व्यर्थ गमे परि ठरली सार्थी आतां ।
वार्ता ही परिसोनियां ॥ १ ॥

मग आतां मी काय करूं म्हणतां ?

**कौटिल्यः**– काय करायचं तें मीं आपल्याला सांगितलंच. आपण माझ्याबरोबर येऊन त्याच्या पुढें उभं राह्यचं. आपण जर दुसऱ्या कोणाला –भावाबिवाला घेऊन याल तर मात्र कांहीं जमायचं नाहीं. प्रकरण उलट चिडीलाच जाईल. आपण माझ्यावर पूर्ण विश्वास टाका. सती सावित्रीनं जसं सत्यवानाला यमापासून सोडविलं तसं आपण रत्नपालाला यमाच्या दाढेंतून ओढल्यासारखं होणार आहे. मधुकर त्याला सोडून गेला, पण मीं तसं केलं नाहीं. एकसारखा त्याच्या पाठीशीं राहिलों. अगदीं नाइलाज झाला तेव्हां आतां शेवटचा उपाय आपल्याकडून करवावा म्हणून इकडे......

**कुसुम०ः**– काय म्हणतां ? मी कोणाला न कळवितां बाहेर येऊं ? हें व्हावं कसं ?

**कौटिल्यः**– त्याशिवाय मला दुसरा इलाज दिसत नाहीं. आपल्या ठिकाणीं त्याचं प्रेम पहिल्यानं तर फारच होतं, तेव्हां न जाणो पुन्हां आपल्याला पाहिल्याबरोबर तें मागलं सगळं त्याच्या मनांत उभं राहून बुद्धि ताळ्यावर येईल.

**कुसुम०ः**– काय करावं मला कांहीं सुचत नाहीं. मी आपल्या भावाला-सुद्धां न कळवतां येऊं म्हणतां ?

**कौटिल्यः**– मी कांहीं कोणी परका आहें काय ? आपण एवढा विचार कसला करतां ? आपण त्याची धर्मपत्नी, त्याला परत आणण्याचा प्रयत्न करीत नाहीं तर मी तरी आतां कशाला त्याच्याजवळ राहूं ? ती राक्षसी

पिंगला त्याचं सगळं रक्त शोषण करून त्याला आपल्या घरांतून हाकून देईल. त्याच्या आंत त्याचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणखी मी सांगतों असाच प्रयत्न केला तर होणार आहे. पहा, आपल्याला मी जास्त सांगत नाहीं. पतिव्रतेचीं कर्तव्यं काय हीं मीं आपल्याला सांगायला पाहिजेत? आतां मी जातों. आपण परत घरीं जा. उद्यां प्रातःकाळीं याच ठिकाणीं मी एक बैलाची गाडी उभी करीन. सूर्योदय होईपर्यंत आपली वाट पाहीन. सूर्योदय होतांच मीही कुणीकडे तरी निघून जाईन. वहिनी, एकूण कोणी कुणाचं नव्हे हें खरं ना? वडील संतापून निघून गेले. मुनिमांकडून त्यांनीं उज्जनींतील सगळ्या सावकारांना पत्रं लिहिलीं कीं यापुढें आमच्या चिरंजिवांना एक कपर्दिकही देऊं नये. मधुकरासारखा जिवश्चकंठश्च मित्र त्याला सोडून चालता झाला. धर्मदास मोठा स्वामिनिष्ठ जुना नोकर तोही कुणीकडे गेला. आतां रत्नपालाला जवळचं द्रव्य संपलं कीं त्याला घालवायला त्या वेश्या सिद्ध होतील. तेव्हां त्याला आपलं असं समजणारा मीच काय तो असणार. ठीक आहे. जा आपण आणि मीही जातों. ( जातो )

**कुसुम०**:—काय मीं करावं? हे म्हणतात याप्रमाणें यांच्या बरोबर जावं? पण माझं विस्मरण झालं म्हणूनच असा नाद लागला ना? मग मी जाऊन काय होणार? हे म्हणतात सगळ्यांनीं त्यांना सोडलं आहे. तेव्हां तुम्ही तरी आतां सोडूं नका. मामंजी हें ऐकून वैतागून गेले, हे एकटे त्यांच्याजवळ आहेत. हे जर इतके जिवाला जीव देताहेत तर आपण तरी कां मागं घ्यावं? जावं इथून राहून काय उपयोग? हे म्हणतात त्याप्रमाणें लवकरच तिनं जर तिकडचा अपमान करून घालवून दिलं तर त्यावेळीं तरी आपण धीर द्यायला असावं हेंच ठीक.

पद [ चाल—देवा दये माझु. ]

**प्रीती अविकार निर्मला। नाहीं जगांत ॥**
**मेरूपरि कांतधी स्थिरा। भार्यानुरागिं।**
**होई परि केविं चंचला ॥ ध्रु० ॥**

काय वचनें । विरहकालीं । मज दिलीं ।
स्मृति कशी निमालि त्यांचि ।
कांता गमतें नवल मला ॥ १ ॥

---

## प्रवेश ५ वा.

[ पात्रें— कोकिला. ]

**कोकिला:—** कालपासून बाईसाहेबांची वृत्ति कांहीं चमत्कारिक झाली आहे. कांहीं तरी त्या माझ्यापासून सुद्धां लपवताहेत असं वाटतं. हें काय असावं? परमेश्वरा, काय या साध्वीवर विनाकारण प्रसंग आणले आहेस! काल रात्रीं त्यांनीं मला आपल्या शेजारीं निजूंसुद्धां नकोस म्हणून सांगितलं आजपर्यंत मला त्यांनीं कधीं असं टाळलं नाहीं. काल मध्येंच कुठें नाहींशा झाल्या होत्या. मीं विचारलं तर म्हणाल्या देवदर्शनाला गेलें होतें. पण अशा एकट्या कुठें जायच्या नाहींत. पुष्कळ विचारलं पण कांहीं बोलेनात. हें आहे तरी काय? मला आज कोणी सोबत नको, मी एकटीच निजणार असा हट्ट धरून बसल्या. आणखी मला तरी वेडीला काय बुद्धि सुचली. मी बरं म्हणून बाहेर निजलें ती गाढ झोंप लागली. आतां उशिरां जागी झालें पण त्या कांहीं उठलेल्या दिसल्या नाहींत. म्हणून हांका मारूं लागलें तर खोलीचं दार उघडं, आणखी त्यांचा पत्ता नाहीं. नेहमींसारख्या गिरिधारी लालाच्या काकडआरतीला तर नाहीं गेल्या? जाऊन पहावं आपण दुसरं काय? तिकडेच गेल्या असतील, दुसरीकडे कुठें जाणार? पण मला हांका मारल्यावांचून गेल्या असतील? का दुसऱ्या कोणाला नेलं त्यांनीं बरोबर? माझ्यावर रागावल्या तर नाहींत? पण असा विचार करीत बसून काय उपयोग? काकडआरतीला सुरवात झालेली दिसते. हा पहा नौबदीचा आवाज ऐकूं येऊं लागला, देवळांत जाऊन पहावं. ( जाते. )

---

## प्रवेश ६ वा.

[ स्थळ:—धर्मशाळा—कौटिल्य. ]

**कौटिल्यः**—आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं गोष्टी घडत आल्या. हिच्यापासून हिचे सगळे दागदागिनेही उपटले. काकरवाला कांहीं तरी काम सांगून पुढें लावून दिला. आज मला शेवटचा घाट जमवायचा. पहावं जमला तर नाहीं तर तो तिकडला वार आहेच. पण तो जमणं फार कठीण. पिंगला ही कांहीं इतर वेश्येसारखी नाहीं. ती आपल्या त्या कृतकृत्त्या मावशीचं कुठलं ऐकायला? ती आपल्याला पतिव्रतेंतली पतिव्रता समजते. पण त्याचा आतांच काय विचार? आतां प्रस्तुत काय होतं तें पाहूं या. ही भोळीभाबडी जशी आपल्या सांगण्याप्रमाणें एकटी आली तशीच पुढेंही वागणार नाहीं कशावरून? वागतें म्हणाली तर ठीकच. ( एका खोलीशीं जाऊन ) वहिनी, वहिनी, ( कुसुममाला दरवाजा उघडते. कौटिल्य खिन्न चेहरा करून व दुःखित स्वरानें ) वहिनी, आपले सगळे प्रयत्न व्यर्थ झाले. आपण तिथें जाऊन पोहोंचण्यापूर्वींच त्या दुष्ट स्त्रीनं त्याचा भयंकर अपमान करून त्याला घालवून दिलं आणि तो वेडा होऊन कुठें तरी गेला असं मला आतांच समजलं. हरहर! माझ्या मित्राची काय दशा ही!

**कुसुम०**:—हायरे कर्मा! काय माझं नशीब हें! पण भावजी, आतां तर त्यांचा शोध अवश्य केला पाहिजे. उज्जनींत गेलंच पाहिजे.

**कौटिल्यः**—आतां उज्जनींत जाऊन काय करणार? तो वेडा होऊन कुणीकडे तरी निघून गेला असला तर आपल्याला काय त्याचा तपास लागणार? आणि त्या वेड्याला परत आणून तरी काय होणार? छे आतां—

**कुसुम०**:—हें काय असं बोलतां हें? आतां तर त्यांचा अवश्य शोध करून परत आणलंच...

**कौटिल्यः**—कुसुममाले, ( कुसुममाला दचकते. ) तूं का वेडी आहेस ? नीट शुद्धीवर ये. ज्यानं तुझी पर्वा केली नाहीं तो वेडाच्या लहरींत तुला पुढें उभा तरी राहूं देईल ? आतां त्याचं कर्म आणि तो यांना सोडून आपण दुसराच मार्ग काढूं. अशी भेकड हरिणीसारखी भितेस कां ? मित्राच्या पत्नीचं रक्षण करणं हें माझं कामच आहे, तेव्हां तूं आणखी मी दुसऱ्या एकाद्या नगरींत जाऊन राहूं या. तूं कोणाला न विचारतां मथुरेहून निघून आलीस तेव्हां तिकडे तुझ्या नांवाला कलंक लागायचा तो लागलाच.

**कुसुम०**:—काय माझ्या नांवाला कलंक ?

**कौटिल्यः**—हो ! लोकांना काय ? कुलीन स्त्री कोणाला न विचारतां न सांगतां एकाएकीं घरून नाहींशी झाली म्हणजे वाटेल ते तर्क करतात, आणखी तर्कच खरे म्हणून जिकडे तिकडे बोभाटा करतात.

**कुसुम०**:—हायरे दैवा, एकूण माझी अशी भयंकर स्थिति झाली अं !

**कौटिल्यः**—हो झाली तर खरी, पण त्या स्थितींतसुद्धां हा कौटिल्य तुझं पूर्ण रक्षण करायला तयार असतां तूं अशी दीनासारखी कां बोलतेस ? ( पुढें होतो. )

**कुसुम०**:—भावजी, तुम्ही हें असं काय बोलायला लागलां ?

**कौटिल्यः**—तूं भोळी आहेस खरी, परंतु माझा हेतु काय हें तुला न कळण्याइतकी कांहीं तूं भोळी नाहींस. मग आतां का उगीच......
( हात पसरून पुढें होतो. )

**कुसुम०**:—तुम्ही मला काय समजतां ? मी कोण आहें ?

**कौटि०**:—लग्न झाल्यापासून चार सहा महिन्यांचे आंत रत्नपालानं टाकलेली परंतु माझं जिच्यावर अगदीं दृढ प्रेम आहे अशी प्रिया कुसुममाला तूं, कुसुममाले, तूं खरोखरीच कुसुममाला. तुला त्या मूर्खानं गळ्यांत बाळगायची ती निर्माल्यासारखी फेंकून दिली. पण मी तुला निर्माल्य समजत नाहीं. तुला मी...या कंठांत...

**कुसुम०ः**— दुष्टा मागें हो. तूं मला—

पद [ चाल—मोरिनिय लगन. ]

**कां अंध होसि अधमा । वदसी ।**
**पशुसमा । स्वकामा । मज निज कुटिल हृदय**
**दाविसि सोडुनि शंका । अंध० ॥ ध्रु० ॥**

**कौटिल्यः**—
**न करीं निराशा । पुरवीं मनीषा ।**

**कुसुममालाः**—
**करिसि घात । विश्वासा दाउनि । का ० ॥ १ ॥**

**कौटिल्यः**—
**कोणी न त्राता । तुज येथ आतां ।**
**विफल होय हा श्रम तव अवघा ॥ २ ॥**

वा ! संतापामुळें तूं तर फारच शोभतेस. पण प्रिये कुसुममाले, या संतापानं तुला कांहींसुद्धां फायदा होणार नाहीं. तुझी आतां स्थिति काय आहे याची तुला कल्पना तरी आहे ? तूं कोणाला न विचारतां न सांगतां कुणीकडे तरी निघून गेलीस यामुळें तुझीं माणसं तुला भ्रष्ट समजणारच. शिवाय तुझ्याजवळचे सारे दागिने आणि पैसाअडका माझ्या हातांत असल्यामुळें तुला तोही आधार नाहीं. काकरवाला एक तर मीं घालवून दिला आहे. शिवाय तो माझा हस्तक आहे. आतां अशा स्थितींत तूं काय करणार सांग. आरडाओरडा करशील तर ही धर्मशाळा अगदीं निर्जन आहे. कुत्रंसुद्धां तुझ्या संरक्षणाकरतां येणार नाहीं. आणखी तर काय ?

**कुसुम०ः**— भावजी, नका हो असले शब्द बोलूं. माझी परीक्षा पाहण्याचा आपला हेतु दिसतो आहे दुसरं कांहीं नाहीं.

**कौटिल्यः**— अरे वा ! तूं मला भोळी वाटत होतीस तशीही नाहींस. मला आळवायची भाषा बोलूं लागलीस; पण अशा भाषेनं काय होणार आहे ? जर मला आळवायचं असेल तर त्याला मार्ग एकच.

**कुसुम०**:–दुष्टा, असा कसा मित्रद्रोही झालास?

पद [चाल--कामिनी करेंद्रगामिनी.]

सौहृदा जयासि दावि हा। खल नीच
मायिक ॥ध्रु०॥
व्यसनीं जया। पाहोनिया। बहु क्लेश या।
स्त्री तयाचि केविं वांछि।
द्रोहि होई निंद्य महा ॥ १ ॥

**कौटिल्यः**–मित्राचं डोकं बिघडल्यावर त्याच्या पत्नीचं संरक्षण करायला सिद्ध झालेल्या मला जर तूं मित्रद्रोही म्हणूं लागलीस तर काय करायचं? तुला काय मी वाईट सांगतों आहें? तूं आणि मी कुठें तरी जाऊन सुखांत राहूं एवढंच सांगतों कीं नाहीं? आणि तें जर तू ऐकेनास तर तें तुला ऐकायला लावणं माझं काम आहे. (एकदम पुढें होतो.)

**कुसुम०**:– दुष्टा, मी पतिव्रता आहें. मीं आपल्या पातिव्रत्याला अनुसरून धर्मसंरक्षणाकरितां प्राण अर्पण करीन. परमेश्वरा धांव धांव आणि या कसायाच्या हातून या अनाथ गाईला सोडीव. (मूर्च्छित पडते, इतक्यांत काकरव कौटिल्याला हांका मारतो.)

**कौटिल्यः**–या लेकाला पुढें लावून दिला तो माघारीं कां आला? (काकरव येतो.)

**काकरवः**–कौटिल्यराय, रत्नपालरायांकडून येणारा एक दूत मला वाटेंत भेटला. तो मथुरेला आपल्याकडे चालला होता.

**कौटिल्यः**–रत्नपालाकडून दूत, रत्नपाल वेडा होऊन देशोधडीला लागल्याची बातमी आली आहे. बरं तो दूत कोण आणि कोणीं पाठविला आहे?

**काकरवः**–तो पहा पलीकडे बसला आहे.

**कौटिल्यः**–पण तूं कशाला आलास इथें? त्याला द्यायचा होतास इकडे पाठवून.

**काकरवः**– मला वाटलंच.........

**कौटिल्यः**– काय वाटलं?

**काकरवः**–काय वाटलं कोण जाणे, मी आपला त्याच्याबरोबर आलों. ( कुसुममालेकडे पाहून ) पण बाईसाहेबांची अशा अवस्था कशानं झाली?

**कौटिल्यः**– अरे रत्नपाल वेडा झाल्याची बातमी मीं त्यांना सांगितली त्यामुळें त्यांना थोडीशी मूर्च्छा आली आहे. आतां तूं तरी त्यांच्या नजरेला पडूं नकोस. नाहीं तर त्यांचं दुःख दुणावेल. ( काकरवाला घेऊन जातो. )

**कुसुम०**:–( इकडेतिकडे साशंक पाहून ) काकरव अगदीं ऐनवेळीं आला ही दैवाची केवढी खैर. पण आतां आपण इथें राहूं नये. आपला सगळा धीटपणा अंगीं आणून इथून निसटून गेलंच पाहिजे. मग परमेश्वर जिकडे वाट दाखवील तिकडे दाखवील.

पद [ चाल—अर्जुने उमज तरी.]

**दीनदुरितहर । प्रणतशुभंकर ।**
**व्यसन भयंकर । प्रभुवर गजवर ॥ ध्रु० ॥**
**वंचन खल करि । लांछन मम हरि ।**
**पतिहित आचरिं । याचिं हाचि वर ॥ १ ॥**

[ पडदा पडतो.

**( अंक ३ रा समाप्त. )**



कौटिल्यः—आतां तूं तरी त्यांच्या नजरेला पडूं नकोस, नाहींतर त्यांचं दुःख अधिक दुणावेल. (पान ३६.)

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

[ पात्रें— पिंगला व रत्नपाल. ]

**पिंगलाः**— इतका भोळा स्वभाव कधीं हित करीत नाहीं, घातच करतो. हें काय आपण केलंत? निदान मला सांगायचं होतं तरी कीं मी असं करतों आहें म्हणून.

**रत्नपालः**— मला जर आतां मथुरेला जायचंच नाहीं तर त्यांत काय वावगं झालं? शिवाय कौटिल्य माझा अत्यंत मित्र आहे. भलत्यासलत्याला नाहीं मीं ही कामगिरी सांगितली. प्रिये, मी तरी काय करूं? मला तुझ्या-वांचून एक क्षणभरसुद्धां करमत नाहीं. आणखी एक क्षणभर जर तूं मावशीकडे किंवा कुठें गेलीस तर मला माझ्या कुडींतला प्राण निघून गेला आहे असं वाटतं. आणि त्यामुळेंच ती कामगिरी मीं कौटिल्याला सांगितली.

**पिंगलाः**— कौटिल्य आपला मित्र असेल पण मनुष्याचं प्रेम आपल्या स्वतःवर जास्त कीं आपल्या मित्रावर जास्त? त्यांतून द्रव्य काय कुबुद्धि सुचवील याचा काय नेम आहे?

**रत्नपालः**— कौटिल्याच्या ठिकाणीं हें संभवतच नाहीं. प्रिये, तुझा माझा संगम कोणीं घडवून आणला? कौटिल्य जर नसता तर त्या मधु-कऱ्यानं मला हें स्वर्गसुख कधींच लाभूं दिलं नसतं. पण कौटिल्य पहा. प्रिये, मित्र असावा तर असा असावा. मधुकर इथें नुस्ता येईना. कौटिल्य माझ्याकरितां जनलज्जा, गृहप्रेम वगैरे सगळं झुगारून देऊन इथें राहिला. मला वाटतं त्या दोघांचीं नांवं उलटीं असायला पाहिजे होतीं. पण समज. कौटिल्यानं माझ्या द्रव्याचा अपहार केला आणखी मी अगदीं निष्कांचन झालों तर तुझ्या आणि माझ्या प्रेमांत अंतर येईल काय?

**पिंगलाः**—या प्रश्नाचं मी कांय उत्तर देऊं? माझ्यासारखीनं यावर उत्तर न देणं बरं नव्हे का? प्रसंगीं परीक्षा होईल ती खरी. पण आपण इतक्या विश्वासाच्या कामगिरीवर आपल्या मित्राला पाठविला हें कांहीं बरं नव्हे, असं मला राहून राहून वाटतं.

**रत्नपालः**—काय होईल? माझं द्रव्य तो......पण छे! त्याच्याबद्दल नुसता संशय घेणं सुद्धां चांगलं नव्हे. प्रिये, तुझं प्रेम माझ्यावर आहे कीं माझ्या द्रव्यावर आहे?

**पिंगलाः**—जें आपल्या अनुभवाला आलं असेल किंवा येईल तें खरं. तें मी तोंडानं काय सांगूं? आमच्यासारख्यांनीं आपल्या प्रेमाचं वर्णन तोंडानं करून सांगितलं तरी त्यांत खरेपणा कोणाला दिसणार नाहीं. पण आपण विचारतां म्हणून सांगतें कीं, मी जन्मानं असती परंतु कृतीनं सती आहें हें आपल्या आणि जगाच्या अनुभवाला आणून देईन. द्रव्य काय इथें लागेल तितकं आहे. असलं बोलणं मला शोभत नाहीं पण आपण प्रश्नच असा बिकट केला कीं, त्याचं उत्तर देणं मला भाग पडलं. जन्म आपल्या हातचा नसतो पण कृति आपल्या हातीं असते.

**रत्नपालः**—प्रिये, तुला माझ्या प्रश्नानं दुःख झालं. पण तूं वारंवार त्या द्रव्यासंबंधानं बोलूं लागलीस म्हणून सहज विचारलं. माझ्या मनांत कांहीं संशय आला म्हणून विचारलं असं समजूं नकोस. मावशी केव्हां केव्हां भलतंच येऊन बोलतात. तुला माझ्याकरतां त्रास होतो पण मी काय करूं? मी अगदीं वेडा झालों आहें. तुझा माझा विरह होण्याचा प्रसंग आला किंवा या मंडळींनीं आणला तर माझी काय अवस्था होईल ही कल्पनासुद्धां मला कशीशीच वाटते.

**पिंगलाः**—जें खरोखर घडणं कधींच शक्य नाहीं. त्याची कल्पना तरी कशाला करावी?

**रत्नपालः**—कौटिल्याला जाऊन बरेच दिवस झाले नाहींत? आज उद्यां इतक्यांत तो यावा.




कृतकृत्या:-- तुला ज्या कला आणि विद्या शिकविल्या त्या अशा शुंभाच्या नादीं लागून-　　( पान ६९ )

**पिंगलाः**— आतां कां त्याचा विचार ? केव्हां का येईनात ते.

**रत्नपालः**— आतां त्याचा विचार नको, तें बोलणं नको तर आतां एकादी सुंदर चीज म्हण. ही वेळ मोठी रमणीय आहे. या रमणीय वेळेचं वर्णन ज्यांत आहे अशी म्हण. आतांशा तूं गाण्याला बाहेर जात नाहींस आणि घरींही कोणाला ऐकवत नाहींस. मावशी तुला आजच बोलत होती ना ? बोलाव मंडळीला आणि गा थोडीशी.

**पिंगलाः**— मंडळीबिंडळी कोणी नको. मला मुळीं आतांशा गाणंच नकोसं झालं आहे. आपल्याकरितां गातें:—

पद [ चाल--श्याम भुजंगम कारी ]

**रात्रि गमे सुखदायी । शांतिमया ही ॥ ध्रु० ॥**
**विहगयुगें या समयीं होती ।**
**निद्रित निकटीं कुलायीं ॥ १ ॥**
**दलकरपाशीं धरुनि भृंगा ।**
**पद्मिनी मुदित होई ॥ २ ॥**
**हिंस्त्र पशूंना तेवीं स्तेनां ।**
**उद्यत करि ही अपायीं ॥ ३ ॥**
**दीन चकोरां विरहीं लोटी ।**
**दुःख अती त्यांसि देई ॥ ४ ॥**

( पद झाल्यावर कृतकृत्या मावशीचा कर्कश आवाज ऐकूं येतो. " काय करावं या कार्टीला ! पिंगले दार उघड " असें म्हणत दार उघडून विदूषकासह येते. )

**कृतकृत्याः**— अग पोरी, तुझं गाणं ऐकण्याकरतां शेंकडों लोक येऊन जातात. त्यांना तसंच परत जावं लागतं. कांहीं तरी त्यांना सबबी सांगतां सांगतां बुद्धि थकून जाते. आणि इथें मात्र तूं एकसारखी गात असतेस ? तुला म्हणावं तरी काय ? तुला सगळ्या विद्यान् कला शिकवल्या त्या अशा शुंभाच्या नादीं लागून......

**पिंगलाः**– मावशी, तूं कायन् कोणाला हें बोलतेस ? मीं तुला एकदां सांगितलंना कीं मीं त्या बैठकींत गाणार नाहीं म्हणून.

**कृत०ः**– गमणार नाहीं तर काय भीक मागणार ? आणि तूं तो काल तन्मणि कोणाला दिलास ? यांच्या......

**पिंगलाः**– मावशी तूं......

**कृत०ः**– तूं न् मी म्हणजे ? मला अशी दटावतेस कीं काय ? मी तुझ्या अशा दटावणीला भिईन कीं काय ? जाहो तुमच्याकडे खालीं कोणी आलं आहे त्यांना भेटून या. मला हिच्याशीं कांहीं बोलायचं आहे. ( रत्नपाल जातो. ) बोल ! कोणाला तो तन्मणि दिलास? या गृहस्थाचे कर्जदार आतां इथें मागायला येतील त्यांचीं तोंडं बंद करण्याकरतां तूं आपले दागिने देणार कीं काय ?

**पिंगलाः**– मावशी, तूं जर त्यांना असे अपमानाचे शब्द बोलशील तर मी एक क्षणभर सुद्धां या घरांत राहणार नाहीं.

**कृत०ः**– तर काय भीक मागणार ?

**पिंगलाः**– तें माझ्या नशिबीं असलं तर तूं तरी काय करणार ?

**कृत०ः**– अग कारटे, तूं मला या वेदांताच्या गोष्टी शिकवणार ?

**विदू०ः**– बाई, तुमच्यासारख्यांना या वयांत वेदांताच्या गोष्टी सांगायच्या नाहींत तर सांगायच्या तरी केव्हां ?

**कृत०ः**– गप बसरे मूर्खा, तुझीं चारगटपणाचीं भाषणं ऐकून हंसायची ही वेळ नाहीं.

**विदू०ः**– पण गांवांतले सावकार रत्नपालाला ओढायला आले आहेत त्यांची त्रेधा पाहून तर हंसायची वेळ आहे ?

**पिंगलाः**– काय ?

**विदू०ः**– खालीं जाऊन पहा म्हणजे काय तें समजेल.

**पिंगलाः**– असं काय ? ( जाते. )

क्रुत०:–ही कारटी आणखी एखादा दागिनो देते कीं काय ? जाऊं दे बाबा, आतां मात्र भयंकर वेळ आला. ( जात. )

विदू०:– लोकांच्या घरांत अशा किती भयंकर वेळा आल्या तेव्हां तर तुमच्या घरांत ते दागिने आले. ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

[ पात्रें– काकरव. ]

काक०:–आज कांहीं तरी इथला रंग निराळा दिसतो आहे. हे लेकाचे डोलंमिश्र वीटचेट आपापसांत काय कुजबुजत आहेत कांहीं कळत नाहीं. कृतकृत्येचे आणि कौटिल्यरायाचे एकांत तर दर घटकेस होतात. कांहीं तरी मोठे बेत चालले आहेत. जबरदस्त कारस्थान असावं. मथुरेहून आणलेली पेटी तर माझ्याकडून इथें आणवून त्या महामाया बाइच्या खोलींत ठेववली. पुन्हां मला त्या घरांत जाऊन नीज म्हणून सांगितलं. याचा अर्थ काय ? आपण थोडा तपास करावा. ( विदूषक येतो. )

विदूषकः– कां काकरव महाराज, आतां आपण काय करणार ?

काक०:– म्हणजे काय ?

विदू०:– आमच्या चामुंडा देवीला बळी दिला होता तो आतां देवळाच्या बाहेर फेंकून दिला म्हणजे त्याच्या पाठोपाठ कावकाव करीत जाणार कीं नवा बळी येतो त्याच्या भोंवतीं कावकाव करीत बसणार ?

काक०:– आपल्याला कांहीं हें तुमचं भाषण बरोबर समजत नाहीं.

विदू०:– समजत नसलं तर मी समजावून सांगेन. पण माझं ऐकाल तर या नव्या बळीचा नाद सोडून आपले आल्या वाटेनं मथुरेला जा कसे. हा नवा बळी फार दिवस तर काय पण फार घटकासुद्धां देवळांत टिकायचा नाहीं. जुना तर आज रात्रींच फेंकून दिला जाईल. ही पाहा आमची

चामुंडादेवी कशी फणफणत येते आहे. तिच्या तडाक्यांत नका आतां उभे राहूं. ( जातात. )

**कृत०:**– कांट्यानं कांटा काढल्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. जोंपर्यंत पायांतला कांटा निघाला नाहीं तोंपर्यंत दुसऱ्या कांट्यानं तिथें उकरलंच पाहिजे. हा कौटिल्य आपल्याला मोठा लबाड म्हणवितो पण कसा दोन शब्दांत फसला आहे ! आपण महाकपटी आणि धूर्त म्हणून आढ्यता आणणारे सहज एकाद्या बारीकशा ......

**कौटिल्यः**– ( येऊन ) कृतकृत्या मावशी, आपण सांगितल्याप्रमाणें सगळी व्यवस्था झाली. आतां तर माझ्यावर आपला पूर्ण भरवंसा आहेना ?

**कृतकृत्याः**– मला बाई आज रात्रीं या मेल्याला घरांतून घालविल्या-खेरिज चैन पडायचं नाहीं. चार दिवस याला जर आणखी राहूं दिला तर ही कारटी सगळं धुवून काढील. करायला गेलें काय आणखी झालं काय ? आतां मी जातें आणि त्या पोरीजवळ कपाळकटकट करीत बसतें. त्याला तुम्हीं बोलावलं आहे आणि मला पिंगलेजवळ दोन शब्द बोला-यचे आहेत असं सांगून इकडे पाठवून देतें. तो इकडे आला कीं काय वाटेल तें करा. पण त्याला घराबाहेर हांकून द्या. लांब कुठें तरी नेऊन सोडा. पहिल्या दिवसासारखं पाजायची तजवीज करा, काय वाटेल तें करा. पण आजच्या रात्रीं तो इथें नको. एवढी कामगिरी करा. मग पुढचें काय तें पाहूं. ती पेटी कुठें ठेवली ?

**कौ०:**–अगदीं आपल्या खोलींत नेऊन ठेविली आहे. आपण सांगितली तिथें.

**कृत०:**– ठीक आहे. हें आतां दुसरं काम करा. हा कांटा काढून टाका.

**कौ०:**– हेंच तर मोठं कठीण आहे.

**कृत०:**– त्याची जागा घ्यायचं काम सोपं व्हायला पाहिजे तर तें केलंच पाहिजे.

**कौ०:**– ठीक आहे. त्याला लावून द्या इकडे. करतों तजवीज. आपल्या मंडळीला मात्र तयार असायला सांगा.

**कृत०ः**—मंडळी अगदीं तयार आहे. तुम्ही इशारत द्यायचा अवकाश. मी जाऊन त्याला लावून देतें आणि तिला गुंतवून ठेवतें. काम कसं गुपचूप झालं पाहिजे.

**कौ०ः**—अगदीं गुपचूप करतों ( कृतकृत्या जाते. ) काय युक्ति करावी ? आतां सामदामाची अवश्यकता नाहींच. तिसरा उपायच खरा. या थेरडीला खूष करायची असली तर हेंही केलंच पाहिजे. आतां ती त्याला पाठवून देईल. हा आलाच.

**रत्नपालः**—कायरे बुवा कशाला बोलावलंस ? मी आपल्या प्रियेला आपल्याबरोबर मथुरेला येण्यासाठीं मन वळवीत होतों. मुनीमजींनीं तुला दाद दिली नाहीं तेव्हां स्वतः जाण्यावांचून मार्गच नाहीं. पैशावांचून कांहीं चालत नाहीं. पण ती मला उलट म्हणते आपण तिकडे जाऊं नका. पैसा आपल्याजवळ पुष्कळ आहे. अहाहा किती ती थोर व उदार ! पण तिच्या पैशांवर मी इथें कसा राहूं ? तिला सोडून तर जातां येत नाहीं.

**कौ०ः**— रत्नपाला, तूं थोडा शांतपणानं माझ्याशीं बोल. आतां तूं पिंगलेचा नाद सोड. मी काय सांगतों तें ऐक. माझी समजूत अर्थात् मीं मथुरेला गेल्यावर जें मला कळलं आणि त्यावरून माझी खात्री झाली ती तुला सांगतों. आपल्या मित्राबद्दल असं बोलण्याची पाळी आली, पण आतां काय करायचं ?

**रत्नपालः**—उगाच लांबलचक आणि मोघम बोलूं नकोस. माझ्या प्रियेला, पिंगलेला सोडून तुझ्याशीं वायफळ बोलायला मला वेळ नाहीं. कोण मित्रन् काय आहे ?

**कौ०ः**—बाबारे, नाजूक गोष्टी एकदम बोलून कसं चालेल ? पण तूं बोलच म्हणतोस तर बोलतों ऐक. मधुकराला तूं इथून घालवून दिल्यावर तो मथुरेला गेला. तिथें हरपालजी काशीयात्रेला गेले हें ऐकतांच त्या मुनीमजींशीं त्वयार्धं मयार्धं करून काय सगळं होतं नव्हतं तें लांबवलं.

**रत्नपालः**—काय मधुकरानं असं केलं ? छे ! ही गोष्ट तर मला खरी वाटत नाहीं. मग तूं ती आल्या दिवशींच नाहीं कां मला सांगितलीस ?

**कौ०ः**—कशी सांगूं? त्या कृतकृत्येच्या आणि पिंगलेच्या देखत सांगूं ? तूं माझी एकांतांत भेटच घेईनास त्याला मी काय करूं ? अरे, त्यानं तुझ्या द्रव्याचा अपाहार केला इतकंच नव्हे तर ........

**रत्नपालः**— तर काय ?

**कौ०ः**—तुझ्या धर्मपत्नीचा अपहार करण्याची बुद्धि धरून तिला तिच्या माहेरून काढून कुणीकडे तरी निघून गेला आहे.

**रत्नपालः**—काय हें ? कौटिल्या, तूं म्हणतोस तरी काय ?

**कौ०ः**—जें मीं मथुरेला ऐकलं आणि त्यावरून माझी खात्री झाली तें मीं तुलां सांगितलं. आतां आणखी तुला सांगतों कीं, तूं अगदीं निर्द्रव्य झाला आहेस म्हणून आज या घटकेला पिंगलेनें आणि कृतकृत्येनं तुला घालवून देण्याचा बेत केला आहे. शहाणा असलास तर इथूनच चालशील.

**रत्नपालः**—मला घालवून देण्याचा बेत केला आहे ? आणि पिंगलेची त्याला संमति आहे ?

**कौ०ः**—पिंगला म्हणजे तूं काय समजतोस ? किती झालं तरी ती वेश्येची कन्या.........

**रत्न०ः**— खबरदार ! तिच्यासंबंधानं जर अवाक्षर जर असं बोलशील तर तुझं माझं पक्कं भांडण होईल. मीच तिच्याकडे जाऊन तिला ......

**कौ०ः**—पण आतां तुला तिच्याकडे कोणी परत जाऊं दिलं तर जाणार ना ? आतां आपली जाण्याची दिशा दाराबाहेरची परत घरांत जाण्याची नव्हे.

**रत्न०ः**—कोण म्हणतो कोण असं ?

**वीटचेट वगैरे मंडळी** ( येऊन ):—आम्ही म्हणतों.

**रत्न०ः**—कोण तुम्ही ? काय म्हणतां ?




वीटचेटः-- पिंगलादेवींनीं आम्हांला असा हुकूम केला आहे कीं तुम्हांला घराच्या बाहेर-नव्हे शहराच्या बाहेर हाकून द्यायचं. ( पान ७५ )

**वीटचेटः**— पिंगलादेवींनीं आम्हांला असा हुकूम केला आहे कीं, आतां तुम्हांला त्यांच्याकडे परत जाऊं द्यायचं नाहीं. घराच्याबाहेर—नव्हे शहराच्या बाहेर हाकून द्यायचं.

**रत्न०**:—काय ?

**कौ०**:—सांगितलं हेंच.

**रत्न०**:—खोटं आहे. मी तिच्याकडे जाऊन तिला विचारतों.

**कौ०**:—मित्रा, हे बोलताहेत हें अगदीं खरं आहे. तूं आतां आपली उगीच विटंबना करून घेऊं नकोस. चल मी तुझ्याबरोबर येतों. तूं आणि मी मुकाट्यानं जाऊं. हे लोक कांहींसुद्धां करायला मागं घ्यायचे नाहींत. त्यांना पिंगलेचा हुकूमच तसा आहे.

**रत्न०**:—हा मी आंत जाणार, करा काय तें.

**वीटचेटः**—पहाच तर मग—( त्याच्या अंगावर धांवतात. त्याला पकडतात व उचलून त्याच्या नाकावर रुमाल धरतात. तो बेशुद्ध होतो. )

**कौ०**:—चला आतां थांबूं नका. आतां बाहेरला पाय काढा. चांगला पांच सात कोसांच्या पल्ल्यावर नेऊन सोडा. ( त्याला घेऊन जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

[ **पात्रें**— कुसुममाला. ]

**कुसुम०**:— परमेश्वरा, काय ही माझी स्थिति केलीस ? त्या चांडाळानं मणिमंगळसूत्राखेरीज कांहीं ठेवलं नाहीं. या गळ्यांतल्या तायत्यांत पुतळी नसती तर भिक्षाच मागायची पाळी होती. त्या धर्मशाळेंतून कशी बशी निसटलें आणि परत मथुरेला जायला म्हणून निघालें पण वाट चुकलें ती कोणीकडे चाललें तें समजेना. वाटेंत कोणी सोबती नाहीं. आणखी कोणाकडे विचारायला गेलें कीं जें तें कसंसंच माझ्याकडे पहायला लागतं.

त्यामुळें जीव घाबरून कोणाला विचारूं नये, कीं पुसूं नये, आपलं एकादं मोठंसं नगर लागेपर्यंत चालावं असं वाटलं. त्या वाण्यानं होते नव्हते ते पैसे घेऊन आणखी मला आपल्या घरीं चलण्याविषयीं आग्रह करूं लागला. तेव्हां त्याच्या पासले ते तांदूळ नकोत आणखी कांहीं नको असं पाहून तिथून पाय काढला. काय हीं आम्हां बायकांची स्थिति ! हा मोठा श्रीमंताचा वाडा दिसतो आहे. इथें रातोरात जागा मिळाली तर पाहूं. मग सकाळीं उठून जाऊं कुठें तरी. पण मला असं काय बरं होतं आहे चक्कर आल्यासारखं ? अंमळ इथें बाजूला जाऊन बसावं तरी. ( पिंगलेच्या घराजवळ जाऊन बेशुद्ध पडते. )

**पिंगला:**–( रागानें ) काय त्यांना तूं आपल्या लोकांकडून घालवून दिलंस ?

**कृतकृत्या:**–होहो हांकून दिलं. त्याच्या पायीं तूं जर सगळ्या घरादाराचें वाटोळं करण्याची पाळी आणलीस तर त्याला हांकून देऊं नको तर काय करूं ? अगदीं हांकून दिलं. कुठला दळभद्र माझ्या घरांत शिरला ? तो राजपुत्र चांगला .........

**पिंगला:**– तूं त्यांना हांकून दिलं नाहींस तर मला हाकून दिलंस असं समज. मी आतां याच पावलीं त्यांच्या मागोमाग जाईन. जी त्यांची वाट तीच माझी वाट. तूं आणखी हें तुझं घर खुशाल घेऊन बैस.

**कृतकृत्या:**–काय तूं त्याच्या मागोमाग जाणार? आणखी चांगलं घरदार सोडून भिक्षा मागणार ?

**पिंगला:**– हो, अशा तऱ्हेनं पोट भरण्यापेक्षां भिक्षा मागितलेली काय वाईट ? तूं आतां माझी आशा सोड. मीं आपले पंचप्राण त्यांना वाहिले आहेत.

**कृत०:**–आपल्या धंद्यांत असे प्राण किती तरी असतात. जो येईल त्याला वाहायचे ते.

**पिंगला:**–तूं आतां माझी आशा सोड. मी आतां परत येईन ती त्यांना घेऊन तरी येईन, नाहींतर......

**कृत०**:—तुझ्याच आज्ञेनं त्याला हांकून दिला असा त्याचा समज करून दिला आहे.

**पिंगला**:—माझ्या आज्ञेनं त्यांना हांकून दिलंस असा त्यांचा समज करून दिलास ? अरेरे ! काय हा चांडाळपणा !

**कृत०**:—त्याला इथून घालवायला आणि तो इथें फिरून न येईल असं करण्याला दुसरा काय उपाय होता ? आतां तूं दृष्टीस पडलीस कीं तो तुला...

**पिंगला**:—मावशी, तूं हें काय केलंस ? त्यापेक्षां मला जिवें कां नाहीं मारलंस ? अरेरे ! प्रियकरा, आपल्याला या लोकांनीं घालवलं तेव्हां काय वाटलं असेल ? ठीक आहे. आतां तर माझा निश्चय ठरला. मी त्यांच्या चरणाजवळ जाईन. खरी हकीकत त्यांना सांगेन. मग त्यांनीं मला ठार मारलं तरी हरकत नाहीं. आतां तर मी चाललेंच. या अशा रात्रीं मी एकटी जाणार. काय माझं व्हायचं असेल तें होईल. ( पिंगला दार उघडून बाहेर पडणार तों कुसुममाला मूर्च्छित अशी तिच्या दृष्टीस पडते. )

**पिंगला**:—हें कोण बरं इथें दाराशीं पडलं आहे ? ( पाहून ) कोणी तरी स्त्री आहे. कोण आहेरे तिकडे ? पाणी घेऊन या बरं ! ( नोकर पाणी घेऊन येतात. ) कुणी तरी कुलीन स्त्री आहे. बाई, तुम्ही इथें अशा कां निजलां ? पण ही बोलत नाहीं. मूर्च्छा तर येऊन नाहीं पडली ? कोणी असो बिचारी. हिला आंत नेऊन शुद्धीवर आणणं पहिलं काम ! कोण आहेरे तिकडे ? दोघी तिघी दासींना बोलावून आणा. तुम्ही नका हात लावूं तिला. ( दासी येतात. ) उचला या स्त्रीला आणि आंत माझ्या पलंगावर नेऊन निजवा. आणि एकजण कुणीतरी वैद्यबुवांना बोलवायला जा. अनाथ स्त्रीचा परामर्ष घेतल्याखेरीज पुढं कसं जावं ? कोण असेल आणि काय संकटांत पडली असेल याचा नेम नाहीं. ( दासी उचलून नेतात. )

---

## प्रवेश ४ था.

[ पात्रें—धर्मदास, विदूषक.]

**विदूषकः**—आजपर्यंत आम्हीं आपल्याला वृद्धोपंत, बुढ्ढोपंत वगैरे वाटतील तीं नांवं घेऊन हांका मारीत होतों पण आजपासून तुमच्या खऱ्या नांवानं हांका मारणार बरं ?

**धर्मदासः**—म्हणजे काय ?

**विदू०ः**—म्हणजे आम्ही तुम्हांला आतां धर्मदास म्हणणार.

**धर्म०ः**—कां बरं ? आजच काय विशेष झालं ?

**विदू०ः**—आतां तुम्ही खरे धर्मदास झालां.

**धर्म०ः**—म्हणजे ?

**विदू०ः**—तुमचं हें म्हणजे मोठं कठीण आहे बुवा. तुम्हांला कांहीं सांगायला जा तुमचं आपलं तें लांबलचक म्हणजे आहेच. म्हणजे काय विचारतां ? आजपर्यंत तुम्ही अधर्मदास होतां आज धर्मदास झालां.

**धर्म०ः**—तुमचं बोलणं कांहीं बुवा आम्हांला समजत नाहीं.

**विदू०ः**—अन् तुम्हांला समजत आहे काय तर एवढंच समजायचं आहे ? या वेश्येच्या देवडीवर ती टाकील तो तुकडा खाऊन अधर्मानं वागणाऱ्या आपल्या यजमानाचे दास म्हणून तुम्ही तिच्या घरीं येणारा जाणारांच्या जोड्यांच्या राशी संभाळत बसत होतां, पण आयत्या वेळीं तुम्हांला तिथून काढून त्याच जोड्यांनीं तुमच्या त्या नामधारी यजमानांना घराबाहेर घालवून दिलं हें तुम्हांला कुठें समजलं? सांगा आतां. ते तुमचे यजमान गेले. आतां तुम्ही कोणाचं दास्य करणार ? आतां त्या दास्याबद्दल धर्मसुद्धा आपल्याला मिळणार नाहीं. गांवांत धर्म मागून इथें दास्य करूं म्हणाल तर तेंसुद्धां करूं देणार नाहीं.

**धर्म०ः**—यजमान गेले ? त्यांना घालवून दिलं ? म्हणतां तरी काय ?

**विदू०**:—अहो जें म्हणायचं तेंच म्हणतों दुसरं काय ? आतां तरी आपण गाशा गुंडाळा. नाहींतर त्या जोड्यांतले जे कांहीं उरले आहेत त्यांचा आपल्यावर प्रयोग होऊन यजमानांचा मार्ग सुधारावा लागेल. मी आपला उगीच ही तुम्हांला पूर्व सूचना करायला आलों आहें.

**धर्म०**:— यजमान गेले म्हणतां ? त्यांना घालवून दिलं ? कुठें घालवून दिलं ? कोणीं घालवून दिलं ? कसं घालवून दिलं ?

**विदू०**:—मसणांत घालवून दिलं. मरीआईनं घालवून दिलं. कसं घालवून दिलं तें क्षणाभऱ्यानं स्वतःवर प्रयोग होऊन समजेल. तेव्हां त्या प्रश्नाचें उत्तर मी देत नाहीं. तो प्रयोग होणं तुम्हांला आवडणार नाहीं म्हणून तुमची कींव करून तुम्हांला सावध करायला आलों. आतां आपण इथून मुकाट्यानं जाल तरच त्यांत शहाणपण आहे.

**धर्म०**:—शिव शिव ! एकूण शेवटीं हा प्रसंग आला हं ! आणखी एवढ्याकरतां मला आज पहाऱ्यावर बसूं दिलं नाहीं काय ?

**विदू०**:—तुम्हांला बसूं दिलं नाहीं यांत तुमचं हितच झालं ! दुहेरी हित झालं.

**धर्म०**:—तें कसें ?

**विदू०**:—यजमानांच्याबरोबर तुम्हांला जोडे खावे लागले नाहींत हें एक हित. आणखी त्यांच्या मागोमाग आतां भटकायला नको हें दुसरं हित. आतां आपला सरळ घराचा मार्ग सुधारा.

**धर्म०**:—मला तुमचं बोलणं कांहीं समजत नाहीं बुवा.

**विदू०**:—आतां निदान तें समजून घ्यायला इथें तरी राहूं नका. चला दुसरीकडे माझ्याबरोबर म्हणजे मी तुम्हांला नीट समजावून सांगतों. चला.

**धर्मदास**:—चला. ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

[पात्रें– कुसुममाला आणि पिंगला.]

**कुसुम०:**–बाई, तुम्हीं माझ्यावर किती तरी उपकार केलेत ? मला घरांत आणून इथें निजवलंत, दूध पाजलंत पण काय असेल तें असो. मला इथें राहूं नये. मी आपली होती तिथेंच बरी होतें असं वाटतं. मी तुम्हांला मघांपासून विचारतें आहें, पण आपण त्याचं उत्तर देत नाहीं. तुम्ही कोण आणि इतकी काळजी कां घेतली ?

**पिंगला:**– बाई, तुम्ही स्वस्थ असा. म्हणजे मग कांहीं दिवसांनीं तुमच चित्त शांत झालं म्हणजे मग काय सांगायचं तें सांगेन. तुम्हीं कोण काय कुठून आलां हें मलासुद्धां विचारण्याची इच्छा झाली आहे. पण तुम्हांला त्रास होऊं नये, म्हणून मी विचारीत नाहीं.

**कुसुम०:**– मला काय विचारणार ? मी एक हतभागी स्त्री आहें. बाई, मीं आपली कर्मकथा तुम्हाला सांगावी असं एकदां वाटतं आणखी एकदां वाटतं सांगूं नये. इतकंच नाहीं पण तुमच्या इथें क्षणभर सुद्धां राहूं नये असं वाटतं. तुम्हीं इतके माझ्यावर उपकार केलेत पण असं कांहीं चमत्कारिक मन झालं आहे.

**पिंगला:**– ( एकीकडे ) ही बाई असं कां बरं बोलते ? आपण हिला कांहीं तरी प्रश्न विचारून बोलण्यांत गुंतवावी म्हणजे हिच्या मनांत हे विचार येणार नाहींत. ( उघड ) बाई, तुमची काय हकीगत आहे, तुम्ही इकडे कशा आलां सांगा तर खरं म्हणजे तेवढंच तुमचं मन शांत होईल.

**कुसुम०:**– बाई, माझी हकीगत चित्ताला शांति देणारी नाहीं. उलट चित्ताला क्षोभच करणारी आहे. तुम्ही सांगाच म्हणतां तर सांगतें. मी मथुरेच्या एका सावकाराची सून आहें.

**पिंगला:**– काय तुम्ही मथुरेच्या ( स्वगत ) हें ऐकतांच मला चमत्कारिक कां बरं वाटायला लागलं ?

**कुसुम०:**– माझे मामंजी फार श्रीमान् आणखी...

**पिंगलाः**– आणखी काय? तुम्हांला त्रास होत असेल तर नका बोलूं.

**कुसुम०:**– मी अगदीं उपवर झालें तेव्हां बाबांनीं चांगलं स्थळ पाहून लग्गीन केलं. लग्न झाल्यावर चार सहा महिने आम्ही मोठ्या सुखांत होतों. पण...

**पिंगलाः**– (स्वगत) ही आतां काय बरं सांगणार? (उघड) पण काय म्हणालां?

**कुसुम०:**– पण काय? माझ्या दुर्दैवाला तें पाहवलें नाहीं. तिकडच्या स्नेह्यांच्या चिथावणीनं एकदम प्रवासाला जायची इच्छा झाली. फार दिवस ती इच्छा होतीच. पण माझ्यावर प्रेम जडल्यामुळें ती दबली होती.

**पिंगलाः**– पुढें?

**कुसुम०:**– पुढें काय? माझ्या कानीं तें आलं तेव्हां मीं विचारलं. पण तसं कांहीं नाहीं, उगीच स्नेह्यांच्या आग्रहाकरतां हो हो म्हणतों आहें, पण मी कांहीं जाणार नाहीं असं मला आश्वासन दिलं. आणि दुसरे का तिसरे दिवशीं एकदम जाण्याचा निश्चय झालेला माझ्या कानीं आला. माझी कशी तरी समजूत केली पण माझ्या जिवाला तेंव्हांच हुरहूर लागली.

**पिंगलाः**– हुरहूर लागण्याचं कारण?

**कुसुम०:**– उज्जनीला जायचं असं ऐकलं आणखी माझ्या मैत्रिणी म्हणाल्या कीं उज्जनीच्या बायका कौटाळणी असतात. त्या तरुण आणखी श्रीमंत......

**पिंगलाः**– म्हणून तुम्हांला हुरहूर लागली काय? बरं पुढें?

**कुसुम०:**– आणखी पुढें काय सांगूं? पुढें अशाच बातम्या यायला लागल्या कीं कोणी तरी चांडाळणीनं तिकडे आपल्या पाशांत गुंतवलं...

**पिंगलाः**– (स्वगत) अरे देवा, हें तर सर्वस्वीं मला लागतं. काय त्याचं लग्न झालं होतं, आणखी ही त्याची पत्नी?

**कुसुम०:**– आणखी ती म्हणे फार दुष्ट कौटाळीण वेश्या......आणखी तिच्या घरीं कीं हो जाऊन राह्यचं झालं.

**पिंगला:**– ( स्वगत ) पण लग्न झालेलं त्यांनीं मला सांगितलं नाहीं. तेव्हां त्यांची नसावी ही गोष्ट. पण आपण विचारूं तर खरं त्यांचे स्नेही कोण होते ते. ( उघड ) तुमच्या पतीचे स्नेही त्यांच्याबरोबर होते त्यांनीं कांहीं बोध केला नाहीं काहो ?

**कुसुम०:**– बाई कसले स्नेही नी कसलं काय? एक स्नेही तर शुद्ध चांडाळ. त्यानंच त्यांना......मेल्याचं नांव मनांत आलं कीं अंगाचा थरकांप होतो. मेला लहानपणापासूनचा स्नेही पण त्यानंच...मेल्याची पुढली कृति मनांत येऊनच आईबापांनीं नांव ठेवलं कोणास कळे! पण त्याच्याकडे काय दोष ? त्या चांडळणीनं आपले पाश पसरून त्यांत जर धरलं नसतं तर त्याचं काय चाललं असतं ? काय तरी बाई बायका चांडाळणी असतात ! आपल्या सुखाकरतां दुसऱ्याचा सत्यानाश होतो हें त्यांच्या मनांतच कसं येत नाहीं ? देवा, अशा चांडाळणींना तूं जन्माला तरी कशाला घालतोस ? बाई, त्या कौटिल्यानं मला ही सगळी कथा सांगून ......

**पिंगला:**– काय तुमच्या नवऱ्याचा स्नेही तो कौटिल्य ?

**कुसुम०:**– हो तेंच त्याचं नांव. मला ही गोष्ट सांगितली आणखी वर सांगितलं कीं ती चांडाळीण त्यांना आतां लवकरच हांकून देणार आहे. तसं हांकून दिलं तर त्यांना ताबडतोब गांठून समाधान करायला आणखी घरीं परत आणायला जवळ असलेलं बरं. मला आग्रह केला म्हणून व तिकडची भेट होईल व मला पाहून तरी वृत्ति ताळ्यावर येईल म्हणून आशेनं मी इकडे त्याच्याबरोबर यायला निघालें. त्यानं माझे डागडागिने आपल्या स्वाधीन करून घेतलेन् आणखी वाटेंत एका धर्मशाळेंत माझी विटंबना करण्याचा प्रसंग आणलान्; पण सुदैवानं त्या राक्षसाच्या कचाट्यांतून सुटलें आणखी वाट फुटेल तिकडे जातां जातां इकडे आलें. काय स्थितींत आलें ती......

**पिंगला:**– काय कौटिल्यानं आपली अशी स्थिति केली ?

**कुसुम०:**– हो पण त्याच्याकडे तरी काय दोष ? त्या चांडाळगीनं माझ्या पतीला मोह घालून माझ्या संसाराचा सत्यानाश केला नसता तर... बाई, या तुमच्या शहरांत दुष्ट नष्ट चांडाळगी कौटाळणी आहेत काहो ? पण मी हें काय विचारतें ? आहेत आणि त्यांच्यापैकीं एकीनं माझ्या संसाराचा सत्यानाश केला. बाई, त्या चांडाळणीनं आम्हांला सगळ्यांना कीं हो देशोधडीला लावलं. मामंजी घरदार सोडून क्रोडो रुपयांचा व्यापार टाकून सासूबाईंना घेऊन काशीयात्रेला गेले. माझी अशी दशा झाली. आणखी त्या चांडाळणीनं तिकडे घरांतून हांकून दिल्यावर काय दशा होईल ती देव जाणें. अशा चांडाळगींना देव जन्माला तरी कशाला घालतो ?

**पिंगला:**– ( स्वगत ) खरंच, कशाला जन्माला घालतो ? काय आम्ही पापिणी अशा साध्वींच्या संसाराचा सत्यानाश करून सुखांत राहतों. धिक्कार ! धिक्कार असो आमच्या जिण्याला ! या भयंकर पापाचा परिणाम काय होणार ?

**कुसुम०:**– रौरवनर्क म्हणतात त्यांत तरी देव त्यांना कां नाहीं टाकीत? बाई, माझी गोष्ट ऐकून तुम्हांला फार दुःख होत आहे असं दिसतं. तुमचं तर नाहींना माझ्यासारखं झालं ? तुमच्या पतीला नाहींना कोणी चांडाळणीनं पाशांत गुरफटून तुमच्या संसाराचा सत्यानाश केला ? देवा, नकोरे! माझ्यासारखी स्थिति कोणाचीही होऊं देऊं नकोस. बाई, तुम्हीं मला आपल्या घरांत आणलीत तसा तिकडचा शोध लावून......या या तुमच्या उज्जनी नगरींतल्याच एका कौटाळणीनंच......पण तुम्ही माझ्याशीं कांहीं बोलत नाहीं हें काय ? तुम्ही कोण, काय कांहीं मला सांगा.

**पिंगला:**–सांगेन तुमच्या पतीचा शोध लावून. तुमची आणखी त्यांची भेट करवीन. पुन्हां तुम्हांला सुखांत पडलेल्या पाहीन. पण माझं तुमच्याजवळ एक मागणं आहे.

**कुसुम०:**–मागणं तें काय ? तुम्ही म्हणतां एवढं सगळं कराल तर माझे प्राणसुद्धां तुम्हीं मागितलेत तर देईन.

**पिंगला**:–ते तर मी कधींच मागणार नाहीं. मला पाहिजे तें तुमचं प्रेम.

**कुसुम०**:–माझं प्रेम ?

**पिंगला**:–हो तुमचं प्रेम. मला आपली आवडती दासी समजून प्रेम ठेवा.

**कुसुम०**:–हें काय बोलतां हें ? तुम्हीं माझ्या दीनस्थितींत मरणाच्या दारीं पडलेल्या मला आपल्या दारांतून आणवून माझे प्राण वांचविलेत. त्या तुम्हांला दासी कां समजेन ? तुम्ही माझी बहीण अस्सं समजेन.

**पिंगला**:--छे ! या मानाला मी मुळींच योग्य नाहीं.

**कुसुम०**:--कां बरं नाहीं ? तर मग तुम्ही माझी बहीणच. माझी बहीण म्हणवून घ्यायला तुम्हांला लाज वाटते म्हणावं तर दासी समजा असं म्हणतां, हें काय गूढ आहे कांहीं कळत नाहीं.

**पिंगला**:--( स्वगत ) समजल्यावर दासी तरी समजाल कीं नाहीं कोण जाणे ! देवा काय हा माझ्यावर प्रसंग ? ( उघड ) गूढ काय तें समजेल, पण मला आपलं प्रेम दिलं असं वचन द्या आधीं.

**कुसुम०**:–ज्या चांडाळणीनं माझ्या संसाराचा सत्यानाश केला तीच तुम्ही असलां तरी......पण मी हें काय बोलतें ? छे, तें कधींच शक्य नाहीं. हें घ्या वचन आजपासून तुम्ही माझी बहीण......

**पिंगला**:–तुम्ही जें शक्य नाहीं म्हणतां तेंच तेंच घडलं आहे. मीच तुमच्या संसाराचा नकळत सत्यानाश करणारी.......

**कुसुम०**:–काय तीच तूं चांडाळीण ! (मूर्च्छा येऊन पडते. तिला सांवरते. ती मूर्च्छितावस्थेंतही तिला झिडकारते. )

**पिंगला**:–माझा स्पर्शही हिला नकोसा झाला. देवा, हिची हत्याही माझ्या माथीं येते कीं काय ? ( पडदा पडतो. )

**( अंक ४ था समाप्त. )**



पिंगला:-- मला आपली दासी समजून प्रेम ठेवा. ( पान ८४ )

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

[ पात्रें– मधुकर व रत्नपाल. ]

**मधुकरः**– मित्रा रत्नपाला, तूं केवढा अविचार करीत होतास ? त्या ऐनवेळीं मी जर तिथें आलों नसतों तर आज तूं आत्महत्येचं पातक पदरीं घेऊन आम्हांला सोडून जातच होतास कीं नाहीं ?

**रत्नपालः**– अविचार, आत्महत्या आणि तुम्हांला सोडून जाणं ! मधुकरा, हे शब्द कशाला उच्चारतोस ? अरे मी म्हणजेच मूर्तिमंत अविचार. आणखी आत्महत्या तर कधींच केली आहे. हा देह मात्र त्या ताम्रपर्णींत टाकायचा राहिला होता. तुम्हांला सगळ्यांना सोडून जात होतों म्हणतोस पण तुम्हांला नव्हे सगळ्या जगाला मीं केव्हांच सोडलं आहे. मित्रा, छे ! पण तुला मित्रा म्हणून कोणच्या तोंडानं म्हणूं ? मधुकरा, त्या दुष्ट वेश्येच्या घरांतून तिच्या हलकट लोकांकडून आपल्या समक्ष गचांड्या मारण्याचं नीच काम मीं करविलं त्या मला तूं मित्रा म्हणून कशाला हांक मारतोस ? जर माझं तुझ्या मनांत कल्याण करायचं होतं तर तूं मला हा माझा पापी देह त्या ताम्रपर्णींत टाकूं द्यायचा होतास. कुलटेला पतिव्रता मानून कुलजेचा त्याग करणारा हा रत्नपाल तुझ्यासारख्याच्याजवळ उभासुद्धां राहण्याच्या योग्यतेचा नाहीं.

**मधु०**:– जें झालं तें झालं. आतां त्याचा व्यर्थ शोक करण्यांत काय अर्थ आहे ? आतां चार दिवस तूं इथें गुरुमहाराजांजवळ राहा म्हणजे त्यांच्या उपदेशामृतापासून तुला शांति मिळेल.

**रत्न०**:– शांति ! या करंट्या रत्नपालाला आतां शांति !

पद [ चाल-पिया पिया करतप ]

अधमयहृदया निर्दया ।
पतिता अधमा मज हतभाग्या ।
शांति जगीं या कैंची मिळाया ॥ ध्रु० ॥
अधमाधम जे मजसम पापी ।
त्यां जरि शांती गुरु अर्पी ।
केवळ तत्सन्निध अधमांची ।
लागेल क्षणीं वसती व्हाया ॥ १ ॥

**मधु०:**—छे, छे, उगीच कांहींतरी बोलूं नको.

**रत्न०:**—मधुकरा, मला जाऊं दे. मला हें काळं तोंड गुरुमहाराजांना दाखविण्याचा इच्छा नाहीं. तुलाही दाखवण्याची इच्छा नव्हती. तसा प्रसंग येऊं नये म्हणून त्या गंगाभागीरथींत काळं करणार होतों, पण तूंच येऊन मला...

**मधु०:**—त्याचा आतां उच्चारसुद्धां करूं नकोस. आतां यापुढें तरी तुला मी आणखी मला तूं.

**रत्न०:**—मीं दुष्टानं काय तुझ्याबद्दल संशय घेतले आणि काय !

**मधु०:**—अरे पण त्याचा आतां उच्चारसुद्धां करूं नकोस म्हटलंना ?

**रत्न०:**—पिंगलेचं प्रेम माझ्यावरून काढून आपल्याकडे ओढून घेण्याचा तुझा बेत आहे असं तर तुझ्या तोंडावरच बोललों. परंतु त्या चांडाळाच्या सांगण्यावरून ...... छे छे ! मनांत आलं कीं कांटा उभा राहतो. मधुकरा, माझ्या स्पर्शानं तुला विटाळ व्हावा इतका मी पापी आहेरे ! एक पाप आतां हातून व्हायचं राहिलं आहे. तूं जर मला प्राणत्याग करूं दिला नाहींस तर तें मी खचीत करीन.

**मधु०:**—तें कोणतं !

**रत्न०:**—त्या कौटिल्याचा खून. त्या चांडाळानं...मी तुला काय सांगूं तरी काय ? तूं उज्जनींतून निघून आल्यापासून त्यानं जें काय काय केलं आहे

त्याची तुला माहिती नाहीं. त्यानं माझ्या नांवाचीं खोटीं पत्रं लिहून त्यांना उद्वेग आणि संताप उत्पन्न केला. आणि देशत्याग करविलान्. कुसुममालेल भ्रष्ट करून ती घेऊन तूं देशांतराला गेलास म्हणून त्यानं सांगितलंन्. निश्चिंतपणाच्या भरांत माझ्यापासून वाटेल तसल्या सह्या घेऊन आमच्या मुनिमाला फसवून त्या दोघां गुलामांनीं वांटप करून घेतलं. आणि तें सगळं द्रव्य घेऊन त्या वेश्येच्या इथें येऊन मी आतां निर्द्रव्य झालों म्हणून माझी विटंबना करून मला घरांतून हांकीत हांकीत रानांत आणून सोडलं. मी तिथेंच कुठें तरी प्राण द्यायचा, पण मनांत आलं कीं इथें येऊन गुरुदर्शन घ्यावं. इथं आल्यावर मात्र हें तोंड गुरुजींना कसं दाखवूं म्हणून लाज वाटून प्राण द्यावा असं वाटलं. आणखी त्या उद्देशानं गंगेवर तडक गेलों. तूं आलास तेव्हां मला वाटतं परमेश्वराच्या मनांतून तेवढा सूड माझ्या हातून घ्यायचा आहे. आतां तो मला दिसला कीं पुरे, त्याच्या शरीराचे राई राईएवढे तुकडे करून...

**मधु०:**—रत्नपाला, आतां या आश्रमांत तसले विचारसुद्धां मनांत आणूं नकोस. काय वाटेल तें त्यानं केलं असलं तरी तो आपला मित्रच......

**रत्न०:**—त्या चांडाळाला तूं अद्याप मित्र म्हणतोस ?

**मधु०:**—जो एकदां मित्र तो सदा मित्र. चुकला म्हणून काय झालं ?

**रत्न०:**—चुकला ?

**मधु०:**—हो चुकला नाहींतर काय ? तो एकपरीनं चुकलाच. पण चल मी तुला गुरुजींकडे नेतों. त्यांचं दर्शन झाल्यावर तुझ्या मनांतले हे सगळे विचार जाऊन तुझ्या मनाला शांति मिळेल.

**रत्न०:**—( स्वगत ) आतां मला शांति मिळणार ? तें कांहीं नाहीं. याला पुन्हां टाळलाच पाहिजे. ( उघड ) ठीक आहे. तुझ्यापुढें मी काय बोलणार ? ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

[ पात्रें-मधुकर. ]

**मधुकरः**– काय चमत्कार आहे पहा! याला मीं इतक्या गोष्टी सांगितल्या पण याचं तें खरं. तो म्हणतो मी हें तोंड गुरुजींना दाखवणार नाहीं. गुरुजींना याची हकीकत सांगितली, पण ते कांहीं त्याला भेटण्याचं नांव काढीत नाहींत. जें व्हायचं तें यथावकाश होईल म्हणतात. आतां आपण तरी काय करणार? याला आपल्या पर्णकुटिकेंत बसवून दोघां तापसांना त्याच्यावर नजर ठेवायला सांगून आपलं माध्यान्हकार्य उरकायला जावं झालं. पण ही समोरून कोण बरं मंडळी येताहेत ? हा पुढें येतो हा कौटिल्य तर नव्हे ? कौटिल्यच. हाही पश्चात्ताप पावून इकडेच येतो आहे. बरं पण शेवटीं तरी या दोघांना गुरुजींच्या चरणांजवळ येण्याची इच्छा झाली.

**कौटिल्यः**– कोण मधुकर ? अरे वा ! तूं तर अगदीं तापसीच बनला आहेस. पण आपला मित्र रत्नपाल इकडे आला आहे का ? मित्रा मधुकरा, शेवटीं रत्नपाळाची त्या वेश्येनं फार दुर्दशा केली. त्याच्याजवळ होतं नव्हतं तें गिळंकृत केलं. आतां तो दरिद्री झाला असं पाहण्याबरोबर त्या दुष्ट वेश्यांनीं त्याला घालवून दिलं. आणि तो पश्चात्ताप पावून उज्जनीहून निघाला तो आतां जीवबीव देतो कीं काय अशी शंका येऊन मी त्याच्या मागोमाग शोध करीत निघालों तों, तो या आपल्या आश्रमांत आला म्हणून बातमी लागून इथें आलों. मित्रा, त्यानं जर जीव दिला असला तर त्यांत अगदीं नवल नाहीं. इतकी त्याची दुर्दशा झाली.

**मधु०**:– ( स्वगत ) याच्या बोलण्यांत आणि रत्नपालानं याचं वर्णन केलंनू त्यांत कांहींच मेळ बसत नाहीं; पण आपण याची परीक्षा तरी पाहूं; ( उघड ) तुला शंका आली तसंच शेवटीं झालं. रत्नपाल इथें येऊन त्यानं गंगाप्रवाहांत जीव दिला. त्याला मीं त्या डोहाजवळ दुरून पाहिला. प्रथम मला शंका आली नाहीं, पण मग त्याचा आविर्भाव आत्महत्या करण्याचा आहे

असं पाहतांच मी त्याच्याकडे धांवलों. माझ्या धांवण्यानंच की काय त्यानं त्या डोहांत उडी घातली आणि पुन्हां कांहीं वर आला नाहीं. माझ्या देखत कीं रे....

**कौ०:**—शिव ! शिव ! काय हा अनर्थ ! पण हा नेमानेमच होता. तूं त्याला तशा स्थितींत सोडून आलास. मी त्याला केव्हां तरी ताळ्यावर आणीन या आशेनं राहिलों; पण डोहांत बुडल्याप्रमाणेंच त्यानं वर्तन केलं. बुद्धिवाद केला तरी ऐकायचा नाहीं. त्याला ती पिंगला म्हणजे केवळ देवता वाटली. बरं आहे तूं जा आतां स्नानाला, जातो आहेस तो. मी या माझ्या मंडळींना वाटेला लावून गुरुजींच्या आश्रमांत येतों. मग सांगेन सगळ्या हकीगती.

(जातो.)

**मधु०:**—हा आला हें एक लचांडच झालं. आतां गुरुजींच्याजवळ रत्नपालाला नेऊन शांत केलाच पाहिजे. नाहींतर या पुण्याश्रमांत आणखी काय काय प्रसंग ओढवतील कुणाला ठाऊक ! ( जातो. )

**कौ०:**—( येऊन ) एकूण असा प्रकार झाला काय ? फारच ठीक झालं. आतां पिंगला आणखी कुसुममाला आत्मनाश करून घेतल्याखेरीज खास राहात नाहींत. तसं झालं म्हणजे तें सगळं द्रव्य आपल्या हातीं आल्यासारखंच आहे. आधीं त्या म्हणतच होत्या. आतां आपण त्यांना भेट देऊं म्हणजे झालं. ह्या आल्याच. ( खिन्न उभा रहातो. कुसुममाला व पिंगला येतात. )

**पिंगला:**—ते इकडे आले इतकी बातमी तर लागली. पण पुढें कांहीं ?

**कौ०:**—काय सांगूं आतां तुम्हांला पुढची बातमी ? जें होईल असं आपल्याला वाटलं होतं तेंच शेवटीं झालं.

**कुसुम०:**—काय ? ( मूर्च्छित पडते. )

**कौ०:**—होय आत्मघात करून घेतला, प्रत्यक्ष मधुकराच्यादेखत.

**पिंगला:**—काय त्यांच्यादेखत ?

**कौ०:**—हो, त्याच्यादेखत या डोहांत प्राण दिला म्हणून त्यानं मला सांगितलं.

पिंगला:– आणखी त्यांचा प्राण बांचविण्याकरतां कांहीं त्यांनीं यत्न...

कौ०:–हं मैत्रीची एवढी उदात्त कल्पना कोणाला आली आहे ? मरेना मेला तर.

पिंगला:–कुसुममालाबाई सावध व्हा.

कौ०:–वहिनी, आतां आपण परत जाण्याखेरीज दुसरं काय उरलं आहे ?

कुसुम०:–काय आतां परत जायचं ? छे ! मीं तर त्या डोहाजवळ सती जाणार. मला आतां या जगांत काय उरलं आहे ?

पिंगला:–आणि बाई मला तरी काय उरलं आहे ? पण सती जाण्याचा विचार करण्याइतकं माझ्या पदरीं कुठं पुण्य आहे ?

कुसुम०:–पिंगलाबाई, आतां झाल्या गोष्टी परत येत नाहींत. मला आपल्या माणसांकडून सती जाण्याची सिद्धता करून दिलीत म्हणजे झालं. तेवढं करा. माझा शोक मीं आतां आंवरला. मी तुम्हांला अणुमात्रसुद्धां दोष देत नाहीं. माझ्या कर्मापुढें तुम्ही काय करणार ?

कौ०:–झाला माझाही निश्चय झाला. माझ्या हातून घडलेल्या पातकांबद्दल देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरं प्रायश्चित्त नाहीं. मी अग्निकाष्ठं भक्षण करून तें प्रायश्चित्त घेणार, आणखी तेंही मी त्वरित करणार. कारण मधुकरानं बहुतेक गुरुमहाराजांना मीं भेटल्याची हकीकत सांगितली असेल आणखी ते दयाघन आहेत. ते मला आपल्याजवळ बोलावल्याखेरीज राहणार नाहींत. तेव्हां तसं होण्यापूर्वीं मला......

कुसुम०:–तुम्ही माझी आधीं तयारी करून द्या.

कौ०:–छे ! ही गोष्ट माझ्या हातून कालत्रयींसुद्धां घडणार नाहीं.

कुसुम०:–एवढीसुद्धां तुम्ही माझी गोष्ट करणार नाहीं ?

कौ०:–भलतीच गोष्ट कशी करूं ?

कुसुम०:- मर्जी तुमची. पिंगलाबाई, तुम्ही तरी आतां मला हें सतीचं वाण मिळवून द्या. आपल्याबरोबर माणसं आहेत त्यांना आज्ञा करून माझी तयारी करून द्या.

पिंगला:–ज्या तुम्हांला मी सुखाच्या शिखरावर बसविणार होतें तीच आतां तुमच्या प्राणाची आहुति द्यायला साहाय्य करूं ? हो, पण तुम्हांला आतां दुसरं काय राहिलं आहे ? देतें आणि त्याच चितेंतलीं अग्निकाष्ठं भक्षण करून मीही आपला अंत करीन.

कौ०:–भयंकर मित्रद्रोहाचं पातक करणारा मी चांडाळ. अरेरे ! मीं किती भयंकर पापं केलीं ? मला तरी आतां कोणचा दुसरा मार्ग उरला आहे ? चला आपण सगळींचजणं आतां......

पिंगला०:–बरं आहे तर, तुम्ही चितेची तयारी करायला लागा जा. आतां वेळ घालवूं नका. ( कौटिल्य जातो. ) कुसुममालाबाई, या मेल्याचा मला कांहींसुद्धां भरंवसा वाटत नाहीं. याला आपण कितीही झिडकारलं तरी हा आपल्या मागं आला. यानं आपल्याला खोटं सांगितलं नाहीं कशावरून? तेव्हां तुम्ही बसा. या मेल्याच्या मनांत आपण मरून जावं. आणखी मावशीला फसवून सगळं द्रव्य उपटावं असंसुद्धां असेल. त्याला कसला आहे पश्चात्ताप ! तुम्ही त्या झाडाखालीं बसा. ( कुसुममाला जाते व मधुकर येतो. तों पिंगला दिसते. )

मधु०:–अरे हीच ती चांडाळीण पिंगला ! रत्नपालाच्या शोधाकरतांच आली वाटतं. हिलाही आपण सांगूं कीं रत्नपालानं आत्महत्या केली.

पिंगला:–हेच ते योग्यासारखे दिसणारे मधुकरराय. यांना विचारतें आतां.

मधु०:–पिंगले, त्या रत्नपालाचा सत्यानाश करून त्याला घरांतून हांकून दिलंस तरी तुझं समाधान झालं नाहीं. त्याचा प्राण घेण्यासाठीं त्याच्यामागें हिंडतेस काय ? जा चांडाळणी, त्याला गंगेनं आपल्या पोटांत घेतलं. आतां तुझ्या अगर कौटिल्याच्या दृष्टीला त्याचं शवसुद्धां पडणार नाहीं. जा, या कृत्याबद्दल तुमच्या दोघांसाठीं रौरवनरकांत खाई तयार आहे. स्नान करून

आलेल्या मला तुझ्या योगानं पुन्हां स्नान करायची पाळी आलेली आहे, जा, हा आश्रम भ्रष्ट करूं नकोस तुझ्या संचारानें. (संतापानं चालता होतो.)

**पिंगला:**—हायरे देवा, काय ही माझी स्थिति. मधुकरराव म्हणतात तेंच खरं.

पद [ चाल—बालम मोरा.]

**रौरवभिन्ना गति ना ।**
**पापिणिच्या या येई देवा ॥ ध्रु० ॥**
**कांतवरि जी घाला घाली ।**
**पतिच्या घेऊनि प्राणा ॥ १ ॥**

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ—नदीकांठ. कौटिल्यानें चिता रचली आहे—कुसुममाला चितेंत प्रवेश करण्याचे तयारींत आहे. ]

**कुसुम०:**—देवा, आतां तरी पुढच्या जन्मीं माझा आणखी त्यांचा वियोग होऊं देऊं नकोस. पिंगलाबाई येतें मी आतां.

**पिंगला:**—कुसुममालाबाई, मी काय प्रतिज्ञा करून तुम्हांला घरून घेऊन निघालें आणखी हें काय होत आहे ? देवा, माझ्या नशिबीं सतीधर्म-सुद्धां नाहीं. या चितेला स्पर्श करीन म्हटलं तरीसुद्धां मला प्रतिबंध आहे. सर्वांस शुद्ध करणारा अग्नीसुद्धां माझ्या स्पर्शानं विटाळेल, इतकी मी चांडाळीण आहें. तुमच्या सर्वस्वी नाशाला कारण झालें याबद्दल कोणच्या तोंडानं क्षमा मागूं ?

**कुसुम०:**—क्षमा मागूं नका. कांहींसुद्धां करूं नका. माझा तुमच्यावर मुळींसुद्धां राग नाहीं. येतें मी आतां.

**पिंगला:**—काय होईल तें होवो. इतकीं पापं केलीं त्यांत हें एक पाप. आपण प्रवेश करा कीं मीही प्रवेश करीन. ( कौटिल्य येतो. )




रत्नपाळः— दुष्टा, तुला आधीं ठार करतो. ( पान ९३ )

**कौटिल्यः**–( स्वगत ) झालं आतां आपलं काम. आतां तिकडे जावं आणि तें द्रव्य घेऊन चालतं व्हावं. म्हणजे हा भयंकर प्रकार दृष्टीला पडायला नको. ( जातो. )

**कुसुम०ः**–पिंगलाबाई, आतां तुम्ही कां उगीच......पण तुमचं जर तिकडच्या चरणांवर इतकं प्रेम होतं तर मी तरी कां तुम्हांला नको म्हणूं ? मीं तुम्हांला बहीण म्हटलंच आहे. चला तर ! जय जगदंबे !

**पिंगलाः**–जय जगदंबे !

[ दोघीही चितेंत प्रवेश करणार तों अवधूत गुरु चितेंतून वर येतात. ]

**अवधूतः**–हांहां ! मुलींनो तुम्ही ज्याच्याकरतां प्राणत्याग करतां आहांत, तो तो पाहा त्या कौटिल्याचा प्राण घ्यायला पाहतो आहे.

[ पडद्यांत– रत्नपालः–दुष्टा, बरा आयताच सांपडलास ! तुला आधीं ठार करतों. माझी फार इच्छा कीं तुला ठार मारून मग प्राण द्यावा. असें म्हणून कौटिल्याला ठार मारणार तों मधुकर त्यांना सोडवतो. ]

**अवधूतः**–रत्नपाला, तुझ्या हातून मित्रहत्येचं पातक घडलं नाहीं हें फार चांगलं झालं. ही तुझी पत्नी परमसाध्वी आहे. आणि पिंगला हीही पण साध्वी आहे. रत्नपाला, तूं असा स्तब्ध कां ? कृतकर्माबद्दल तुला पश्चात्ताप झाला आहे आणि म्हणूनच तूं लाजून आमच्या दर्शनाला येत नव्हतास. पण शेवटीं तुझी आमची अशीच भेट व्हायची होती. पिंगले, तूं आतां आपल्या निश्चयाप्रमाणें कुसुममालेचा आणि तिच्या पतीचा संयोग घडवून आण. रत्नपाला, तूं या दोघींबद्दल अणुमात्र किंतु धरूं नकोस. कौटिल्याला त्याच्या कर्मानुसार बुद्धि झाली आणि त्यानंच तुम्हां दोघां पतिपत्नींत बिघाड केला. पण त्याच्यावरला राग सोड. त्याला पश्चात्ताप झाला तर...
( कौटिल्य लोटांगण घालतो. )

**कौटिल्यः**– गुरुमहाराज, माझ्या हातून घडलेल्या पातकांबद्दल मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. मी अपराधी आहें. मला क्षमा करा.

**अव०:–** कौटिल्या, पश्चात्तापानं तुझीं सगळीं पातकं दग्ध झालीं. आतां अगदीं शोक करूं नकोस. रत्नपाळा, मधुकरा, आतां मागलं कांहीं आठवून त्याला दुःख देऊं नका. तें सगळं विसरून जा.

**रत्नपाल:–** गुरुमहाराज, मी आतां आपल्यापुढें कोणत्या तोंडानें बोलूं? सर्वस्वी अपराध माझा आहे.

**अव०:–** ऊठ. रत्नपाला, मी तुला पुन्हां सांगतों कीं, ही कुसुममाला तुझी धर्मपत्नी अत्यंत शुद्ध, अत्यंत वंद्य अशी आहे. तर इच्यासह आनंदानं संसार कर.

**रत्नपाल:–** आपली आज्ञा शिरसामान्य आहे. पण गुरुमहाराज, त्या मथुरेंत तोंड दाखवायला जागा कुठें आहे? माझे वृद्ध माता पिता....

**अव०:–** थांब, तुझा हेतु मी समजलों. तुझे मातापिता आपली तीर्थयात्रा आटोपून तपःसाधनाच्या निश्चयानं याच आश्रमांत येऊन राहिले आहेत. त्यांचेंही तुला लवकरच दर्शन होईल. कांहीं काळजी करूं नका.

**मधु०:–** आणि गुरुमहाराज, ते पहा तेहो आपल्या दर्शनाकरतां इकडेच येताहेत ( हरपाल व यशोदा येतात. )

**अव०:–** हरपालजी, हा पहा तुमचा रत्नपाल कर्माप्रमाणें फळ भोगून शेवटीं पश्चात्तापानं शुद्ध झाला आहे. तरी त्याचेवर कांहीं राग न करतां त्याचेवर पूर्ववत् प्रेमच करावं, असं आमचं तुम्हांला सांगणं आहे. वत्सा रत्नपाला, आपल्या मातापित्याला नमस्कार कर. ( रत्नपाल नमस्कार करतो. )

**हरपाल:–** शतायुषी हो. ( कुसुममालेस ) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. महाराज, आपल्या कृपेनं हा सुदिन या डोळ्यांनीं पाहायला मिळाला. पण महाराज, आतां पुढील काळ हरिभजनांत घालवावा अशीच आम्हां उभयतांची इच्छा आहे. तरी आपली अनुज्ञा असावी.

**अव०:–** ही तुमची इच्छा यथायोग्य आहे.

**रत्नपाल**:- गुरुमहाराज, माझ्यानं जास्त बोलवत नाहीं. पण आजपर्यंत आमचे हातून वडिलांची सेवा कांहींच झाली नाहीं तरी......

**अव०**:- रत्नपाला, तुझी ही इच्छा ठीकच आहे. पण आतां तुम्ही भलताच आग्रह धरूं नका. त्यांनीं आतां आपले शेवटले दिवस वानप्रस्थाश्रमांत घालवावे हेंच उचित आहे. आतां तुम्ही दोघेंही सुखानं संसार करा. आणि पिंगले तूंही.

**पिंगला**:- छे छे महाराज, मी आतां हे चरण सोडून कुठें जाणार नाहीं:-

पद [ चाल-भो तेरा समजाया. ]

**सोडींना गुरुराया मी या चरणां ॥ ध्रु० ॥**
**पावनशीला ही पदगंगा ।**
**त्वरित करिल अघनाशा ।**
**ही साक्ष मना ॥ १ ॥**
**नित्यसुखाचा भावचि ठेवा ।**
**विभव विषय तृण, होई ।**
**हें ज्ञान मना ॥ २ ॥**

**अव०**:- मुली ऊठ, तुझी योग्यता फार निराळी आहे. पश्चात्तापानं वैराग्यसंपत्ति कशी मिळते हें मनांत उतरण्याला आम्ही तुला आपली गुरुच समजतों. आजपर्यंत आम्हीं सात आठ गुरु केले तशीच तूं मला आहेस. आणखी हें पहा, या तुझ्या झालेल्या चरित्रावरून तुझं वर्तन साध्वीप्रमाणेंच आहे. तेव्हां यापुढें सर्व जन तुझं ‘ सती पिंगला ’ असंच वर्णन करतील. आतां तुमची काय इच्छा आहे ?

**मधु०**:- गुरुमहाराज या दासाची एकच इच्छा आहे. ती ही कीं आपण त्या निरंजन अवधूत दत्त महाराजांचेच अवतार अशी आमची निःसंशय भावना आहे, तेव्हां आपले चरणीं इतकीच प्रार्थना आहे:—

## भरतवाक्य.

पद [ चाल–पसा निःनिनिनिपम. ]

स्वेच्छाचर चंचल अंतर हें हो वश सुविवेका ।
अविचारा न मिळो लव थारा ।
कृति अवहिता असो हितप्रदा ॥ ध्रु० ॥
सतत सुनयविजयकामनेला ।
धरो मनुज त्यजुनि कपट ।
वरो शुभा पथा सदा ॥ १ ॥
क्षणिकसुखद विषयवासनेला ।
त्यजो हृदय न हो विवश ।
भजो सदा प्रभूपदां ॥ २ ॥

समाप्त. ]